फेब्रुवारी २०२४/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



# विकसित महाराष्ट्र विकसित भारत...

माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥

जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥

ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥

सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे रसु हा आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥

नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळयांही पुरों लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रुपाची हे ॥

जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें ।
बोलु भुजांहीं आविष्करे । आलिंगावया ॥

ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि
बुझावी । जैसा एकला जग चेववी । सहस्त्रकरु ॥

तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ॥

हें असो तया बोलांची ताटें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरिलीं ।
ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥

**– श्रीज्ञानेश्वरी (अध्याय सहावा)**

## वचनपूर्ती
६

महाड असो, ईशाळवाडी असो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माणुसकीची बाजू ठळकपणे समोर आली. केवळ मुख्यमंत्री नव्हे, तर महाराष्ट्रातील तमाम जनतेसाठी त्यांच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा नेता अशीच त्यांची ओळख आता दृढ झाली आहे.

## सर्वसमावेशक विकास
८

राज्याच्या २०२४-२५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत, तर विधान परिषदेत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सादर केला.

## विकसित महाराष्ट्र, विकसित भारत
१८

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने गेल्या दीड वर्षात विविध क्षेत्रात विकासाचे भरीव निर्णय घेतले आहेत. पायाभूत सुविधा, उद्योग, कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण, महिला, सामाजिक न्याय अशा विविध क्षेत्रांमध्ये घेतलेल्या निर्णयांनी महाराष्ट्राची घोडदौड सुरू आहे.

## मराठी भाषा गौरव दिन
३४

मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन व संवर्धन या मराठी भाषा विभागाच्या धोरणानुसार मराठी भाषा विभागामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येतात. याच अनुषंगाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान असणाऱ्या वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

## मराठी साहित्यातील स्त्रीवाद
४१

मराठी साहित्यातील स्त्रीवाद असा विचार करताना स्त्रीवाद ही एक राजकीय संकल्पना आहे. स्त्रियांचे संरचनात्मक दुय्यमत्व नष्ट करणे आणि स्त्रियांना समतेच्या सूत्राशी जोडणे, असे स्त्रीवाद या संकल्पनेत अभिप्रेत आहे. मराठी साहित्याचा स्वतःचा इतिहास आहे.

## परदेशातील मराठी अस्मिता
४७

कोणत्याही माणसाला आपल्या मातृभूमीविषयी आणि मातृभाषेविषयी अभिमान वाटत असतोच. यालाच अस्मिता असे म्हणतात. अस्मिता या शब्दात अभिमान आणि 'मी आहे' अशी भावना व्यक्त होते. महाराष्ट्राच्या अस्मितेला आपण 'मराठीपण' म्हणतो. ही अस्मिता केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही, तर ती परदेशस्थ मराठी माणसामध्येही आहे.

## रिंगाण
४९

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी हे कृष्णात खोत यांचं मुळ गाव. त्यांनी आत्तापर्यंत पाच कादंबऱ्या व एक ललित गद्य लिहिले आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांना विविध संस्थांकडून देश व राज्यस्तरावरील पुरस्कार मिळालेत. त्यांच्या रिंगाण या कांदबरीस साहित्य अकादमीचा २०२३ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्यांची मुलाखत...

## विश्व मराठी संमेलन २०२४
५२

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार केवळ राज्यापुरता सीमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर आणि परदेशात रुंदावण्यासाठी सन २०२३ मध्ये विश्व मराठी संमेलनाचे राज्यात पहिल्यांदा आयोजन करण्यात आले होते. परदेशातील, परराज्यातील आणि राज्यातील मराठी भाषकांचा त्यास भरभरून प्रतिसाद मिळाला.

## श्रीमंतयोगी
५४

महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती. त्यांचा जन्म मराठवाड्यातील भोसले या वतनदार घराण्यातील मालोजींचे पुत्र शहाजी आणि सिंदखेडकर जाधवराव यांच्या कन्या जिजाबाई या दांपत्यापोटी शिवनेरी किल्ल्यावर (जुन्नर तालुका पुणे जिल्हा) झाला.


| | |
|---|---|
| वचनपूर्ती | ६ |
| सर्वसमावेशक विकास | ८-१७ |
| विकसित महाराष्ट्र, विकसित भारत | १८-२५ |
| कल्याणकारी निर्णय | २६-३२ |
| मराठी भाषा गौरव दिन | ३४ |
| मराठी भाषेचे प्राचीनत्व! | ३७ |
| मराठी साहित्यातील योगदान | ३९ |
| मराठी साहित्यातील स्त्रीवाद | ४१ |
| मराठी भाषा : संधी आहे सर्वत्र! | ४३ |
| परदेशातील मराठी अस्मिता | ४७ |
| रिंगाण | ४९ |
| विश्व मराठी संमेलन २०२४ | ५२ |
| श्रीमंतयोगी | ५४ |
| दोन बाबांचे ऋणानुबंध | ५७ |
| विश्वास हवा मायभाषेच्या क्षमतेवर | ५९ |

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वर्ष ७५ वे | अंक ३ | फेब्रुवारी २०२४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# स्टार्टअप रँकिंगमध्ये महाराष्ट्र सर्वप्रथम

केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या व्यापार आणि उद्योग संवर्धन विभागाच्या वतीने राज्यांच्या स्टार्टअप रँकिंग कार्यक्रमाच्या चौथ्या आवृत्तीमध्ये स्टार्टअप संस्थांसाठीच्या साहाय्य कामगिरीच्या क्रमवारीत महाराष्ट्राने 'टॉप परफॉर्मर' म्हणून क्रमांक पटकवला.

या क्रमवारीवर आधारित २०२२च्या आवृत्तीच्या निकालाची घोषणा आणि सत्कार समारंभ केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे झाला. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रमोद शिंदे, सहायक व्यवस्थापक अमित कोठावदे व विवेक मोगल या टीमने पुरस्कार स्वीकारला.



भारत सरकारच्या उद्योग आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्रालयाच्या अंतर्गत उद्योग आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विभागाच्या वतीने दिल्लीतील भारत मंडपम, प्रगती मैदान येथे राज्यांचे स्टार्टअप रँकिंग पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाणिज्य आणि उद्योग, ग्राहक व्यवहार, अन्न, सार्वजनिक वितरण आणि वस्त्रोद्योगमंत्री श्री. गोयल यांच्या हस्ते विविध श्रेणीतील पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी विशेष सचिव सुमिता डावरा, लॉजिस्टिक्स, उद्योग, ग्राहक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विभागाचे सहसचिव व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील संपूर्ण स्टार्टअप परिसंस्थेत, ज्यामध्ये राज्य सरकार, इनक्यूबेटर, एंजेल गुंतवणूकदार, शाळा आणि महाविद्यालये यांचा समावेश आहे. या स्टार्टअप्सच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्याने स्टार्टअपसाठी कार्यक्रमाची आखणी आणि उद्दिष्टे ठरवून उत्तम यंत्रणा निर्माण करत केलेल्या प्रभावी कार्यासाठी हा बहुमान मिळाला आहे. कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण आणि उद्योजकतेला चालना देणे हे समृद्ध महाराष्ट्राचे ध्येय आहे.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राज्यांच्या स्टार्टअप रँकिंग क्रमवारीत महाराष्ट्र राज्य टॉप परफॉर्मर म्हणून नावारूपाला आले आहे. अन्य काही रँकिंगमध्येही महाराष्ट्र राज्य पहिल्या स्थानावर आहे. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, मुंबई २०१८ मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्टार्टअपच्या परिसंस्था वाढीसाठी नियम सुलभ करण्याच्या दिशेने आणि स्टार्टअप परिसंस्थेला बळकट पाठिंबा देण्यास विविध निकषांच्या आधारावर स्टार्टअप रँकिंग हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. वर्ष २०२२च्या आवृत्तीमध्ये ७ व्यापक सुधारणा क्षेत्रांचा विचार करण्यात आला ज्यामध्ये, २५ कृती मुद्दे होते जे स्टार्टअप्स आणि परिसंस्थेच्या भागधारकांना नियामक; तसेच धोरण आणि आर्थिक समर्थन प्रदान करण्यासाठी आवश्यक आहेत. या सुधारणा क्षेत्रांमध्ये संस्थात्मक समर्थन, नावीन्यता आणि उद्योजकता, बाजारपेठेत प्रवेश, इनक्युबेशन आणि मेंटरशिप सपोर्ट, फंडिंग सपोर्ट, एनेबलर्सची क्षमता बांधणी, शाश्वत भविष्यासाठी रोडमॅप यांचा समावेश होता. महाराष्ट्र स्टार्टअप वीक, स्टार्टअप पोर्टल आणि महिला इनक्युबेशन सेंटर या प्रमुख उपक्रमांमुळे या क्रमवारीत महाराष्ट्राने टॉप परफॉर्मरचा क्रमांक पटकवला.

# जनकल्याणाचा वसा

'लोकराज्य'चा फेब्रुवारी महिन्याचा अंक आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. रोजच्या संघर्षात जगण्यासाठी उमेद देणाऱ्या मान्यवरांचे स्मरण करण्याची संधी देणारा हा फेब्रुवारी महिना. परकीय अंमलास झुगारून स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज, स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा, संत सेवालाल महाराज, बाळशास्त्री जांभेकर, संत रविदास महाराज आणि कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे जन्मदिवस या महिन्यात येतात. या थोर व्यक्तींच्या स्मृती आपणा सर्वांना स्फूर्तिदायी ठरणाऱ्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा 'जनकल्याणाचा वसा' शिरसावंद्य मानला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी वाटचाल सुरू केली. विकासाचे परिमाण समजल्या जाणाऱ्या अनेक निर्देशांकात महाराष्ट्र अव्वलस्थानी आहे.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत, तर विधान परिषदेत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी २०२४-२५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पामध्ये ४ लाख ९८ हजार ७५८ कोटी रुपये महसुली जमा आणि ५ लाख ८ हजार ४९२ कोटी रुपये महसुली खर्च दाखवण्यात आला आहे. महसुली तूट ९ हजार ७३४ कोटी रुपयांची, तर राजकोषीय तूट ९९ हजार २८८ कोटी रुपयांची अंदाजित करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात चार महिन्यांचे लेखानुदान मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे.

या अंतरिम अर्थसंकल्पात शाश्वत, पर्यावरणपूरक, सर्वसमावेशक विकास साधण्याच्या दृष्टीने राज्याच्या धोरणाला गती देण्यास प्राधान्य दिले आहे. तसेच शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, युवक, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक अशा समाजातील सर्व घटकांना न्याय आणि विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

या अंकात गेल्या दीड वर्षांत शासनाने घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य, शेती-सिंचन, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, पर्यटन, महिला व बालकल्याण, सामाजिक न्याय आणि अगदी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही महाराष्ट्राकडे देशातील अन्य राज्ये आदराने आणि प्रयोगशील उपक्रमांसाठी आदर्श म्हणून पाहतात. यामुळेच महाराष्ट्र आज देशाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून ओळखले जाते. देशाची आर्थिक राजधानी म्हणून आपल्या मुंबईचा मोठा वाटा आहेच; तसेच उपराजधानी नागपूर, विद्येचे माहेरघर पुणे आणि नाशिक, छत्रपती संभाजीनगर ते सांगली, सातारा आणि कोल्हापूर या शहरांचेदेखील योगदान लक्षणीय असे राहिले आहे.

आत्मनिर्भर भारत, जगातील आर्थिकदृष्ट्या स्थिर आणि सशक्त अर्थव्यवस्था म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताचे स्थान अढळ बनवले आहे. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी 'फाईव्ह ट्रिलियन डॉलर्स'चे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी महाराष्ट्राने आतापासूनच कूच केली आहे. आपण औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यात मॅग्नेटिक महाराष्ट्र ही संकल्पना यशस्वी केली आहे. दावोस येथे सन २०२४ मध्ये राज्यात पोलाद, आयटी, हरित ऊर्जा, कृषी, लॉजिस्टिक, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ३.५७ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक सामंजस्य करार झाले आहेत. यामुळे २ लाख रोजगारनिर्मिती होईल, तर सन २०२३ मध्ये १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

कृषी क्षेत्रात आपण अनेकविध नावीन्यपूर्ण प्रकल्पांना कार्यान्वित केले आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकरी बांधवांना फटका बसतो. त्यांना दिलासा देण्यासाठी गत दीड वर्षांत ४४ हजार कोटी रुपयांच्या योजनांची अंमलबजावणी केली आहे. आरोग्याच्या क्षेत्रात अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले आहेत. महात्मा जोतिराव फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेची उत्तम सांगड घातली आहे. शिक्षण क्षेत्रातही विद्यार्थीभिमुख आणि गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षणाच्या योजनांना प्राधान्य दिले आहे.

मराठी भाषेचा सन्मान म्हणून दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात २७ तारखेला 'मराठी भाषा गौरव दिवस' शासनातर्फे आयोजित केला जातो. ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधण्याचा हेतूसुद्धा हा दिवस साजरा करण्यापाठीमागे आहे. या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे विविध पैलू नोंदवणाऱ्या मान्यवरांच्या लेखांचा समावेश करण्यात येत आहे. याबरोबरच मंत्रिमंडळातील निर्णय यांचाही समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणास नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# वचनपूर्ती

**महाड असो, इर्शाळवाडी असो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माणुसकीची बाजू ठळकपणे समोर आली. केवळ मुख्यमंत्री नव्हे, तर महाराष्ट्रातील तमाम जनतेसाठी, त्यांच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा नेता अशीच त्यांची ओळख आता दृढ झाली आहे. दिलेला शब्द पाळण्याची त्यांची भूमिका आता महाराष्ट्रातील प्रत्येकाने ओळखली आहे. वचनपूर्ती करणारे हे नेतृत्त्व महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा देईल यात शंका नाही.**

**विनायक पात्रुडकर**



एखादे 'लक्ष्य' पूर्ण केल्यानंतर आव्हान असते ते सातत्याचे, परिश्रमाचे! मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्या पद्धतीने सरकार चालवले, त्याला तोड नाही. राजकीय विरोधकांच्या आरोपांच्या प्रचंड फैरी सुरू असताना कुठेही चित्त विचलित होऊ न देता सरकारची घडी अतिशय व्यवस्थित बसवली. शिवाय प्रशासनाला वेगाने दौडायलाही भाग पाडले. त्यामुळे आरोपांच्या फैरी निष्प्रभ होत गेल्या आणि महाराष्ट्राच्या जनमानसात एकनाथ शिंदे नावाचा संवेदनशील मुख्यमंत्री रुजत गेला. आज एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता त्यांना मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादातून दिसते आहे. गेल्या दीड वर्षांत त्यांनी ज्या पद्धतीने मेहनत घेतली, राज्याच्या विकासाला पूरक असे निर्णय घेतले, महाराष्ट्राची आर्थिक घडी पुन्हा नीट बसवली, रखडलेले प्रकल्प पूर्णत्वास नेले. महाराष्ट्रात वेगाने विकासाच्या गोष्टी घडत आहेत. समृद्धी महामार्ग असेल, कोस्टल रोड, अटल सेतू, मेट्रो अशी लोकांच्या थेट जीवनावर परिणाम करणारी कामे पूर्णत्वाकडे गेली. 'एमएमआर' म्हणजे मुंबई महानगरचा परिसर तर देशातील विकासाचे ग्रोथ इंजिन ठरले आहे.

## मातीतला माणूस

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कष्ट आणि मेहनत आता फळाला येताना दिसते आहे. देशातील सर्वात लांबीचा समुद्र सेतू बांधताना त्यातील प्रत्येक टप्प्यावर त्यांची बारीक नजर होती. मोठे स्वप्न साकार होताना पाहणे हे त्यांच्या कर्तव्यपूर्तीच्या समाधानाचे क्षण होते. एकीकडे विकासाचे टप्पे गाठत असताना गेल्या दीड वर्षांत त्यांनी माणुसकीशी असलेले घनिष्ठ नातेही जपले. रायगडमधील इर्शाळवाडी गावावर डोंगर कोसळला आणि एका रात्रीत होत्याचे नव्हते झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इर्शाळवाडीला भेट दिली. अत्यंत अवघड असा डोंगर चढून ते वर गेले. गावात जी माणसं वाचली होती, त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम हाती घेतले. तिथेच पायथ्याला त्यांना जागा दिली. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली. संपूर्ण शासकीय यंत्रणा कामाला लावून त्या गावाचे अक्षरशः विद्युत वेगाने पुनर्वसन केले. महाराष्ट्रासाठी हा एक नवा आदर्श होता. त्यामुळे लोकांसाठी लोकांमध्ये जाऊन काम करणारा मुख्यमंत्री अशी त्यांची ओळख होत गेली.

खरे तर राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभाळताना त्यांनी कुठेही संयम सुटू न देता अत्यंत कुशलतेने समतोल साधत निर्धोकपणे प्रवास सुरू ठेवला. 'आरोपांना कामानेच उत्तर' हे सूत्र त्यांनी आचरणात आणले आणि विरोधकांना निष्प्रभ करत गेले. त्यामुळे त्यांची प्रतिमा उंचावत गेली. आज लोकप्रियतेच्या शिखरावर असले, तरी अत्यंत 'मातीतला माणूस' ही प्रतिमा त्यांनी जपली आहे. म्हणूनच सामान्य माणसांना ते आपलेसे वाटतात.

## जनतेशी संवाद

जवळपास दररोज ते सर्वसामान्यांना भेटतात, त्यांच्याशी संवाद साधतात. आपण जनसामान्यांचे मुख्यमंत्री आहोत, ही भावना बाळगून ते सर्वांना भेटत असतात. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे त्यांना परिस्थितीची पुरेपूर जाणीव आहे. विशेषतः सामान्य लोकांबद्दल आणि त्यांच्या कामाबद्दल ते स्वतः लक्ष घालून सगळी कामे करून घेतात. जनतेला भावलेले एक संवेदनशील मुख्यमंत्री म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जाते. वैद्यकीय मदत मागायला त्यांच्याकडे दररोज अक्षरशः रीघ लागते. प्रत्येकाला आपापल्या परीने ते नेहमीच मदत करतात. एखाद्याची समस्या जाणून घेऊन सभोवतालच्या माणसांशी चर्चा करून तत्काळ निर्णय घेण्याची, इतकेच नव्हे तर त्याची कार्यवाही झाली की नाही, याचा पाठपुरावा करण्याची पद्धत मुख्यमंत्री शिंदे यांनी निर्माण केली. मुख्यमंत्री सामान्य नागरिक ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाशी सौम्य भाषेत संवाद साधताना दिसतात.

## संवादातील सहजता

सामान्यातील सामान्य माणूस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधू शकतो. त्या संवाद साधणाऱ्या प्रत्येकाला हा माणूस आपलाच आहे, असं वाटतं, हे खरं मुख्यमंत्र्यांचं मोठेपण आहे. मुख्यमंत्री म्हणून दीड वर्षांतच त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला आहे. महिला, उपेक्षित, गरीब, सामान्यांच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी मोठ्या धाडसाने घेतले. त्यामुळे सामान्यांचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील दुर्गम दरे तर्फ तांब येथून एकनाथ शिंदे यांचा प्रवास सुरू झाला. ठाण्यात रिक्षाचालकापासून विविध छोटी कामे करणारा सामान्य कार्यकर्ता ते राज्याचा मुख्यमंत्री हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी दीड वर्षांत अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत, विशेषतः सामान्य जनता व गोरगरिबांना दिलासा मिळेल, अशा योजना त्यांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर राबवल्या आहेत. सर्वसामान्यांची कामे स्थानिक पातळीवर व्हावीत, त्यांना विविध योजनांचे लाभ मिळावेत, यासाठी शासन थेट जनतेच्या दारात जात आहे.

## रुग्णसेवेची उत्कृष्ट कामगिरी

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबवण्यात येत आहे. राज्यभरातून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गरिबांसाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत एसटीचा प्रवास, महिलांसाठी एसटी बस प्रवासात ५० टक्के सवलत अशा निर्णयांमुळे मुख्यमंत्र्यांची सर्वसामान्यांमध्ये 'आपला माणूस' ही प्रतिमा उजळ झाली. राज्यातील एकही सर्वसामान्य-गोरगरीब, गरजू रुग्ण पैशाअभावी उपचाराविना राहणार नाही, याची काळजी मुख्यमंत्री जातीने घेतात. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून हजारो रुग्णांच्या जीवनात आरोग्याचा प्रकाश आणला आहे.

## विकासासाठी अहोरात्र झटणारा नेता

गडचिरोलीचे पालकत्व घेतल्यानंतर तिथल्या बैठकांना त्यांची हजेरी हा नेहमीच कौतुकाचा विषय असतो. रायगड जिल्ह्यातील महाडमध्ये एक इमारत कोसळून काही जण ठार झाले होते. अनेक मुले अनाथही झाली होती. मुख्यमंत्री शिंदेंनी घटनास्थळी केवळ भेट दिली नाही, तर ज्या दोन मुलांचे आईवडील गेले, त्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांच्या शिक्षणाची सोयही केली. त्याची कुठे फार वाच्यताही होऊ दिली नाही. कदाचित हीच त्यांची कामगिरी त्यांचा राजकीय जीवनाचा आलेख उंचावत असावी. महाडसारखी अनेक उदाहरणे कार्यकर्त्यांशी बोलताना जाणवतात. महाड असो, इर्शाळवाडी असो, मुख्यमंत्री शिंदे यांची माणुसकीची बाजू ठळकपणे समोर आली. केवळ मुख्यमंत्री नव्हे, तर महाराष्ट्रातील तमाम जनतेसाठी, त्यांच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा नेता अशीच त्यांची ओळख आता दृढ झाली आहे. दिलेला शब्द पाळण्याची त्यांची भूमिका आता महाराष्ट्रातील प्रत्येकाने ओळखली आहे. वचनपूर्ती करणारे हे नेतृत्व महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा देईल यात शंका नाही.

माध्यमकर्मी

### शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे

शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शेती व शेतकऱ्यांवर विशेष लक्ष आहे. शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, बळीराजा सुखी कसा राहील, यावर त्यांचा भर राहिला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारने गेल्या दीड वर्षांत शेतकऱ्यांना तब्बल ४४ हजार २७८ कोटी रुपयांची विक्रमी मदत केली आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूर, गारपीट अशा प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले आहे.



उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ९ हजार १९३ कोटी रुपये, रोजगार हमी योजनेसाठी २ हजार २०५ कोटी रुपये, मराठी विभागासाठी ७१ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १८ हजार १६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची वार्षिक योजना १ लाख ९२ हजार कोटी रुपयांची आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १५ हजार ८९३ कोटी रुपये, आदिवासी विकास उपयोजनेसाठी १५ हजार ३६० कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत.

राज्याचा हा अंतरिम अर्थसंकल्प असला तरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, युवक, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक अशा समाजातील सर्व घटकांना न्याय आणि विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात केला आहे. अंतरिम अर्थसंकल्पातही अर्थमंत्री अजित पवार यांनी शाश्वत, पर्यावरणपूरक, सर्वसमावेशक विकास साधण्याच्या राज्याच्या धोरणाला गती देण्यास प्राधान्य दिले आहे.

# सर्वसमावेशक विकास

**राज्याच्या २०२४-२५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत, तर विधानपरिषदेत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सादर केला. अर्थसंकल्पामध्ये ४ लाख ९८ हजार ७५८ कोटी रुपये महसुली जमा आणि ५ लाख ८ हजार ४९२ कोटी रुपये महसुली खर्च दाखवण्यात आला आहे. महसुली तूट ९ हजार ७३४ कोटी रुपयांची, तर राजकोषीय तूट ९९ हजार २८८ कोटी रुपयांची अंदाजित करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात चार महिन्यांचे लेखानुदान मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे.**

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने दिलेल्या दिशादर्शक अहवालानुसार आवश्यक धोरणांची अंमलबजावणीही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांकरिता मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक, नागरिकांचे जीवनमान उंचावण्याकरिता विकासयोजनांच्या अंमलबजावणीचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून केला आहे. या भाषणाचा संपादित भाग.

### कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांना अभिवादन

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून संपूर्ण महाराष्ट्र साजरा करतो आहे. 'कोलंबसाचे गर्वगीत', 'वेडात दौडले वीर मराठे सात', 'क्रांतीचा जयजयकार', 'स्वातंत्र्यदेवतेची विनवणी' यांसारख्या अजरामर कवितांतून मराठी मनाचे स्फुल्लिंग चेतवणाऱ्या कुसुमाग्रजांनी *कोटी कोटी असतील शरीरे, मनगट अमुचे एक असे, कोटी कोटी देहांत, आज या एक मनीषा जागतसे; एक प्रतिज्ञा, विजय मिळेतो राहील रण हे धगधगते।* यांसारख्या प्रेरक ओळी आपल्यासाठी लिहून ठेवल्या आहेत. कवी कुसुमाग्रजांना अभिवादन करून आणि तमाम मराठी मनांना आजच्या मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देऊन मी महाराष्ट्र शासनाचा सन २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प आपल्या अनुमतीने सभागृहाला सादर करतो आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चार महिन्यांच्या लेखानुदानाला मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाचा स्थायी खर्च आणि प्रगतिपथावरील योजनांच्या अंमलबजावणीकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या ४ महिन्यांच्या खर्चासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी मी राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे लेखानुदानाचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर करत आहे. कार्यक्रम आणि अनिवार्य खर्चाच्या नवीन बाबींचा समावेश करून लोकसभा निवडणुकीनंतर पुढील अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात येईल.





राज्यातील विकासकामांसाठी पुढील चार महिन्यात लागणाऱ्या आवश्यक खर्चाची तरतूद या अर्थसंकल्पातून केली जाणार असली, तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राचे मोठे योगदान असेल, हे दर्शविणारा हा अर्थसंकल्प आहे. यात दुर्बल घटक, शेतकरी, महिला, युवा अशा सर्वांचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या एक ट्रीलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची स्वप्नपूर्ती करण्यासाठी पुढे जाणारा हा अर्थसंकल्प आहे.

अयोध्या आणि जम्मू काश्मीर येथे महाराष्ट्र भवन उभारण्याचा निर्णय उत्साह वाढविणारा आहे. कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याचे राज्य शासनाचे धोरण असून दुष्काळासाठीदेखील सवलती देण्यात येत आहेत. जलसंपदा विभागासाठीदेखील चांगली तरतूद केल्याने धरणांच्या कामांना गती येईल. विविध स्मारके आणि पर्यटन स्थळांच्या विकास कामांनादेखील गती येण्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. बाहेरच्या राज्यातल्या मराठी मंडळांना विशेष अनुदान देणे, बेळगाव आणि गोवा येथे मराठी भाषा उपकेंद्र उभारण्याचा निर्णय, राज्यातील विविध देवस्थाने, तीर्थस्थळे, गडकोट किल्ले यांचे संवर्धन व विकास हादेखील विशेष प्राधिकरणाच्या माध्यमातून करणे हे महत्त्वाचे निर्णय आहेत. अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानात प्रत्येक जिल्ह्यात किमान एक लाख महिलांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ होणार आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन समन्यायी हिंदवी स्वराज्याचा पाया रचला. त्यांची ३९४वी जयंती आपण सर्वांनी नुकतीच उत्साहात साजरी केली. त्या निमित्त राज्याच्या प्रेरणादायी इतिहासाची साक्ष सांगणारा 'भव्य हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२४' पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्ये संपन्न झाला. मौजे वडज, तालुका जुन्नर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शिवनेरी संग्रहालय उभारण्याचे शासनाने निश्चित केले आहे. त्यात वस्तुसंग्रहालय, शिवकालीन गाव, किल्ल्यांच्या प्रतिकृती, खुले सभागृह इत्यादी बाबींचा समावेश असेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या शिवशकानुसार महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष राज्यात सध्या साजरे करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शिवरायांच्या अलौकिक व प्रेरणादायी कार्याचा प्रसार संपूर्ण राज्यात विविध कार्यक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

जगातल्या अनेक देशांनी महाराजांच्या सुशासन प्रणालीचे अनुकरण केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार असलेल्या महाराष्ट्रातील ११ गडकिल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाने युनेस्कोला पाठवला आहे.

केंद्र शासनाने राज्याला दिलेल्या सातत्यपूर्ण व भक्कम पाठबळासाठी भारताचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मी सुरुवातीलाच मन:पूर्वक आभार मानतो. राज्याला या आर्थिक वर्षात वस्तू व सेवा कराची ८,६१८ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळाली. भांडवली गुंतवणुकीकरिता विशेष साहाय्य योजनेंतर्गत ७ हजार ५७ कोटी ७३ लाख रुपयांचे ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज मंजूर झाले. राज्यात ६ वंदे भारत एक्सप्रेस रेल्वेसेवा सुरू झाल्या. केंद्र शासनाच्या सन २०२४-२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी १५ हजार ५५४ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी युवक, महिला, गरीब आणि अन्नदाता या चार प्रमुख घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना जाहीर केल्या आहेत. राज्यातील नागरिकांचे राहणीमान उंचावण्यासाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

शाश्वत, पर्यावरणपूरक व सर्वसमावेशक विकास साधण्याचे राज्याचे धोरण आहे. सन २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या संकल्पास अनुसरून राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान एक ट्रिलियन डॉलर करण्यासाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेच्या दिशादर्शक अहवालानुसार विकास धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी राज्यातील भांडवली गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढवण्यात येत आहे. पायाभूत सुविधांवर एक रुपया खर्च केला, तर स्थूल राज्य उत्पादनामध्ये २.५ ते ३.५ रुपयांची वाढ होते. राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम; जसे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महारेल; याशिवाय मुंबई, पुणे आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे, मेट्रोसाठी उभारलेल्या विविध विशेष हेतू कंपन्या, बृहन्मुंबई आणि अन्य महानगरपालिकांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचे अनेकविध प्रकल्प हाती घेऊन ते कालबद्धरीत्या पूर्ण करण्यात येत आहेत.

पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच सर्वसामान्य माणसांच्या जीवनात गुणात्मक बदल होतील, अशा लोककल्याणकारी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याने सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती साधली आहे. त्यातील काही ठळक बाबींचा उल्लेख सर्वांच्या माहितीसाठी इथे करणे आवश्यक आहे.

## शाश्वत विकास

### दळणवळण सुविधा

भारतातील सर्वाधिक, २२ किलोमीटर लांबीचा सागरी मार्ग, अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूचे लोकार्पण आणि ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्हपर्यंत किनारी मार्गाला जोडणाऱ्या दुहेरी बोगद्याच्या कामाचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. नरिमन पॉईंट ते वरळी या ११ किलोमीटर लांबीच्या किनारी मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या मार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ७० टक्के आणि इंधनामध्ये ३४ टक्के बचत

होईल. स्वातंत्र्यवीर सावरकर वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूचे काम प्रगतिपथावर असून त्या मार्गाचा विस्तार पालघरपर्यंत करण्याचे नियोजन आहे. विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्गाचा विस्तार ठाणे शहरापर्यंत करण्यात येणार आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला अनुसरून विकसित महाराष्ट्राला चालना देणारा अर्थसंकल्प शासनाने सादर केला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्प सर्वच घटकांचा विचार करणारा तसेच राज्याच्या समतोल विकासाचा आहे. सबका साथ सबका विकास या मंत्रावर आधारित हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, विविध समाज घटकांना मोठा दिलासा देणारा आहे. विदर्भातील सिंचन सुविधांसाठी २००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला सौर कृषिपंप योजना जाहीर करण्यात आली असून ८.५० लाख कृषिपंप पहिल्या टप्प्यात देण्यात येणार आहेत. ३७,००० अंगणवाड्यांना सुद्धा सौर ऊर्जेवर आणण्यात येणार आहे. दिव्यांगांसाठी ३४,४०० घरकुले बांधण्यात येणार आहेत. नागपूर विभागीय क्रीडा संकुलाला राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा देण्यात आला आहे. सर्वच पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी मोठी आर्थिक तरतूद यात करण्यात आली आहे.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गाकरिता २२ हजार २२५ कोटी रुपये, पुणे चक्राकार वळण मार्गाकरिता १० हजार ५१९ कोटी रुपये आणि जालना-नांदेड द्रुतगती महामार्गाकरिता २ हजार ८८६ कोटी रुपये भूसंपादनासाठी उभारण्यात येत आहेत. कोकणात रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी दरम्यानच्या सागरी महामार्गावरील ९ मोठ्या पुलांपैकी ३ पुलांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ते निविदा स्तरावर आहेत.

रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज या व अशा २२ पायाभूत विकास क्षेत्रातील प्रकल्प राबवण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळामार्फत ॲन्युईटी योजना विकास महामंडळ भाग-२ अंतर्गत ७,५०० किलोमीटर रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत. सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नगर विकास विभागास १० हजार ६२९ कोटी रुपये आणि सार्वजनिक बांधकाम (रस्ते) विभागास १९ हजार ९३६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

ग्रामीण भागातील दळणवळण अधिक गतिमान करण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-२ मधील १० हजार किलोमीटर रस्त्यांव्यतिरिक्त आणखी ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ७ हजार ६०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

भारतातील पहिली बुलेट ट्रेन, मुंबई ते अहमदाबाद या जलदगती रेल्वे मार्ग प्रकल्पाचे महाराष्ट्रातील भूसंपादन जवळपास पूर्ण झाले आहे. मुंबई महानगर प्रदेशात उभारावयाच्या ३३७ किलोमीटर लांबीपैकी २६३ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका मंजूर असून ४६.५ किलोमीटर लांबीच्या मार्गिका कार्यान्वित झाल्या आहेत. सुमारे सहा लाख प्रवासी दररोज या सुविधेचा लाभ घेत आहेत.

## रेल्वे प्रकल्प

राज्य शासनाच्या आर्थिक सहभागातून सुरू असलेली अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा देसाईगंज-गडचिरोली आणि नागपूर-नागभीड रेल्वे प्रकल्पाची कामे प्रगतिपथावर आहेत. कल्याण-मुरबाड, पुणे-नाशिक आणि सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन रेल्वे मार्गांसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. फलटण-पंढरपूर, कांपा-चिमूर-वरोरा, जालना-जळगाव आणि नांदेड-बिदर या नवीन रेल्वे मार्गांकरिता प्रकल्प किमतीच्या ५० टक्के आर्थिक सहभाग देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. जालना-खामगाव, आदिलाबाद माहूर मूर्तिजापूर-यवतमाळ शकुंतला रेल्वे आणि पुणे वाशिम, नांदेड हिंगोली, लोणावळा मार्गिका ३ व ४ या रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य शासन ५० टक्के आर्थिक सहभाग देईल.

## बंदर विकास

राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी जेएनपीटीचे सॅटेलाईट पोर्ट म्हणून वाढवण बंदर विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यात महाराष्ट्र सागरी मंडळाचा २६ टक्के समभाग आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत ७६ हजार २२० कोटी रुपये आहे. सागरमाला योजनेंतर्गत मुंबईत गेट वे ऑफ इंडियालगत रेडिओ क्लब येथे सुसज्ज जेट्टीचे, २२९ कोटी २७ लाख रुपये किमतीचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील भगवती बंदर येथे सुमारे ३०० कोटी रुपये, रायगड जिल्ह्यातील सागरीदुर्ग जंजिरा येथे सुमारे १११ कोटी रुपये; तसेच मुंबईजवळ एलिफंटा येथे सुमारे ८८ कोटी रुपये रकमेची बंदर विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत. रत्नागिरीतील मिरकरवाडा बंदराचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. त्याचा फायदा २,७०० मच्छीमारांना होणार आहे.

## विमानतळ विस्तार

अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील विमानतळाच्या सुमारे ५० हजार चौरस मीटरच्या अत्याधुनिक एकात्मिक टर्मिनल इमारतीचे काम लवकरच सुरू होईल. छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या विस्ताराकरिता भूसंपादनासाठी ५७८ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी भूसंपादन व पुनर्वसनासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. कोल्हापूर विमानतळाच्या विस्तारासाठी भूसंपादन सुरू असून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. अमरावती जिल्ह्यातील बेलोरा येथील विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण पूर्ण झाले आहे. रात्रीची विमानसेवा सुरू करण्यासाठीची कामे सध्या सुरू आहेत. नवी मुंबई विमानतळाचे काम वेगाने सुरू असून त्याचा पहिला टप्पा मार्च २०२५ पर्यंत कार्यान्वित होईल. सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ग्रामविकास विभागास ९ हजार

२८० कोटी रुपये, गृह-परिवहन, बंदरे विभागास ४ हजार ९४ कोटी रुपये आणि सामान्य प्रशासन विभागास १ हजार ४३२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## नवीन धोरणे

राज्यातील उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी औद्योगिक, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश व संरक्षण उत्पादन धोरणे सुधारित करण्यात येत असून नवीन सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरण तयार करण्यात येत आहे. जानेवारी २०२४ मध्ये स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित जागतिक रोजगार आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाचे १९ कंपन्यांसोबत सामंजस्य करार झाले असून, त्याद्वारे ३ लाख कोटींहून अधिक रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे दोन लाख रोजगार निर्मिती होणार आहे.

## वस्त्रोद्योग धोरण

राज्याचे 'एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८' जाहीर करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत प्रथमच अंत्योदय शिधापत्रिकेवर सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे एका कुटुंबास एका साडीचे मोफत वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे. औद्योगिक क्षेत्रात लघु-वस्त्रोद्योग संकुले स्थापन करण्यास भांडवली अनुदान देण्याची योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात १८ लघु-वस्त्रोद्योग संकुले स्थापन करण्यात येणार असून त्याद्वारे सुमारे ३६ हजार नवीन रोजगार अपेक्षित आहे.

## निर्यातीला प्रोत्साहन

निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमास ४५० कोटी आणि निर्यातक्षम घटकांना विशेष प्रोत्साहन देण्यासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. निर्यात वाढीसाठी राज्यात पाच इंडस्ट्रियल पार्क तयार करण्यात येत आहेत. सामूहिक प्रोत्साहन योजनेतून सुमारे ७ हजार कोटी प्रोत्साहन निधी वितरित करण्यात येणार आहे.

## रोजगार निर्मिती

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून २५ हजार उद्योग घटक रोजगार तयार करण्याचे उद्दिष्ट असून त्यातील ३० टक्के उद्योजक महिला असतील. या कार्यक्रमातून सुमारे ५० हजार नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. थ्रस्ट सेक्टरमधील उच्च तंत्रज्ञानावर आधारित १० अतिविशाल उद्योग घटकांना प्रणेता उद्योगाचा दर्जा आणि अतिरिक्त विशेष प्रोत्साहने देण्यात येतील. त्यामुळे राज्यात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक; तसेच २० हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

## युनिटी मॉल

'मेक इन इंडिया' धोरणांतर्गत 'एक जिल्हा, एक उत्पादन' संकल्पनेस अनुसरून नवी मुंबई येथे 'युनिटी मॉल' उभारण्यासाठी १९६ कोटी रुपये किमतीच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागास १ हजार २१ कोटी रुपये आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास १ हजार ९५२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## जलजीवन मिशन

'हर घर नल, हर घर जल' संकल्पनेनुसार ग्रामीण भागातील प्रत्येक घरात पिण्याचे शुद्ध पाणी 'जल जीवन मिशन' अभियानातून उपलब्ध करून देण्यासाठी १ कोटी ४६ लाख ६४ हजार ३८२ नळ जोडण्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. जानेवारी २०२४ पर्यंत त्यापैकी १ कोटी २२ लाख १० हजार ४७५ घरगुती नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. उर्वरित २४ लाख ५३ हजार ९०७ नळजोडण्या देण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

## अमृत २.०

अमृत २.० अभियानांतर्गत १४५ शहरांतील २८ हजार ३१५ कोटींचे ३१२ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यात पाणीपुरवठा, मलनिस्सारण, सरोवर पुनरुज्जीवन आणि हरित क्षेत्र विकास प्रकल्पांचा समावेश आहे.

## सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान सन २०३० पर्यंत राबवण्यात येणार आहे. या महाअभियानात सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश असून त्यांच्या वर्गीकरणानुसार शासनाकडून प्रकल्प किमतीच्या ५० ते ९५ टक्के निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या महाअभियानातून पाणीपुरवठा, मलनिस्सारण, रेल्वे ओव्हर ब्रिज, प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण इत्यादी कामे हाती घेण्यात येणार आहेत.




पालघर जिल्ह्यातील वसई, विरार शहरांतील १४ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ देणाऱ्या सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास ३ हजार ८७५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## पर्यावरण सेवा योजना

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव विकसित व्हावी; तसेच प्रत्यक्ष सेवा योजना कृतीच्या आधारे त्यांच्याकडून नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व्हावे यासाठी 'माझी वसुंधरा अभियानांतर्गत' सर्व जिल्ह्यातील शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना राबवण्यात येत आहे.

दरवर्षी सुमारे २५ हजार किलोमीटर राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाच्या दोन्ही बाजूंना वृक्षलागवड करण्याचे नियोजन आहे. अटल बांबू समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबूची लागवड करण्यात येणार आहे.

### जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ५,७०० गावांमधील १ लाख ५९ हजार ८८६ कामांना मंजुरी देण्यात आली असून १५,३८९ कामे पूर्ण झाली आहेत.



***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २४५ कोटी रुपये, वन विभागास २ हजार ५०७ कोटी रुपये आणि मृद व जलसंधारण विभागास ४ हजार २४७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### सौर ऊर्जा

सन २०३० पर्यंत एकूण ऊर्जा निर्मितीपैकी ४० टक्के ऊर्जा ही अपारंपरिक पद्धतीने निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यात रुफटॉप सोलर योजना राबवण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नवीन 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजने'अंतर्गत रुफटॉप सोलर पॅनल बसवण्यासाठी ७८ हजार रुपये मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना ३०० युनिटपर्यंतची वीज मोफत मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ७ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य गाठण्याचे नियोजन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होईल. शेतकऱ्यांसाठी 'मागेल त्याला सौर कृषिपंप' ही नवीन योजना सुरू करण्यात येईल. या योजनेंतर्गत ८ लाख ५० हजार नवीन सौर कृषिपंप बसवण्यात येतील.

पीएम-कुसुम योजनेंतर्गत यावर्षी एक लाख सौर पंप स्थापनेचे उद्दिष्ट असून त्यापैकी ७८,७५७ पंप आतापर्यंत कार्यान्वित झाले आहेत. राज्यात सर्व उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी पुढील दोन वर्षांत आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उपसा जलसिंचन योजनेंतर्गत ग्राहकांसाठी वीजदर सवलतीस एक वर्ष मुदतवाढ देण्यात येईल. वीज सेवा उपलब्ध नसलेल्या राज्यातील सुमारे ३७ हजार अंगणवाडी केंद्रांना सौर ऊर्जा संच देण्यात येणार आहेत. वन्य प्राण्यांद्वारे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानाला आळा घालण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सौर ऊर्जा कुंपणासाठी अनुदान देण्यात येणार आहे. या सर्व पर्यावरणस्नेही सौर ऊर्जा योजनांमुळे खनिज इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन प्रदूषणात घट होईल; तसेच हरित ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्य अग्रेसर होईल.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ऊर्जा विभागास ११ हजार ९३४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## सर्वसमावेशक विकास (शेतकरी/महिला/मागासवर्ग/युवा/गरीब)

### कृषी...

'नमो शेतकरी महासन्मान निधी योजना'अंतर्गत ८४ लाख ५७ हजार शेतकरी कुटुंबांना पहिल्या हप्त्यापोटी १ हजार ६९१ कोटी ४७ लाख रुपये अनुदान प्रदान करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२३ मध्ये 'एक रुपयात पीक विमा योजने'तून ५० लाख १ हजार शेतकरी अर्जदारांना २ हजार २६८ कोटी ४३ लाख रुपये विमा रक्कम अदा करण्यात आली आहे.



नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या ६ हजार कोटी रुपये किमतीच्या दुसऱ्या टप्प्यास मान्यता देण्यात आली आहे. वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत बीड जिल्ह्यातील मौजे जिरेवाडी, तालुका परळी वैजनाथ येथे सोयाबीन संशोधन व प्रक्रिया उपकेंद्र, शासकीय कृषी महाविद्यालय आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळी, मेंढी, वराह, कुक्कुट व वैरणविषयक योजनांचा लाभ शेतकरी व पशुपालकांना मिळावा यासाठी १२९ प्रकल्पांचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कृषी विभागास ३ हजार ६५० कोटी रुपये, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागास ५५५ कोटी रुपये आणि फलोत्पादन विभागास ७०८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### नैसर्गिक आपत्तीत मदत

खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्यातील ४० तालुक्यात दुष्काळ व १ हजार २१ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर

करून विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या ४४ लाख ८२ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ८२५ कोटी रुपयांची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानाकरिता जुलै २०२२ पासून १२ हजार ७६९ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मदत व पुनर्वसन विभागास ६३८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## सिंचन सुविधा

राज्यात २५९ सिंचन प्रकल्प सध्या प्रगतिपथावर आहेत. त्यापैकी ३९ प्रकल्पांची कामे पूर्ण होऊन २ लाख ३४ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. बळीराजा जलसंजीवनी योजनेतील ९१ प्रकल्पांपैकी ४६ प्रकल्प पूर्ण झाले असून मार्च २०२५ पर्यंत आणखी १६ प्रकल्प पूर्ण होणार आहेत. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पूर व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी जागतिक बँक साहाय्यित ३ हजार २०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत येत्या तीन वर्षांत राज्यातील २५ वर्षांपेक्षा जुन्या १५५ प्रकल्पांची दुरुस्ती; तसेच ७५ अपूर्ण सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यात येतील. याद्वारे ३ लाख ५५ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि २३.३७ टीएमसी पाणीसाठा निर्माण होईल. त्यासाठी १५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल. विदर्भासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्पाद्वारे ३ लाख ७१ हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार असून प्रकल्पासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

मराठवाड्यामध्ये ऊर्ध्व पैनगंगा, कृष्णा-मराठवाडा, लेंडी, जायकवाडी टप्पा-२, नांदूर मधमेश्वर, निम्न दुधना, विष्णुपुरी टप्पा-२ या मोठ्या प्रकल्पांसह ११ मोठे प्रकल्प, ८ मध्यम प्रकल्प व २९ लघु पाटबंधारे प्रकल्पाची कामे प्रगतिपथावर आहेत. नदीपात्रात पाणी अडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात बॅरेजची कामे हाती घेण्यात आली आहेत.

सुयोग्य जागेची आणि पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन मोठ्या जलविद्युत प्रमाणात उदंचन जलविद्युत प्रकल्प खासगी सहभागातून हाती घेण्यात येतील. खारभूमी विकास कार्यक्रमांतर्गत कोकण किनारपट्टीवर ३६ खारबंधाऱ्यांची कामे प्रगतिपथावर असून १२ कामे पूर्ण झाली आहेत. याद्वारे ९३८ हेक्टर क्षेत्र शेतीयोग्य करण्यात आले आहे. खारभूमी विकासासाठी ११३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. कोयना धरणाच्या बुडीत क्षेत्रातील शेवटच्या भागातील २३ गावांसाठी बंधारे बांधण्यात येतील.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता जलसंपदा, लाभक्षेत्र विकास व खारभूमी विभागास १६ हजार ४५६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## महिलांसाठी...

मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही नवी योजना १ एप्रिल २०२३ पासून सुरू करण्यात आली आहे. लाभार्थी मुलीला या योजनेतून तिच्या वयाच्या १८ वर्षांपर्यंत टप्याटप्याने एकूण १ लाख १ हजार रुपये मिळतील अशी तरतूद आहे. शहरी भागातील कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी नागरी बालविकास केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून, त्यामुळे अतितीव्र कुपोषित बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यास मदत होईल.

राज्यामध्ये 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान' राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ लाख महिलांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. १० मोठ्या शहरांतील ५ हजार महिलांना पिंक रिक्षा उपलब्ध करून देण्याची योजना प्रस्तावित आहे. राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची १४ हजार रिक्त पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महिला व बालविकास विभागास ३ हजार १०७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## आरोग्यसेवा

वाशिम, जालना, हिंगोली, अमरावती, भंडारा, गडचिरोली, वर्धा, बुलडाणा, पालघर, नाशिक; तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जळगाव, लातूर, बारामती, नंदूरबार, गोंदिया, कोल्हापूर आणि मिरज, जिल्हा सांगली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची शासकीय परिचर्या महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागपूरच्या धर्तीवर औंध, पुणे येथे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था-एम्स, स्थापन करण्याचे नियोजन आहे.



## जन आरोग्य योजना

राज्यातील सर्व कुटुंबांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली असून वार्षिक आरोग्य संरक्षणाची रक्कम प्रतिकुटुंब १ लाख ५० हजार रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. अंगीकृत रुग्णालयांची संख्या १ हजारावरून १ हजार ९०० करण्यात आली आहे. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांकरिता अपघात विमा योजना लागू करण्यात येत आहे. याचबरोबर राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये १५ खाटांचे अद्ययावत डे केअर केमोथेरपी सेंटर स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

शासकीय डायलिसीस केंद्र नसलेल्या २३४ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयांत डायलिसीस केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहेत आणि प्रत्येक तालुक्यात एक शववाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास २ हजार ५७४ कोटी रुपये आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागास ३ हजार ८२७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## मागास घटकांचा विकास

अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसाहाय्यात १,००० रुपयांवरून १,५०० रुपये वाढ करण्यात आली आहे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांच्या भागभांडवली अनुदानात वाढ करण्यात आली आहे.



दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूरांना उत्पन्नाचे कायमस्वरूपी साधन उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेतून शेतजमिनीचे वाटप करण्यात येते. स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना, तृतीयपंथी घटकांतील लाभार्थीसाठी बीजभांडवल योजना, मातंग समाजासाठी रमाई आवास योजना इत्यादी योजनांच्या माध्यमातून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत देवनार येथे 'लेदर पार्क', कोल्हापूर येथे चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्र तसेच प्रत्येक महसुली विभागात 'उत्कृष्टता केंद्रांची' स्थापना करण्यात येणार आहे. गोवंडी येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेच्या धर्तीवर मातंग समाजासाठी 'अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था' (आर्टी) स्थापन करण्यात येणार आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागास १८ हजार ८१६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### आदिवासी विकास उपयोजना

आदिवासी विकास उपयोजनेंतर्गत बालकांच्या पोषणामध्ये वाढ करण्यासाठी 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना', शासकीय आश्रमशाळांमध्ये विज्ञान केंद्रांची उभारणी करण्याकरिता 'नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान', वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना', घरकुले उपलब्ध करून देण्याकरिता 'शबरी आदिवासी घरकुल योजना', पाडे बारमाही रस्त्यांशी जोडण्याकरिता 'भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना', वस्त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना' आदी योजनांच्या माध्यमातून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता आदिवासी विकास विभागास १५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### एकसमानतेसाठी सर्वंकष धोरण

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या व इतर तत्सम संस्थांमार्फत कार्यान्वित असणाऱ्या योजनांतर्गत शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमांमध्ये एकसमानता आणण्याकरिता सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे.

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता आश्रमशाळा, विद्यानिकेतन, वसतिगृह योजना इत्यादींकरिता पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, संत शिरोमणी गोरोबा काका महाराष्ट्र मातीकला मंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ आणि पैलवान मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ इत्यादींमार्फत विकास योजना राबवण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजनेसाठी; तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. धनगर समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आदिवासी उपयोजनेच्या धर्तीवर २२ योजना राबवण्यात येत असून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बारा बलुतेदार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी 'संत गाडगेबाबा बारा बलुतेदार आर्थिक मागास विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणार आहे.

## अल्पसंख्याक विकास

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेच्या अनुदानात २ लाख रुपयांवरून १० लाख रुपयांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या मुदत कर्ज, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज आणि सूक्ष्म पतपुरवठा योजना राबवण्यासाठी राज्य शासनाद्वारे दिली जाणारी हमी ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागास आणि अल्पसंख्याक विकास विभागास ५ हजार १८० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## घरकूल योजना

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठीचे अनुदान ५० हजार रुपयांवरून १ लाख रुपये करण्यात आले आहे. ‘सर्वांसाठी घरे-२०२४’ धोरणांतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी नवीन घरकुल योजना राबवण्याचे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्यात ३४,४०० लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील सोलापूर जिल्ह्यातील रे नगर, कुंभारी प्रकल्पाच्या ३० हजार घरकुलांपैकी पहिल्या टप्यातील १५ हजार २४ सदनिकांचे वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. सफाई, विडी, बांधकाम, वस्त्रोद्योग आदी क्षेत्रातील असंघटित कामगार या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत.

## असंघटित कामगार कल्याण महामंडळ

ऑटो रिक्षा, टॅक्सी, प्रवासी तथा व्यावसायिक वाहन चालक, क्लीनर, डबेवाले, विडी कामगार, हमाल, घरेलु महिला कामगार, मच्छीमार, घरोघरी वृत्तपत्र वाटप करणारे; तसेच पशुसंवर्धन, यंत्रमाग, हातमाग, आरोग्य इत्यादी क्षेत्रातील कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ व्हावा, यासाठी असंघटित कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

## आनंदाचा शिधा

गुढीपाडवा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यातील १ कोटी ५८ लाख ९५ हजार ८६७ कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे. श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्तही ‘आनंदाचा शिधा’ वितरित करण्यात येत आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृहनिर्माण विभागास १ हजार ३४७ कोटी रुपये, दिव्यांग कल्याण विभागास १ हजार ५२६ कोटी रुपये, कामगार विभागास १७१ कोटी रुपये आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास ५२६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## युवा कल्याण

खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील कामगिरी उंचावण्यासाठी ‘मिशन विकास लक्ष्यवेध’ योजनेंतर्गत राज्यस्तरावर उच्च कामगिरी केंद्र, विभागीय स्तरावर क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र अशी प्रशिक्षणाची त्रिस्तरीय यंत्रणा उभारण्यात येणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक मिळवणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंच्या पारितोषिक रकमेत १० पट वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदकासाठी १ कोटी रुपये, रौप्यपदकासाठी ७५ लाख रुपये आणि कांस्यपदकासाठी ५० लाख रुपये पारितोषिके देण्यात येत आहेत. नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा व इतर आनुषंगिक सुविधांचा समावेश करण्यात येणार असून त्याला राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा देण्यात आला आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता क्रीडा विभागास ५३७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## कौशल्य विकास



शासनाने संशोधन, आरोग्य, कृषी विकास, कौशल्य विकास आणि हवामान या क्षेत्रात गुगल, इन्फोसिस, नॅसकॉम, बर्मिंगहॅम विद्यापीठ, ब्रिटिश कौन्सिल, युनिसेफ अशा नामांकित संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत. ‘महाराष्ट्र ड्रोन मिशन’ राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. सध्या १३ ठिकाणी जिल्हास्तरीय आणि ६ ठिकाणी विभागीय ड्रोन केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या ५ वर्षांच्या अंमलबजावणीसाठी २३८ कोटी ६३ लाख रुपये अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. मुंबईतील वरळी येथे ‘आधुनिक प्रशिक्षण व कौशल्य विकास भवन’ उभारण्यात येईल.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागास २ हजार ९८ कोटी रुपये आणि शालेय शिक्षण विभागास २ हजार ९५९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## दक्ष प्रकल्प

व्यावसायिक शिक्षण, नावीन्यता व कौशल्यवृद्धीविषयक योजनांची अंमलबजावणी; तसेच गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा आणि कार्यप्रणालीच्या बळकटीकरणासाठी जागतिक बँक साहाय्यित मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष) या २ हजार ३०७ कोटी रुपयांच्या प्रकल्पास शासनाने मंजुरी दिली आहे.

### कौशल्य विकास केंद्र

युवकांना रोजगारक्षम आणि उद्योगक्षम बनविण्यासाठी प्रत्येक महसुली विभागामध्ये 'आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्रे' आणि 'संत गाडगेबाबा स्वच्छ भारत कौशल्य प्रबोधिनी' सुरू करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त राज्यात नवीन २ हजार 'प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र' स्थापन करण्यात येत असून १ हजार महाविद्यालयांमध्ये 'कौशल्य विकास केंद्र' सुरू करण्यात येणार आहेत.

उद्योगांना आवश्यक तंत्रज्ञानाशी अनुरूप कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र कोराडी, नागपूर येथे उभारण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील ५०० युवक-युवतींना पर्यटन व आदरातिथ्य प्रशिक्षण क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षणासाठी मान्यता देण्यात आली आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कौशल्य, नावीन्यता, रोजगार व उद्योजकता विकास विभागास ८०७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### पर्यटन विकास

पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येईल. राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट्स, शॉपिंग मॉल, वॉटर पार्क आणि निवास व्यवस्था करण्यात येत आहेत. लोणार, जिल्हा बुलडाणा, अजिंठा वेरुळ, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, कळसुबाई - भंडारदरा, जिल्हा अहमदनगर, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक; तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. लोणावळा, जिल्हा पुणे येथे ३३३ कोटी ५६ लाख रुपये अंदाजित किमतीचा जागतिक दर्जाचा स्कायवॉक प्रकल्प उभारण्यात येईल.



शिवसागर जलाशय, जिल्हा सातारा, गोसीखुर्द जलाशय, जिल्हा भंडारा; तसेच वाघुर जलाशय, जिल्हा जळगाव येथे नावीन्यपूर्ण जल पर्यटन प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. तसेच कोकण विभागातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नूतनीकरण व संवर्धन करण्यात येणार आहे.

### महाराष्ट्र भवन

राज्यातील पर्यटकांना आणि भाविकांना किफायतशीर दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरवण्यासाठी श्रीनगर, जम्मू-काश्मीर आणि श्रीराम जन्मभूमी, अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही ठिकाणी तेथील राज्य शासनांनी मोक्याच्या जागा उपलब्ध करून दिल्या असून या जागांसाठी ७७ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

### महाविस्टा

मंत्रालय आणि परिसरातील शासकीय इमारतींचा अत्याधुनिक सुविधांसह पुनर्विकास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वास्तुरचनाकारांकडून प्रस्ताव मागवण्यात येणार आहेत.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सांस्कृतिक कार्य विभागास १ हजार १८६ कोटी रुपये, पर्यटन विभागास १ हजार ९७३ कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभागास १ हजार ३६७ कोटी रुपये आणि महसूल विभागास ४७४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### विधि व न्याय

राज्यात नवीन १० अतिरिक्त कुटुंब न्यायालये, ५ जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये, ५ दिवाणी न्यायालये आणि २ ग्राम न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पोलीस शिपायांच्या १८ हजार ३३१ रिक्त पदावर भरती करण्यात आली असून आणखी १७ हजार ४७१ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्य शासनामार्फत 'सायबर सुरक्षा प्रकल्प' राबवण्यास मान्यता देण्यात आली असून त्याची अंदाजित किंमत ८३७ कोटी ८६ लाख रुपये आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता विधि व न्याय विभागास ७५९ कोटी रुपये, गृह (पोलिस) विभागास २ हजार २३७ कोटी रुपये आणि उत्पादन शुल्क विभागास १५३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### वस्तू व सेवा कर

राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात वस्तू व सेवा कर विभागाचा वाटा ६५ टक्के आहे. या विभागाची पुनर्रचना आवश्यक असून ती तातडीने करण्यात येईल. विभागासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त कर प्रशिक्षण अकादमी स्थापन करण्यात येईल. वस्तू व सेवा कर भवनाचे वडाळा, मुंबई येथील बांधकाम प्रगतिपथावर आहे.

### स्वातंत्र्य निवृत्तिवेतनात वाढ

स्वातंत्र्यसैनिकांचे निवृत्तिवेतन प्रतिमाह १० हजार रुपयांवरून दुप्पट म्हणजे २० हजार रुपये करण्यात आले आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वित्त विभागास २०८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

### स्मारक आणि तीर्थक्षेत्र विकास

- स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता. हवेली व समाधी स्थळ वढू बुद्रुक, तालुका शिरुर, जिल्हा पुणे येथील स्मारकाच्या सुमारे २७० कोटी रुपये किमतीच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली असून काम सुरू आहे.
- देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले औंढा नागनाथ,


जिल्हा हिंगोली, साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्रीक्षेत्र माहूरगड, जिल्हा नांदेड आणि एकवीरा देवी मंदिर, जिल्हा पुणे या तीर्थक्षेत्र व परिसर विकासासाठी विशेष विकास प्राधिकरणे स्थापन करण्यात येतील.

- श्री क्षेत्र सप्तश्रृंगी गड, तालुका कळवण या तीर्थस्थळाच्या ८१ कोटी ८६ लाख रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी २० कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंदिरे, बारवांचे जतन व संवर्धन योजनेसाठी ५३ कोटी रुपये निधी प्रस्तावित.
- महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकांसाठी पुणे शहराच्या विकास योजनेत क्षेत्र आरक्षित करण्यात आले असून स्मारकांचा आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- धाराशिव जिल्ह्यात संत गोरोबाकाका महाराज यांच्या स्मारकासाठी शासकीय जमीन व निधी उपलब्ध करून देणार.
- मौजे सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे येथील श्री संत जगनाडे महाराज यांच्या समाधीस्थळाच्या विकासासाठी ६६ कोटी ११ लाख रुपयांच्या कामांना मान्यता.
- साने गुरुजींची कर्मभूमी असलेल्या अंमळनेर जिल्हा जळगाव येथे त्यांच्या कार्याला साजेसे स्मारक उभारण्यात येईल.
- राजगुरुनगर येथील हुतात्मा श्री शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकासासाठी पहिल्या टप्प्यात १०२ कोटी ४८ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी वीर जीवा महाला यांच्या स्मारकासाठी प्रतापगडाच्या पायथ्याशी जागा उपलब्ध करून देणार.
- पुणे महानगरपालिकेमार्फत संगमवाडी, पुणे येथे लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
- राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या मौजे पाल खुर्द, तालुका वेल्हे येथील राजमाता सईबाई स्मृतिस्थळ विकास आराखड्यातील २९ कोटी ७३ लाख रुपये रकमेच्या कामांना मान्यता.
- इंदापूर शहरातील मालोजीराजे भोसले यांची गढी व हजरत चाँद शाह वलीबाबा दर्गा परिसर विकासासाठी ३७ कोटी २८ लाख रुपये रकमेच्या कामांना.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ९ हजार १९३ कोटी रुपये आणि रोजगार हमी योजना प्रभागासाठी २ हजार २०५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## मराठी भाषा

महाराष्ट्राबाहेर मराठी भाषेचे संवर्धन करणाऱ्या मराठी मंडळांना अनुदान देण्यात येईल. मराठी मंडळांच्या इमारती, वास्तू व स्मारकांच्या संवर्धनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. गोवा व दिल्लीप्रमाणेच बेळगाव, कर्नाटक येथे मराठी भाषा उपकेंद्र स्थापन केले जाईल, त्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.



रिद्धपूर, जिल्हा अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. 'मंगेश पाडगावकर कवितेचे गाव' हा उपक्रम वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे राबवण्यात येणार असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. मुंबईतील गिरगाव येथे मराठी भाषा भवनाचे काम कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहे.

***सन २०२४-२५ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता माहिती तंत्रज्ञान विभागास ९२० कोटी रुपये, माहिती व जनसंपर्क विभाग, विधानमंडळ सचिवालयास प्रत्येकी ५४७ कोटी रुपये आणि मराठी भाषा विभागास ७१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.***

## जिल्हा वार्षिक योजना

सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. हा नियतव्यय २०२४-२५ मागील वर्षाच्या तुलनेत २० टक्क्यांनी अधिक आहे. वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या १५ हजार ८९३ कोटी रुपये आणि आदिवासी विकास उपयोजनेच्या १५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

## अर्थसंकल्पीय अंदाज

सन २०२४-२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. महसुली जमा ४ लाख ९८ हजार ७५८ कोटी रुपये आणि महसुली खर्च ५ लाख ८ हजार ४९२ कोटी रुपये प्रस्तावित केला आहे. परिणामी ९ हजार ७३४ कोटी रुपये महसुली तूट अपेक्षित आहे.

## राजकोषीय तूट

राज्याची राजकोषीय तूट आणि महसुली तूट राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेच्या आत ठेवण्यात शासन यशस्वी ठरले आहे. सन २०२४-२५ ची राजकोषीय तूट ९९ हजार २८८ कोटी रुपये आहे.

राज्याच्या आर्थिक विकासासाठी आणि समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल.

**(महाराष्ट्र शासनाच्या २०२४-२५ या वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला.)**

# विकसित महाराष्ट्र, विकसित भारत

**वर्षा फडके-आंधळे**

महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचे ध्येय ठेवून राज्य सरकार काम करत आहे. गेल्या १९ महिन्यांत या सरकारने अनेक विकासाची कामे केली, निर्णय घेतले आणि धडाक्याने या निर्णयांची अंमलबजावणीदेखील केली आहे. राज्य सरकारने निश्चित केलेल्या विकासाचा रोड मॅप सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवत आहे. या सरकारने शिक्षण, आरोग्य, शेती, सिंचन, पायाभूत सुविधा, परिवहन, ऊर्जा, पर्यटन, पर्यावरण, सामाजिक न्याय, क्रीडा, आदिवासी, अल्पसंख्याक याबरोबरच सांस्कृतिक कार्य आणि मराठी साहित्य क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने गेल्या दीड वर्षात विविध क्षेत्रात विकासाचे भरीव निर्णय घेतले आहेत. पायाभूत सुविधा, उद्योग, कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण, महिला, सामाजिक न्याय अशा विविध क्षेत्रांमध्ये घेतलेल्या निर्णयांनी महाराष्ट्राची घोडदौड वेगाने सुरू आहे. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. या कराराच्या अंमलबजावणीतून राज्यातील विकासाच्या वाटा प्रशस्त होणार आहे. 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'ला बळकटी मिळतानाच राज्यात रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होणार आहेत.**

## 'शासन आपल्या दारी'

'शासन आपल्या दारी' या मोहिमेच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना जनतेच्या घरापर्यंत शासनाने नेल्या आहेत. या मोहिमेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५ हजार लाभार्थ्यांना एका छताखाली लाभ देण्याचा संकल्प शासनाने केला होता, मात्र, यापेक्षा अधिक लाभार्थ्यांना लाभ दिला जात आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे २ कोटी १ लाख ९१ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना या अभियानाचा लाभ मिळाला आहे.

## पायाभूत सुविधांची पायाभरणी

महाराष्ट्राच्या दळणवळण, कृषी, व्यापार, पर्यटन, उद्योग आणि रोजगार निर्मितीसाठी पायाभूत सुविधांचे जाळे महत्त्वाची भूमिका बजावत असते. महाराष्ट्र विकासपथावर नेहमीच अग्रेसर राहिला आहे, याची प्रचिती आपल्याला 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' पहिला की नक्की येईल. देशातील सर्वात जास्त लांबीच्या ठरलेल्या सागरी सेतूचे काही दिवसांपूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

मेट्रो, अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू, मुंबई पुणे एक्सप्रेस वे मिसिंग लिंक हे महाराष्ट्रात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात सरस ठरले आहेत. काही दिवसांपूर्वीच प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १७,२०० कोटी रुपये खर्चाच्या सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पायाभरणी झाली. आशियातील सर्वात मोठ्या समूह पुनर्विकास योजनेचा ठाण्यात शुभारंभ झाला आहे. मुंबई कोस्टल रोडचे सुमारे ८३.६५ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांना गती देण्यात येत आहे.



'शासन आपल्या दारी' अंतर्गत विविध योजनांचे लाभ वाटप करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी मान्यवर.

## संपूर्ण स्वच्छता मोहीम

मुंबई शहर व परिसरात 'डीप क्लिनिंग' मोहिमेत मोठ्या प्रमाणावर स्वच्छतेची कामे करण्यात येत आहेत. यामुळे मुंबईतील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यात संपूर्ण स्वच्छता अभियान राबवण्यात येत असून स्वच्छता अभियान केवळ कागदावर न राहता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यावर भर देण्यात आला आहे.

मुंबईतील प्रदूषणाचा निर्देशांक कमी झाला आहे. प्रदूषण रोखण्यासाठी 'अर्बन फॉरेस्ट' तयार करण्यात येत असून याअंतर्गत पश्चिम आणि पूर्व या दोन्ही द्रुतगती मार्गांवर; तसेच सर्व महामार्गांच्या दुतर्फा बांबू लागवडीचा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानांतर्गत

## महाराष्ट्राचा विकास हाच ध्यास

'सर्वसामान्य जनतेचे कल्याण' हे एकमेव ध्येय समोर ठेवून राज्यातील आमचे सरकार काम करत आहे. या सरकारने आपल्या कार्यकाळात राज्यातील जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. राज्यात कृषी, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, रोजगार, दळणवळण, सिंचन, माहिती तंत्रज्ञान, ग्रामविकास, ऊर्जा व सामाजिक न्याय या विषयांना प्राधान्यक्रम देत 'महाराष्ट्र गतिमान' ठेवण्यासाठी विविध निर्णय घेतले आहेत. 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून सरकार खऱ्या अर्थाने लोकाभिमुख झाले आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देऊन सरकारने बळीराजाला मदतीचा हात दिला आहे. महिलांना एस. टी. प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे, तर ७५ वर्ष पूर्ण केलेल्या ज्येष्ठांना मोफत बस प्रवास सवलत दिली आहे, याचा कोट्यवधी महिला, ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलमध्ये साकारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम प्रगतिपथावर आहे. नागपूरच्या दीक्षाभूमी विकासासाठी २०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. केंद्राच्या किसान सन्मान योजनेत राज्य शासनाने आणखी ६ हजार रुपयांची भर घालून आता १२ हजार रुपये देणारी नमो शेतकरी महासन्मान योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्याची अंमलबजावणीसुद्धा केली आहे. महाराष्ट्र सिंचनयुक्त करण्यावर आमचा भर असून ६५ प्रकल्पांना तब्बल ६६ हजार कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. त्यामुळे आता सिंचनाचे प्रकल्प मार्गी लागून १० लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. यातून आपल्या विदर्भातील अनुशेष दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्वयंसहायता गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे मूल्यवर्धन करणे, गुणवत्तेत वाढ करणे, आधुनिक पॅकेजिंग व ब्रँडिंगकरिता प्रोत्साहन देणे व उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देणे, इत्यादी उपक्रम राबवून ग्रामीण महिलांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही देतो.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

## महत्त्वाचे निर्णय

- संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्य एक हजार रुपयांवरून दीड हजार रुपये करण्यात आले आहे.
- शेतीला दिवसा वीज पुरवठ्यासाठी ३ वर्षांत ३० टक्के वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण.
- कुसुम योजनेचा घटक अंतर्गत ७४,८०८ सौर कृषी पंप राज्यात महाऊर्जाद्वारे आस्थापित झाले.
- महाराष्ट्रात मुंबई (एमएमआर), नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, दिघी येथे ५ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येतील.
- जालना येथे 'मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.
- वाढवण बंदराच्या उभारणीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीही होणार आहे.
- महाराष्ट्र सागरी विकास मंडळ धोरण २०२३ यामुळे जलमार्गासंबंधित व्यापार आणि उद्योगांसाठी विविध सुविधा निर्माण होतील.
- राज्यातील प्रमुख खाणपट्टे ई-लिलावासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राज्याच्या महसुलात भर पडणार आहे.
- एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर करण्यात आले. कापूस प्रक्रिया क्षमता ३० टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.
- राज्यातील नागरिकांच्या सर्व तपशीलांचा समावेश असलेले केंद्रीकृत डाटा हब तयार करण्यात येणार आहे. सर्व ग्रामपंचायती उच्च क्षमतेच्या फायबर नेटवर्कने जोडण्यात येत आहेत. शहरी महानेट अंतर्गत सर्व शहरी कार्यालये जोडण्यात येणार आहेत.
- स्वच्छ महाराष्ट्र सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्र सर्वप्रथम
- प्रधानमंत्री आवास योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता (ईडब्ल्यूएस) ८,००,०९८ घरकुलांना मंजुरी.
- खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित (Pot Hole Complaint Redressal System) या ॲपद्वारे सर्व नागरिकांना खड्ड्यांसंबंधी तक्रारी नोंदवण्याची सुविधा मिळणार आहे.
- अमरावती, पुणे, नागपूर, बेलापूर येथे एकूण १० अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यास व पदनिर्मितीस मान्यता.
- नवीन पेन्शन योजनेतील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास कुटुंब निवृत्तिवेतन देण्याचा पर्याय देण्यात आला आहे.
- पेट्रोलच्या करात पाच रुपये प्रति लिटर आणि डिझेलच्या करात कपातीमुळे राज्यातील जनतेला सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या करातून दिलासा.
- सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या क्लस्टरला प्रोत्साहन.



अवकाळीग्रस्त शेतकरी यांना धनादेश वाटप करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी मान्यवर.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगराच्या विविध विभागांच्या स्वच्छतेचा आढावा घेतला आणि स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

## 'महाराष्ट्र' देशाचे ग्रोथ इंजिन

राज्याच्या विकासाला निश्चित दिशा देण्यासाठी नीती आयोगाच्या धर्तीवर 'मित्रा'ची स्थापना करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला 'पाच मिलियन डॉलर्स'ची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न पाहिले आहे. यामध्ये महाराष्ट्र 'एक मिलियन डॉलर्स'चा सहभाग देईल, असे उद्दिष्ट ठरवण्यात आले असून यासाठी राज्य शासन काम करत आहे. उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता राज्यात आहे. राज्यात उद्योगासाठी पोषक वातावरण आहे. केंद्र शासनाकडून जाहीर झालेल्या थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) सहभागात महाराष्ट्र हे देशातील प्रथम पसंतीचे राज्य ठरले आहे.

देशातील एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या २९ टक्के गुंतवणूक राज्यात आली आहे. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणुकीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. या कराराच्या अंमलबजावणीतून राज्यातील विकासाच्या वाटा प्रशस्त होणार आहेत.

## व्यक्तिमत्त्व विकासावर भर

विद्यार्थ्यांसाठी चाकोरीबाहेरील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना बाहेरच्या जगाची ओळख व्हावी, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला हातभार लागावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शालेय पुस्तकांमध्ये सरावासाठी कोरी पाने देऊन विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यात आले आहे. याशिवाय सर्व शाळांमध्ये 'मुख्यमंत्री माझी शाळा - सुंदर शाळा' हे स्पर्धात्मक अभियान सुरू करण्यात आले आहे. मातृभाषेतून विषयावर भर देताना विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करण्यात आली. लहानपणापासून मुलांना आजी-आजोबांचे महत्त्व समजण्यासाठी सर्व शाळांमध्ये १० सप्टेंबरला 'आजी-आजोबा दिवस' साजरा करण्यात येत आहे.

## युवा महोत्सव

शासनाने राज्यातील क्रीडा संस्कृती जपण्याला प्राधान्य दिले आहे. खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी मिशन लक्ष्यवेध राबवले. बालेवाडी पुणे येथे स्पोर्ट्स सायन्स सेंटर उभारण्यात येणार असून छत्रपती संभाजीनगर येथे नवीन क्रीडा विद्यापीठ मंजूर करण्यात आले आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक विजेत्यांसाठी पुरस्कार रकमेत वाढ करण्यात आली. नुकत्याच झालेल्या युवा महोत्सवाचे नाशिक येथे यशस्वी आयोजन करण्यात आले.

## तृतीयपंथी विद्यार्थ्यांना माध्यमिक शुल्क माफ

राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. १९४९ महाविद्यालये व ३५ विद्यापीठे यांचे नॅक मूल्यांकन व मानांकन प्रक्रियेत महाराष्ट्र अव्वल स्थानावर आहे. सर जे.जे कला आणि वास्तुशास्त्र महाविद्यालयाला अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. तृतीयपंथी विद्यार्थ्यांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आधिपत्याखालील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे. याशिवाय भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यात रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग : महाराष्ट्र पहिले राज्य

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग या प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २५० शासकीय आदिवासी आश्रमशाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याच्या योजनेस सुरुवात करण्यात आली आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी सुधारित शिष्यवृत्तीत योजनेत ५० हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. अल्पसंख्याक महिलांचे नवीन २,८०० बचतगट

तयार करण्यात आले आहे. राज्यामध्ये स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्यात आले आहे, त्यासाठी २,०६३ पदांची निर्मिती करण्यात आली असून १,१४३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरेल आहे.

## कौशल्य प्रशिक्षणावर भर

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांच्या आयोजनाद्वारे २ लाख ४९ हजार २४७ हून अधिक उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासाठी पनवेल येथे अद्ययावत इमारत; तसेच गोंडवाना विद्यापीठात इनक्युबेटरची स्थापना करण्यात येत आहे. यावर्षी ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. राज्यात ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या माध्यमातून ५५ हजार रोजगार निर्माण करण्यात येणार आहेत.

## लोकहितासाठी प्रयत्नशील

विद्यमान सरकार हे सर्वसामान्य, गोरगरीब जनतेला न्याय देणारे सरकार आहे. राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारने विद्यमान सरकार स्थापन झाल्यापासून अनेक लोकहिताचे उपक्रम राबवले. अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. या सरकारने जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षांवर खरे उतरण्याचा, जनतेचा विश्वास सार्थ ठरवण्याचा निष्ठापूर्वक, प्रामाणिक प्रयत्न केला आहे. कृषी, उद्योग, वीज, व्यापार, शिक्षण, सहकार, साहित्य, कला, नाट्य, संस्कृती, पर्यटन इ. क्षेत्रांत महाराष्ट्र राज्याचे अव्वल स्थान कायम राहावे, समाजात एकता, समता, बंधुतेची भावना वाढावी, सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही प्रयत्नशील आहोत.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



## बळीराजाच्या हितासाठी विविध निर्णय

- स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशनला मजबूत करणार. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी टास्क फोर्सला बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. समृद्धी महामार्गामुळे विदर्भ - मराठवाडा असे ३ टुरिझम सर्किट तयार करणार आहोत.
- विदर्भ, मराठवाड्यात कापूस आणि सोयाबीन मूल्यसाखळ्या विकसित. यात २३८ कोटी ८९ लाख कापसासाठी आणि २८१ कोटी ९७ लाख तेलबिया व सोयाबीनसाठी.
- कापसासाठी ५०० व सोयाबीनसाठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात येणार आहे.
- **धानाला बोनस :** गेल्या वर्षी १५ हजार रुपये प्रति हेक्टर दोन हेक्टरपर्यंत बोनस दिला होता. आता यंदासाठी २० हजार रुपये बोनस. ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळेल.
- आत्महत्याग्रस्त विदर्भ, मराठवाड्यात बळीराजा जलसंजीवनी योजना राबवण्यात येत आहे. ९१ प्रकल्पांचा समावेश.
- शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता आम्ही एनडीआरएफच्या दराच्या दुप्पट दराने शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला. २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टर केली. पिकांच्या नुकसानाकरिता एसडीआरएफचे मदतीचे दर २०१५ पासून सुधारण्यात आले नव्हते. ते सुधारित करून वाढीव दराने मदत केली आहे.
- अतिवृष्टी व पुरामुळे पिकांच्या नुकसानाकरिता ७,१९६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला.
- सततच्या पावसामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी केंद्राचा निकष बदलला. विशेष बाब म्हणून सततच्या पावसामुळे होणाऱ्या नुकसानाकरिता सुरुवातीला ७५५ कोटी ६९ लाख आणि नंतर १ हजार ५०० कोटी रुपये मंजूर केले. सुमारे ३६ लाख शेतकऱ्यांना २ हजार २५५ कोटी ६९ लाख इतका निधी गेल्या वर्षी मंजूर.
- जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेला अवेळी पाऊस, अतिवृष्टी व पूर यासाठी आतापर्यंत १,७५७ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. यंदा गेल्याच महिन्यात नोव्हेंबरमध्ये ३२ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला. यात दुप्पट दराने मदतीचा निर्णय घेतला आहे. हेक्टरी मर्यादा वाढवली. यामुळे १,८५१ कोटींचा अतिरिक्त खर्च होणार आहे.
- केंद्राच्या निकषात न बसलेल्या; परंतु कमी पाऊस झालेल्या राज्यातील १,०२१ महसूल मंडळात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. या मंडळातील शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन, चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट यांसारख्या विविध ८ सवलती लागू केलेल्या आहेत.
- शेतकऱ्यांकरिता नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना त्याकरिता ५,७०० कोटींची तरतूद. पहिला हप्ता म्हणून ८५ लाख ६० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर राज्याचे प्रत्येकी ६ हजार रुपये याप्रमाणे १,७२० कोटी रुपये जमा.
- केवळ १ रुपयात पीकविमा. खरीप हंगामासाठी राज्यातील १ कोटी ७० लाख व रब्बी हंगामात ६६ लाख अशा एकूण २ कोटी २३ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत विक्रमी सहभाग नोंदवला.

## वैद्यकीय सुविधांचे जाळे

राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारलेले असून याबाबत कार्यवाही सुरू आहे. राज्यातील शासकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येत आहे.

## पाच लाखांचे आरोग्य कवच

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार देण्यात येत आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती आता १.५० लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. याशिवाय २०० रुग्णालयांत ही योजना लागू करण्यात आली आहे.

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

मुंबईमध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आले आहेत. राज्यात ७०० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि पॉलिक्लिनिक सुरू करण्यात येत आहे. आतापर्यंत २०० हून अधिक आरोग्य केंद्रे कार्यरत करण्यात आली आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजना एकत्रित करण्यात आली आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष

मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळत आहे. गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षातून थेट अर्थसाहाय्य मिळत आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत आहे, मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाने अवघ्या १८ महिन्यांत २१ हजारपेक्षा अधिक गोरगरीब - गरजू रुग्णांना एकूण १८० कोटी रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे.

'आयुष्मान भारत' पंधरवड्यात आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. आशा स्वयंसेविकांच्या मानधनात भरीव वाढ, मेळघाटसाठी ४४ कलमी कार्यक्रमांची अंमलबजावणी; तसेच औषध खरेदी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. 'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमातून वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

## बळीराजाच्या हिताला प्राधान्य

राज्य शासनाने मागील पावणेदोन वर्षांच्या काळात बळीराजाच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करण्याची सुविधा देण्यात आली आहे. आतापर्यंत ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे २१०० कोटी रुपयांहून अधिक नुकसानभरपाई देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत राज्य शासन आता आपले अनुदान देत आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत पात्र शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्षी १२ हजार रुपये देत असून यामध्ये राज्य शासन प्रति शेतकरी ६ हजार रुपये देत आहे. आतापर्यंत १. १५ कोटी शेतकरी कुटुंबांना याचा लाभ मिळाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजना आणण्यात आली असून सन २०२३-२४ या वर्षासाठी मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. आता मागेल त्याला फळबाग, ठिबक/उबार सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण याचा समावेश करून एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर याची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपुरात कृषी सुविधा केंद्र, विदर्भात संत्राप्रक्रिया केंद्र उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रात पौष्टिक तृणधान्य अभियान सुरू असून यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात शेतकऱ्यांना १२३ कोटी रुपयांचे अधिक अनुदान मान्य करण्यात आले आहे.



**कर्जत येथील नवीन प्रशासकीय भवनाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.**

आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष योजनेंतर्गत मिलेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नुकसानग्रस्त कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्यात आले. ११६ बाजार समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यात येतो. आतापर्यंत १४.३१ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर ५,१९० कोटी रुपये देण्यात आले. भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४,७८८ शेतकऱ्यांच्या ९६४.१५ कोटी रुपये थकित कर्जाची रक्कम माफ करण्यात आली. सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृद्धीसाठी अटल अर्थसाहाय्य योजनेस मुदतवाढ देण्यात आली. महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पासाठी १९०.७० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

## अतिवृष्टी, पूरग्रस्तांना मदतीच्या दुप्पट रक्कम

सततचा पाऊस ही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करण्यात आली आहे. शेती पंपांच्या नुकसानीसाठी १५०० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. पिकांच्या नुकसानासाठी बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर मदत करण्यात येत आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन आराखडा २०२३ अंतर्गत अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल अर्थात एनडीआरएफ मदतीच्या दुप्पट रक्कम देण्यात येणार आहे. तसेच आता ही मदत दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत करण्यात येत आहे.

## 'आनंदाचा शिधा'

राज्यातील गरीब व गरजू शिधापत्रिकाधारकांना देण्यात येणारा आनंदाचा शिधा या योजनेला राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला. आता ही योजना वर्षभरासाठी राबवण्यात येत आहे. दिवाळी, दसरा, गुढीपाडवा बरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीलादेखील शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत 'आनंदाचा शिधा' देण्यात आला.

## पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसायाच्या संवर्धनावर भर

राज्यात दीड कोटी पशुधनाचे कमी कालावधीत विक्रमी मोफत लसीकरण व उपचार करण्यात आले. लम्पी रोगावरील लसीच्या निर्मितीत व इतर राज्यांना देखील लस पुरवणारे महाराष्ट्र लवकरच पहिले राज्य ठरेल. मासेमारी करताना पाकिस्तानने पकडलेल्या मच्छीमारांच्या कुटुंबीयांना उदरनिर्वाहासाठी मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या

### पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर

छत्रपती शिवाजी महाराजांचा रयतेच्या राज्याचा आदर्श आणि फुले-शाहू-आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांनुसार महायुती सरकारचा राज्यकारभार सुरू आहे. महाराष्ट्राला लोककल्याणकारी, विकसित राज्य बनवण्यासाठी राज्य शासनाने कृतिआराखडा तयार केला असून त्यानुसार योजना, उपक्रम, अभियानांची आखणी व अंमलबजावणी केली जात आहे. वर्ष २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याची क्षमता असणाऱ्या कृषी, उद्योग, सेवा, पर्यटन, आरोग्य विभागांसह पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देण्यात आला आहे. राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकासासाठी जनतेच्या खिशात हात न घालता उत्पन्न वाढीसाठी नवनवीन स्रोतांचा शोध घेण्यात येत आहे. शेतकरी, कष्टकरी, वंचित, उपेक्षित, युवक, महिला, कामगार आदी घटकांच्या हितासाठी राबवण्यात आलेल्या योजना-धोरणांमधून, 'निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान' या उक्तीची प्रचिती येईल.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या दीड वर्षात सर्वसमावेशक विकासाचे विविध निर्णय घेतले आहेत. त्यातून महाराष्ट्राची प्रगतीकडे वेगाने घोडदौड सुरू आहे.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

- ठिबक सिंचन व तुषार सिंचनासाठी PER DROP MORE CROP या योजनेत ६५९ कोटी निधी.
- नानाजी देशमुख कृषी संजिवनी योजनेत पहिल्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा निधी वाढवून आता ५,४६९ कोटी रुपये एवढा केला आहे. १६ जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी सहा हजार कोटी रुपये खर्च येणार असून विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यात येईल.
- मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पात ३४४ कोटी इतका निधी दिला आहे.
- महाराष्ट्रात प्रथमच कांदा महाबँक हा पथदर्शी प्रकल्प सुरू करत आहोत. अणूऊर्जा तंत्रज्ञान वापरून कांद्याची महाबँक स्थापन करण्यात येईल. समृद्धी महामार्गालगत १३ प्रकल्पांची उभारणी.
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे पिकांवरील फवारणीसाठी ड्रोनचा वापर आता वाढू लागला. अशा ड्रोनचे वाटपही शासन आपल्या दारीच्या माध्यमातून केले जात आहे. महाराष्ट्र ड्रोन मिशनही जाहीर केले.
- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ मध्ये कर्जमाफीचा लाभ देताना सॉफ्टवेअरमध्ये त्रुटी निर्माण झाल्याने वंचित राहिलेल्या ६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांचे अर्ज मॅन्युअली तपासून त्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल, यासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाईल.
- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ मध्ये नियमित कर्जफेड करणाऱ्या १४ लाख ३१ हजार इतक्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार १९० कोटी रुपये अनुदान जमा.
- भूविकास बँक कर्जमाफी- ३४,७८८ शेतकऱ्यांना ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी.
- पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, अटल अर्थसाहाय्य योजना यांच्याद्वारेही शेतकऱ्यांना मदत.
- बुलडाणा, परळी वैजनाथ, नांदेड आणि सोयगाव येथे शासकीय कृषी महाविद्यालये स्थापण्याचा निर्णय.
- नागपूर येथे शेती, कृषी उद्योग आणि कृषी संलग्न उद्योगासाठी आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र होणार.
- संत्रा निर्यातीकरिता १३९ कोटी रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- हिंगोलीतील बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी ११ कोटींचा निधी दिला.
- उमरखेड, धिवरवाडी, तळेगाव, इसारवाडी, चांदूरबाजार अशा ५ ठिकाणी सिट्रस इस्टेट.
- भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतील २,१२९ लाभार्थ्यांना ७ कोटी ५१ लाख निधी दिला आहे.
- मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार करून मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला ठिबक व तुषार सिंचन, मागेल त्याला शेततळ्याचे अस्तरीकरण, मागेल त्याला आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर देणार आहे. १ हजार कोटी या वर्षी खर्च करण्यात येत आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल मच्छीमार आणि रापणकारांना अनुदानाचा निर्णय घेण्याबरोबरच 'चंदेरी पापलेट' राज्यमासा म्हणून घोषित करण्यात आला आहे.

पूर प्रतिबंधासाठी राज्यातील १,६४८ कि.मी.च्या नद्यांमधील गाळ काढण्यात येणार आहे. गंगापूर उपसा सिंचन योजनेस मान्यता देण्यात आली. ६७ जलसंपदा प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यामुळे १२ लाख ९१ हजार ३३२ हेक्टर जमीन सिंचित होणार आहे. निळवंडे धरणाच्या कालव्याचे लोकार्पण करण्यात आले.

## 'हर घर जल'ची प्रभावी अंमलबजावणी

'हर घर जल' ही योजना जलजीवन मिशन राबवत आहे. आतापर्यंत एकूण ३५,७५२ योजना मंजूर करण्यात आल्या. यामुळे जवळपास ८३.०३ टक्के कुटुंबांना घरगुती नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

## 'उमेद' अंतर्गत ६१.५६ लाख कुटुंबांची जोडणी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानात राज्यात ६.३१ लाख स्वयंसाहाय्यता गट निर्माण करण्यात आले आहेत. यांतर्गत ६१.५६ लाख कुटुंबे या अभियानाशी जोडली गेली आहेत, तर राज्यातील ७१ लाख कुटुंबे अभियानाशी जोडली जाणार आहेत, तर ७ लाख स्वयंसाहाय्यता गटांची निर्मिती होणार आहे.

उमेद अभियानातील महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटांना देण्यात येणाऱ्या फिरत्या निधीत दुपटीने वाढ करून ३० हजार रुपये निधी प्रत्येक गटाला देण्याचा; तसेच कर्मचारी व चळवळीतील संसाधन व्यक्तींच्या देखील मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

## जलयुक्त शिवार : दुसरा टप्पा सुरू

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यश लक्षात घेता, राज्य शासनाने 'जलयुक्त शिवार अभियान २.०' चा दुसरा टप्पा सुरू केला आहे. ज्यामध्ये पाणलोट विकास उपक्रमांच्या विविध कामांचा समावेश आहे, यामुळे पावसावर आधारित शेतीच्या समस्या कमी होण्यास मदत होऊन शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यास मदत होणार आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनेत धरणातील व गावतळ्यातील साठलेला गाळ काढून टाकून त्यांची साठवण क्षमता वाढवण्याबरोबरच या गाळाचा वापर शेतशिवारामध्ये करून, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीची गुणवत्ता वाढवण्यासाठी फायदा होईल. ज्यामुळे उत्पादन क्षमतेत वाढ होईल.

सुमारे ५,८०० गावांत जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्यात येत आहे. पाणलोट विकास घटक २.० हे ३० जिल्ह्यांत १४४ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. ५ लाख ६५ हजार १८६ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे.

## सर्वंकष सुधारित वाळू/रेती धोरण

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती उपलब्ध होण्यासाठी माझ्या शासनाने नवे सर्वंकष सुधारित वाळू/रेती धोरण आणले. वहिवाटीचे वाद संपुष्टात आणण्यासाठी 'सलोखा योजना', महाराजस्व अभियानात सर्व शेतकऱ्यांना घरी जाऊन शेतीचा सातबारा हे उपक्रम राबवले. अवेळी पाऊस व गारपीटमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत दिली.

## महिला पर्यटन धोरणाची अंमलबजावणी

महिलांना पर्यटन क्षेत्रात व्यवसाय व रोजगाराच्या संधी; तसेच महिला पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा लाभ घेता यावा, याकरिता महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने 'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत 'आई' या महिलाकेंद्रित (Gender Inclusive) पर्यटन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जैन टूर सर्किट सुरू करण्यात आले आहे. एकूण ८ ठिकाणी टेण्ट सिटी उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. शिवनेरी येथे हिंदवी स्वराज्य महोत्सव व राज्यात अन्यत्र विविध पर्यटन महोत्सावाचे आयोजन करण्यात येत आहे.

राज्यात शिवसृष्टी उभारणीच्या कामांसाठी ४१० कोटी रुपयांची तरतूद आहे. नुकताच मुंबईत मुंबई फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला होता. कोकणातील पर्यटनवृद्धीसह पर्यटकांच्या सुखकर प्रवासासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना प्रमुख राष्ट्रीय/राज्य मार्गांशी जोडण्यात येत आहे.

## सामाजिक न्याय व समता

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय महापुरुषांच्या विचारांवर आधारित समाजातील सर्व घटकांचा समग्रपणे विकास घडवण्यासाठी बार्टी नेहमीच कटिबद्ध राहिलेली आहे. संस्थेच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पामध्ये कौशल्य विकास मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रम, समतादूत, युवा नेतृत्व, संशोधन, ग्रंथालय स्पर्धा परीक्षाची संधी आणि व्यावसायिक प्रशिक्षण, जात वैधता प्रमाणपत्र आणि त्याचे स्कॅनिंग आणि डिजिटाईझेशन असे प्रकल्प आहेत.

### महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील घटकांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेमार्फत पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, जेईई, नीट, सीईटी, एमपीएससी, यूपीएससी आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते.

### महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम राबवण्यात येऊन युवक-युवती सर्वांगीण विकास घडवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या नावाने स्वायत्त संस्था स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षा आणि मुलाखतीच्या तयारीसाठी उमेदवारांना अर्थसाहाय्य देण्यात येते. एआयआयएमएस, आयआयएम, आयआयटी येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य देण्यात येते.

## सारथी

मराठा कुणबी, यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी या संस्थेची स्थापना केली आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती येथे वसतिगृह अभ्यासिका ग्रंथालय कौशल्य विकास केंद्रे विकसित करण्यात आली आहेत.

## छत्रपती संभाजीनगर, धाराशिव

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे भव्य स्मारक छत्रपती संभाजीनगर येथे उभारण्यात येणार आहे. औरंगाबादचे नाव 'छत्रपती संभाजीनगर' आणि उस्मानाबाद शहराचे नाव 'धाराशिव' करण्यात आले आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अहमदनगर जिल्ह्याला देण्यात येणार आहे.

## मराठी भाषा संमेलन

मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. पुस्तकाचे गाव विस्तार योजना व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. मराठी भाषा संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

## महिला सशक्तीकरण

महिलाशक्तीला बळकटी देण्यासाठी राज्यात नवीन ५० शक्ती सदन निर्मिती करण्यात आली. पिवळ्या आणि केशरी रेशनकार्ड धारकांच्या कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी योजना' सुरू करण्यात आली आहे.

## कामगार कायद्यांमध्ये सुधारणा

कामगारांच्या कामाच्या ठिकाणी पोषक वातावरण मिळावे, यासाठी कामगार कायद्यांमध्ये सुधारणा केल्या असून बांधकाम कामगारांसाठी तपासणी व उपचार योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

## पोलीस यंत्रणा सक्षमीकरणावर भर

२० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्यात येणार असल्याने पोलिसांवरील अतिरिक्त कामाचा बोजा कमी होण्यास मदत होईल. मुंबईत सीसीटीव्ही बसवण्याची टप्पा-२ची कार्यवाही सुरू असून असुरक्षित सागरी तळावर सीसीटीव्ही व नवीन बोटी खरेदी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सायबर सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त ७५ वर्ष पूर्ण ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत करण्यात आला असून महिलांना प्रवासात सरसकट ५० टक्के सूट देण्यात येत आहे.

- **नवीन शेतकरी भवन -** एकूण ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांपैकी ११६ समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्यात येणार आहे. सुमारे ४,५०० चौ.फूट जागेवर हे भवन असेल. सध्याच्या शेतकरी भवनांची पण दुरुस्ती केली जाणार आहे. यासाठी १३२ कोटी ४८ लाख खर्च येईल.
- **संत्राप्रक्रिया -** नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलडाणा येथे आधुनिक संत्राप्रक्रिया केंद्रे उभारणार. त्यासाठी २० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे.
- बांगलादेशाने आयात शुल्क २२ रुपयांवरून ६८ रुपये प्रती किलो वाढवले आहे. त्यामुळे निर्यात होणाऱ्या संत्र्यांकरिता आयात शुल्क अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.
- **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी -** शेतकऱ्यांना दिवसा आणि अखंडित वीज पुरवठा देण्यात येणार आहे. वर्ष २०२५ पर्यंत किमान ३० टक्के कृषी वीज वाहिनींचे सौर ऊर्जीकरण करण्यात येणार.
- उपसा जलसिंचन योजनेत वीज सवलत - यात १ रुपया १६ पैसे प्रति युनिट व स्थिर आकारात २५ रुपये प्रति केव्हीए इतकी सवलत कायम ठेवली आहे. लघुदाब ग्राहकांना १ रुपया प्रति युनिट सवलतीचा दर दिला आहे.
- **उच्च दाब वितरण प्रणाली -** विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना वीजजोडण्या देत असून या योजनेस मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यात एकूण १ लाख ३८ हजार ७६६ वीज जोडण्या दिल्या आहेत.

## वनांच्या संवर्धनावर भर

मानव-वन्यजीव संघर्ष प्रकरणात वाढीव अर्थसाहाय्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र बांबू विकास मंडळांतर्गत केंद्र शासनाच्या स्फूर्ती योजनेंतर्गत साकोली आणि वर्धा येथे दोन बांबू क्लस्टरची निर्मिती करण्यात येत आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ तलाव संवर्धनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. प्लास्टिकबंदी धोरणाच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय. कार्बन फूटप्रिंट मोजण्यासाठी मोबाइल ॲप्लिकेशन तयार केले आहे. महाराष्ट्र राज्य स्वच्छ हवा कृती योजना विकसित करण्यात आली आहे.

रायगड येथे शिवराज्याभिषेक दिनाचा ३५०वा वर्षसोहळ्यानिमित्त भव्यदिव्य आयोजन करण्यात आले. विशेष टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले. नदी संरक्षण आणि संवर्धनासाठी 'चला जाणू या नदीला' अभियान असून राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले. महासंस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून तालुकास्तरावर नाट्यसंकुल बांधण्यास ३८७.५० कोटी रुपये निधीस मान्यता देण्यात आली आहे.

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

राज्य मंत्रिमंडळाच्या ४, १० जानेवारी आणि ५, १४ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत वित्त, नगरविकास, जलसंपदा, परिवहन, वस्त्रोद्योग, उद्योग, दुग्धव्यवसाय विकास, वस्त्रोद्योग, सहकार, महिला व बालविकास, मदत व पुनर्वसन, दिव्यांग कल्याण, ग्रामविकास, अन्न नागरी पुरवठा, विधि व न्याय, कौशल्य विकास, सामाजिक न्याय, वन, उद्योग, सामान्य प्रशासन, गृहनिर्माण, मृद् व जलसंधारण, महसूल, कृषी, सार्वजनिक बांधकाम, पशुसंवर्धन आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...



# कल्याणकारी निर्णय

### जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा पर्याय

१ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या जाहिरातींनुसार शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी व आनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात येत आहे.

संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी जुनी निवृत्तिवेतन व आनुषंगिक नियम लागू करण्याचा हा पर्याय याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू राहील. अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील.

### अटल सेतूसाठी पथकर

अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावा शेवा अटल सेतूसाठी पथकर निश्चित करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे पथकर आकारणीच्या नियमाप्रमाणे वाहनांसाठी येणाऱ्या दरापेक्षा ५० टक्के कमी दराने पथकर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. कारसाठी ५०० ऐवजी २५० रुपये आकारण्यात येतील. वारंवार प्रवास करणाऱ्या प्रवाशांकरिता परतीचा पास एकेरी पथकराच्या दीडपट, दैनिक पास एकेरी पथकराच्या अडीचपट आणि मासिक पास एकेरी पथकराच्या ५० पट अशी सवलत देण्यात आलेली आहे.

अटल सेतू उभारणीकरिता एकूण २१,२०० कोटी रुपये इतका खर्च आला असून, त्यापैकी १५,१०० कोटी रुपये इतके कर्ज घेण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे पनवेलपासून दक्षिण मुंबईच्या दिशेने ये-जा करणाऱ्या वाहनांचे सुमारे १५ कि.मी. इतके अंतर कमी होईल. त्याचबरोबर गर्दीच्या वेळी सुमारे दीड ते दोन तासांच्या वेळेची बचत होईल. परिणामी इंधनावरील खर्चात वाहनाकरिता किमान ५०० रुपये इतकी बचत होईल.



अटल सेतू या सागरी मार्गाच्या दोन्ही बाजूने शिवडी येथील फ्लेमिंगो पक्ष्यांच्या संरक्षणाकरिता पहिल्या ० ते ४ किलोमीटर दरम्यान दोन्ही बाजूने ध्वनी संरक्षक व अतिसंवेदनशील अशा भाभा अणु संशोधन केंद्र व माहूल येथील तेल शुद्धीकरण केंद्र या ४ ते १० किलोमीटर अंतरामध्ये दृश्य अडथळे बसवण्यात आलेले आहे. अटल सेतूसाठी आकारण्यात येणाऱ्या पथकर दराचा एक वर्षानंतर आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल.

### लिपिक–टंकलेखकांना ठोक भत्ता

मंत्रालयीन लिपिक-टंकलेखकांना दरमहा पाच हजार रुपये ठोक भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रालयीन कामकाजाचे विशिष्ट स्वरूप लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे ११ कोटी ३४ लाख ६० हजार एवढ्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

### पाणी उपलब्धता अट शिथिल

विदर्भातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा प्रकल्पास पाणी उपलब्धता अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला. वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प प्रस्तावित असून यातून भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यातील पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पूर्णा, तापी खोऱ्यातील बुलडाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पापर्यंत कालव्याद्वारे

वळवण्यात येणार आहे. यामुळे विदर्भातील ६ जिल्ह्यांतील १५ तालुक्यातील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे. या प्रकल्पासाठी ६२.५७ टीएमसी पाण्याची गरज असून गोदावरी पाणी तंटा लवादाने गोसीखुर्द प्रकल्पाच्या ठिकाणी महाराष्ट्रास पूर्ण वापरास परवानगी दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी ७५ टक्के विश्वासार्हतेने २९.२३ टीएमसी पाणी उपलब्ध असून ६२.५७ टीएमसी पाणी ६३ टक्के विश्वासार्हतेस उपलब्ध आहे.

वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पामुळे विदर्भातील ६ जिल्ह्यांतील सिंचन, घरगुती, औद्योगिक पाणी वापराचा प्रश्न सुटणार असल्याने पाण्याचा जास्तीत जास्त वापर करून अवर्षणप्रवण व अनुशेषातील काही भागास पाणी देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. त्यामुळे पाणी उपलब्धतेची अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### नांदेड-बिदर नवीन ब्रॉडगेज प्रकल्प

नांदेड-बिदर नवीन ब्रॉडगेज प्रकल्पाला वेग देण्यासाठी राज्य शासनाच्या हिश्शाच्या ७५० कोटीस मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### सिल्क समग्र-२ योजना

राज्यातील रेशीम शेतीला चालना मिळून राज्यातील शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी केंद्रपुरस्कृत सिल्क समग्र-२ ISDSI (Integrated Scheme for Development of Silk Industry) ही योजना २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यात राबवण्यास मान्यता देण्यात आली.

### वाईन उद्योगास प्रोत्साहन

राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी वाईन उद्योगास प्रोत्साहन योजना पाच वर्षांसाठी राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

### दुधाला प्रतिलिटर ५ रुपये अनुदान

राज्यातील सहकारी संघ व खासगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्यातील सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांमार्फत संकलित होणाऱ्या गाय दुधाकरिता दूध उत्पादक शेतकरी यांना प्रतिलिटर ५ रुपये इतके अनुदान देण्यात येईल.

सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांमार्फत दूध उत्पादक शेतकरी यांना ३.५ फॅट/८.५ एसएनएफ या गुणप्रतिकरिता किमान २७ रुपये प्रतिलिटर इतका दर संबंधित दूध उत्पादक शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यावर रोख विरहित पद्धतीने (ऑनलाइन) देणे बंधनकारक राहील. तद्नंतर शेतकऱ्यांना शासनामार्फत ५ रुपये प्रतिलिटर बँक खात्यांवर थेट वर्ग (डीबीटी) करण्यात येईल. फॅट व एसएनएफ ३.५/८.५ या गुणप्रतिपेक्षा प्रतिपॉइंट कमी होणाऱ्या फॅट व एसएनएफकरिता प्रत्येकी ३० पैसे वजावट करण्यात येईल. तसेच प्रतिपॉइंट वाढीकरिता ३० पैसे वाढ करण्यात यावी. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता बँकेमार्फत विशेष सॉफ्टवेअर विकसित करून त्याद्वारे अनुदान दूध उत्पादक शेतकरी यांच्या बँक खात्यावर डीबीटीद्वारे देणेबाबत मान्यता देण्यात येत आहे.



नोव्हेंबर २०२३ मधील आकडेवारीनुसार सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांमार्फत होणारे दूध संकलन १४९ लाख लिटर प्रतिदिन इतके आहे. प्रस्तावित ५ रुपये प्रतिलिटर अनुदानप्रमाणे एक महिन्याच्या कालावधीकरिता अंदाजित २३० कोटी रुपये इतके अनुदान आवश्यक राहील. तथापि प्रत्यक्ष होणाऱ्या दूध संकलनातील घट वा वाढ यानुसार उपरोक्त रकमेत बदल होण्याची शक्यता आहे. ही योजना ११ जानेवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीकरिता राबवण्यात येईल.

### पॉवरलूम मेगा क्लस्टरला अनुदान

पॉवरलूमला प्रोत्साहन देण्यासाठी इचलकरंजी पॉवरलूम मेगा क्लस्टरला भांडवली अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मधील अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. याचा फायदा ४०० उद्योगांना होईल. मंत्रिमंडळ उपसमितीने २८ जून २०२३ रोजी या संदर्भात शिफारस केली होती.

### अविश्वास प्रस्तावाच्या कालावधीत वाढ

सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध आता अविश्वास प्रस्तावाचा कालावधी वाढवण्यात आला असून दोन वर्षांच्या आत असा प्रस्ताव आणता येणार नाही, अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. सध्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात अविश्वासाचा प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत सादर केला जाणार नाही, अशी तरतूद आहे. परंतु हा कालावधी खूप अत्यल्प असल्याने हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनिमय १९५९ मध्येदेखील अशाच पद्धतीने दोन वर्षांनी अविश्वासाची तरतूद आहे.

### बालविकास केंद्र

कुपोषणावर मात करण्यासाठी राज्यातील नागरी भागात ग्रामीण बाल विकास केंद्र योजनेच्या धर्तीवर नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी नागरी बालविकास केंद्र योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील राज्यातील १०४ नागरी प्रकल्पांमध्ये ही योजना राबवण्यात येईल.

### प्रकल्पबाधितांना मदत

राज्यातील पेढी बॅरेज मध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजना या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या मौजे रोहणखेड व मौजे पर्वतापूर, जि. अमरावती आणि कोथेरी लघुपाटबंधारे ता. महाड, जि.रायगड या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या शिरगाव येथील प्रकल्पबाधित कुटुंबांना विशेष बाब म्हणून आर्थिक पॅकेज देण्यास मान्यता देण्यात आली. राज्यामध्ये १ जानेवारी २०१४ पूर्वीच्या व पुनर्वसन अधिनियम

१९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पातंर्गत बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटुंबांना घराच्या बांधकामाचा खर्च, सर्व नागरी सुविधा विकसित करण्यासाठी लागणारा खर्च व स्थलांतरित करताना देय असलेले भत्ते यापोटी आर्थिक पॅकेज अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## सेवानिवृत्तिवेतन योजना

विरार, जि. पालघर येथील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामध्ये १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कार्यरत असलेल्या आणि १२ जुलै २००७ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाने ताब्यात घेतलेल्या पुर्नवसन केंद्रातील २३ कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

## सत्यशोधक चित्रपटास करातून सूट

सत्यशोधक मराठी चित्रपटास राज्य वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत आकारल्या जाणाऱ्या राज्य वस्तू व सेवा कराच्या प्रतिपूर्तीस मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## घरकूल जागा खरेदी योजना

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत घरकूल बांधकामासाठी भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी द्यावयाचे अनुदानात वाढ करून ५० हजार रुपयांवरून ते १ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## आनंदाचा शिधा

श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा; तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त साखर, खाद्यतेल, चणाडाळ, रवा, मैदा आणि पोहे या ६ वस्तू समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा राज्यातील सुमारे १.६८ कोटी शिधापत्रिकाधारकांना देण्यास मान्यता दिली.

राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक; तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांना १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल, चणाडाळ, रवा, मैदा व पोहा प्रत्येकी अर्धा किलो याप्रमाणे या सहा वस्तूंचा समावेश असलेला संच आनंदाचा शिधा म्हणून वितरित करण्यात येणार आहे. आनंदाचा शिधा प्रतिसंच १०० रुपये या सवलतीच्या दरात वितरित करण्यात येणार आहे. या वितरणाकरिता येणाऱ्या ५४९.८६ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

## जाहिरात व प्रसिद्धीसाठी लेखाशिर्ष

ग्रामविकास विभागात राबवण्यात येणाऱ्या योजना सर्वसामान्य ग्रामीण भागातील जनतेशी संबंधित असल्याने त्यांची प्रसिद्धी होण्यासाठी आणि निधी उपलब्धतेसाठी अन्य मंत्रालयीन विभागांप्रमाणे स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

जाहिरात व प्रसिद्धी या कार्यक्रमासाठी ग्रामविकास विभागाकरिता नवीन लेखाशीर्षास मान्यता देण्यात आली असून विभागास उपलब्ध होणाऱ्या योजनांतर्गत नियतव्ययातून निधी सदर लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित करण्यास मान्यता दिली.

## न्यायिक अधिकारी पदे भरण्यास मान्यता

राज्यात न्यायिक अधिकाऱ्यांची अतिरिक्त २८६३ पदे; तसेच साहाय्यभूत ११,०६४ पदे निर्माण करण्याबाबत व ५,८०३ मनुष्यबळ बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घेण्यास आणि या मंजूर पदांवरील भरती टप्प्याटप्प्याने करण्यास मान्यता दिली.



## मुंबईकरांना मालमत्ता कर वाढ नाही

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता धारकांना यावर्षीदेखील मालमत्ता करात वाढ न करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यामुळे मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता धारकांवरील सुमारे ७३६ कोटी रुपयांचा कराचा वाढीव आर्थिक भार टळणार आहे.

या संदर्भात भांडवली मूल्याधारित करप्रणालीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाची अंमलबजावणी करून अंतिम देयके मिळावीत, याकरिता करदात्यांच्या व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागण्या प्राप्त झालेल्या होत्या. कर निर्धारण व त्यानुषंगाने मालमत्ता कराबाबतची सुधारित देयके कायद्यात सुधारणा केल्यानंतर द्यावी लागणार आहेत. त्यानुषंगाने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ या कायद्यात प्रलंबित असलेली सुधारणा विचारात घेता, २०२३-२४ मध्ये भांडवली मूल्य सुधारित न करता मुंबईतील करदात्यांना सवलत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा अध्यादेश काढण्यात येईल.

## नमो महारोजगार मेळाव्यांचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे व कोकण या विभागांमध्ये महारोजगार मेळावे आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. यापूर्वी नागपूर येथे प्रथमच राज्यस्तरीय महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन चालू वर्षी प्रत्येक महसुली विभागात एक या प्रमाणे सहा नमो महारोजगार मेळावे देखील आयोजित करण्याचे ठरले. या मेळाव्यांमार्फत राज्यातील किमान दोन लाख उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येईल.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून लाभ

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा देणाऱ्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेस मान्यता देण्यात आली. दोन लाख रुपये वार्षिक उत्पन्न मर्यादेत ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ होईल. यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठांमध्ये अपंगत्व, अशक्तपणा याचे निराकरण करण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे; तसेच मानसिक स्वास्थ संतुलित ठेवण्यासाठी मनस्वास्थ्य केंद्रे व योगोपचार केंद्रांद्वारे प्रबोधन व प्रशिक्षण देण्यात येईल. याची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हाधिकारी व शहरी भागांसाठी

आयुक्तांमार्फत केली जाईल. यासाठी आरोग्य विभागांमार्फत ज्येष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण व स्क्रिनिंग करण्यात येऊन लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल आणि पात्र लाभार्थींना तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

या योजनेसाठी ४८० कोटी रुपयांच्या खर्चासदेखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या सव्वा ते दीड कोटींच्या दरम्यान आहे. त्यामध्ये अपंगत्व आणि मानसिक अस्वास्थ्याने पीडित सुमारे १५ लाख ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळेल. केंद्राची राष्ट्रीय वयोश्री योजना राज्यातील निवडक जिल्ह्यात राबवण्यात येते. मात्र मुख्यमंत्री वयोश्री योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येईल.

## नगरोत्थान महाभियानास मुदतवाढ

राज्यातील वाढत्या नागरीकरणाचा वेग लक्षात घेता शहरातील नागरीकांना नागरी पायाभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी नगरोत्थान महाभियानास मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यास व अभियानाची व्याप्ती वाढवण्यास मान्यता देण्यात आली.

## बांबू लागवडीसाठी अनुदान



अटल बांबू समृद्धी योजनेत शेतकऱ्यांना उती संवर्धित (टिश्यू कल्चर) बांबू रोपे पुरवठा व देखभालीसाठी अनुदान देण्याचा घेण्यात आला.

पूर्वीच्या शासन निर्णयानुसार या योजनेत शेतकऱ्यांना बांबू रोपे पुरवठा करण्याचा तरतूद होती. या योजनेत सुधारणा होऊन आता शेतकऱ्यांना बांबूच्या देखभालीसाठीदेखील अनुदान मिळणार आहे. आता दोन हेक्टरकरिता १,२०० रोप लागवड व देखभालीसाठी प्रति रोप १७५ रुपये अनुदान तीन वर्षांत देण्यात येईल. जुन्या योजनेत एक हेक्टरसाठी ६०० रोपे देण्याची तरतूद होती. शेतकऱ्याला बांबू रोपांच्या बरोबरच निंदणी, पाणी देणे, संरक्षण व खते यासाठीदेखील अनुदान मिळणार असल्यामुळे बांबू लागवडीत वाढ होऊन शेतकऱ्याला लाभ होईल.

## 'मधाचे गाव' योजना

मध केंद्र योजना (मधमाशा पालन) ही योजना विस्तारित स्वरूपात म्हणजे मधाचे गाव या स्वरूपात संपूर्ण राज्यात राबवण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार गावातील शेतकरी व नागरिकांना मधमाशा पालनाचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच मधपेट्यांसाठी लाभार्थ्यांचा हिस्सा २० टक्के आणि राज्य शासनाचा ८० टक्के हिस्सा असेल.

## जुन्नर तालुक्यात बिबट सफारी

पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्ये आंबेगव्हाण येथे बिबट सफारीची निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. जुन्नरमध्ये ५८ हजार ५८५ हेक्टर वन क्षेत्र असून, या भागात बिबट्यांची संख्या लक्षात घेऊन नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी या संदर्भात मागणी केली होती. यासाठी विस्तृत प्रकल्प आराखड्यास नवी दिल्लीच्या केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाकडून मान्यता घेण्यात येईल. हा प्रकल्प अहवाल खर्चासाठी ८० कोटी ४३ लाखांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या सफारीमध्ये पर्यटक आणि बिबट यांच्या सुरक्षिततेसाठी दुहेरी प्रवेशद्वार, सफारीतील रस्ते, गुहा, संरक्षक भिंत आणि प्रवेशद्वार संकुल यांसारख्या सुविधा राहतील. तसेच जुन्नर हा राज्यातील पहिला पर्यटन तालुका होणार असल्याने पर्यटन सर्किट विकसित करणे शक्य होईल.

## शिर्डी विमानतळाचा अधिक विस्तार

शिर्डी विमानतळाच्या उर्वरित विकास कामांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली. यामध्ये टर्मिनल उभारणी, अँप्रानचे विस्तारीकरण व इतर कामांसाठी ८७६ कोटी २५ लाख व उर्वरित कामांसाठी ४९० कोटी ७४ लाख



अशा खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. यामध्ये भूसंपादन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, सर्वेक्षण व माती परीक्षण, धावपट्टीचे विस्तारीकरण आदी तांत्रिक कामांचा समावेश आहे.

## धारावी पुनर्वसनासाठी जागा

मुंबईतील धारावी पुनर्वसनासाठी केंद्राकडून मिठागराची जागा हमीपत्रासह राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

केंद्र शासनाच्या मालकीची ऑर्थर सॉल्ट वर्क्स लॅण्ड (१२०.५ एकर), जेनकिन्स सॉल्ट वर्क्स लॅण्ड (७६.९ एकर), जमास्प सॉल्ट वर्क्स लॅण्ड (५८.५ एकर), अगर सुलेमनशाह लॅण्ड (२७.५ एकर) अशी सुमारे २८३.४ एकर मिठागराची जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी ९९ वर्षांच्या भाडेतत्त्वावर राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. या जमिनीपैकी जी जमीन संयुक्त मोजणीनंतर केंद्र शासनाच्या मालकीची आहे, तीच जमीन हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव आहे. जी जमीन केंद्राच्या मालकीची नाही अशी व राज्य शासनाच्या मालकीची उर्वरित जमीन महसूल विभाग या प्रकल्पासाठी गृहनिर्माण विभागास हस्तातंरित करेल. केंद्र शासनाने जमीन हस्तांतरित केल्यापासून या जमिनीची बाजारभावाने किंमत राज्य शासन एसपीव्ही (विशेष हेतू कंपनी) कंपनीकडून वसूल करून केंद्र शासनास देईल.

या मिठागरांचे कामगार आणि त्यांच्या पुनर्वसनाचा होणारा खर्च; तसेच जमिनीच्या अधिग्रहणासाठी लागणारा खर्च ही विशेष हेतू कंपनी करेल.

## बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन प्रकल्पास सुधारित मान्यता

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथील बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन प्रकल्पाच्या ८८३ कोटी ७८ लाख रुपयांच्या कामांस सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. सांगोला तालुक्यातील बावीस गावांतील ६,५२५ हेक्टर क्षेत्र नीरा उजव्या कालव्यास केलेल्या अस्तरीकरणामुळे बचत

झालेल्या पाण्यातून सिंचनाखाली येते. या नियोजनामुळे २ अघफू पाणी शिल्लक राहते. यातून नवीन १२ गावांना पाणी देण्यासाठी १३,०५५ हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी ही प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

### बिगर कृषी सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य, ठेवीचे संरक्षण

सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांमध्ये विश्वासार्हता वाढवण्यासाठी पतसंस्थांकडील १ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी संरक्षित करण्यासाठी स्थिरीकरण व तरलता साहाय्य निधी योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी परतफेडीच्या अटीवर नियामक मंडळास १०० कोटी रुपये इतका निधी देण्यात येईल.

### कोंढाणे लघु प्रकल्पाच्या खर्चास मान्यता

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोंढाणे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा न्यायालयाच्या निर्णयानुसार २९ कोटी २३ लाख रुपयांच्या जादा खर्चास मान्यता देण्यात आली. यासंदर्भात देयक मिळण्यासाठी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयीन प्रकरण सुरू असताना हा प्रकल्प सिडकोकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.



### तिवरे लघु पाटबंधारे योजनेची पुनर्स्थापना

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील दुर्घटनाग्रस्त झालेल्या तिवरे लघु पाटबंधारे योजनेची पुनर्स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासाठी ६२ कोटी ७४ लाख ४३ हजार रुपयांच्या कामास मंजुरी देण्यात आली. तिवरे धरणाची भिंत २०१९ च्या पावसाळ्यात फुटली होती. तसेच २०२१च्या पावसाळ्यातदेखील डोंगराचा भराव सांडव्याच्या भागात कोसळून नुकसान झाले होते. या प्रकल्पाची सिंचन क्षमता १७४ हेक्टर आहे.

### नांदेडच्या गुरुद्वारासाठी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अधिनियम

नांदेड येथील गुरुद्वारासाठी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अधिनियम २०२४ लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या विधेयकाचे प्रारूप मान्य झाल्यानंतर दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब निवडणूक नियम व त्याचे उपविधी तयार करण्यात येतील. गुरुद्वाराच्या दर्शनार्थींच्या संख्येत आणि प्रशासकीय कामातदेखील मोठी वाढ झाल्याने १९५६च्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी न्या.जे.एच.भाटीया अभ्यास समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयीन प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर आणि अभ्यास समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

### कृषी विद्यापीठातील शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष

कृषी विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व अध्यापकांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरून ६० वर्षे करण्याचा निर्णय घेण्यात आला. सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याबाबत २०१५ मध्ये घेण्यात आला होता. या विद्यापीठांमधील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, विभाग प्रमुख, सहयोगी अधिष्ठाता, शारीरिक शिक्षण निदेशक, क्रीडा अधिकारी, ग्रंथपाल, अधिष्ठाता आणि संचालक दर्जातील अध्यापकांचा यात समावेश आहे.

विद्यापीठांमध्ये अधिक कार्यक्षम मनुष्यबळ निर्मिती करणे आवश्यक असून भारतीय कृषी संशोधन परिषदेने नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याची शिफारस केली आहे. हे पाहता नवीन भरतीमुळे विद्यापीठामंध्ये संशोधन व शिक्षण या क्षेत्रात अनुभवी व कुशल अध्यापकीय मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

### सार्वजनिक बांधकामचे मंडळ कार्यालय

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे नवीन मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रत्नागिरी येथे एकच सार्वजनिक बांधकाम मंडळ असून, स्वतंत्र मंडळ स्थापन झाल्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या गतिमान कामकाज होणार आहे. या नवीन मंडळ कार्यालयासाठी १७ पदे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. यातील १० नियमित पदे व ७ बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यात येतील.

### गोसेवा आयोगासाठी पदांची निर्मिती

महाराष्ट्र गोसेवा आयोगासाठी १६ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली. हा आयोग २०२३ मध्ये स्थापन करण्यात आला आहे. आयोगासाठी एकूण ८ नियमित पदे व ८ पदे बाह्यस्रोताद्वारे कर्मचारी नियुक्त करण्यात येतील. यासाठी येणाऱ्या १ कोटी २७ लाख ५८ हजार इतक्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

### संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजना

राज्यात संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत तांड्यांमध्ये प्राथमिक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. सध्या स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी तांडा भागासाठी किमान एक हजार इतकी लोकसंख्या आणि दोन गावांतील तीन किलोमीटर अंतर असणे आवश्यक आहे. यातील ही दोन गावांतील तीन किलोमीटर अंतराची अट शिथिल करण्यात येईल. या योजनेसाठी ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार असून ही समिती बंजारा, लमाण तांडा घोषित करणे, गावठाण जाहीर करणे, तांड्यांना महसुली गाव घोषित करणे; तसेच ग्रामपंचायत स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करणे या अनुषंगाने कार्यवाही करेल.

## आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी मान्य करून सुधारित सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. वित्त विभागाच्या १ एप्रिल २०१० च्या शासन निर्णयानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेत १ ऑक्टोबर २००६ पासून लाभ देताना या कर्मचाऱ्यांना विवक्षित सेवा कालावधीनंतर देण्यात येणारी अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना विचारात न घेता पदोन्नतीच्या पदाचा लाभ देण्याचे व त्याअनुषंगाने शासन निर्णयात सुधारणा करण्यात येणार आहे.

मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार तीन लाभाच्या (१०:२०:३०) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती सेवा योजनेत १ जानेवारी २०१६ पासून लाभ देताना कर्मचाऱ्यांना विवक्षित सेवा कालावधीनंतर देण्यात येणारी अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना विचारात न घेता पदोन्नतीच्या पदाचा लाभ देण्याचे व त्याअनुषंगाने शासन निर्णयात सुधारणा करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे अंदाजे रु.२२ कोटी ७९ लाख ९ हजार ११६ इतका अनावर्ती खर्च आणि अंदाजे रु.३ कोटी ६१ लाख ९२ हजार इतका वार्षिक आवर्ती खर्च येईल.

## सहा ठिकाणी नर्सिंग महाविद्यालय

राज्यात जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), नंदुरबार व गोंदिया या जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या महाविद्यालय (नर्सिंग महाविद्यालय) सुरू करण्याची मान्यता देण्यात आली आहे.



## इंटर्नशिप विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ

राज्यातील शासकीय व अनुदानित वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालयातील आंतरवासिता प्रशिक्षणार्थींच्या (इंटर्नशिप) विद्यावेतनात वाढ करून ते दरमहा १८ हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच परदेशातून वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना इंटर्नशिप कालावधीसाठी १८ हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना पूर्वी ११ हजार रुपये विद्यावेतन देण्यात येत होते ते आता फेब्रुवारी २०२४ पासून दरमहा १८ हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच परदेशातून वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना (Foreign Medical Graduates-FMGs) आंतरवासिता प्रशिक्षण कालावधीमध्ये हेच विद्यावेतन देण्याचा निर्णय झाला आहे.

## उद्योगांना प्राधान्य क्षेत्राचा दर्जा

उच्च तंत्रज्ञान वापरणाऱ्या अती विशाल उद्योगांना प्राधान्य क्षेत्राचा दर्जा देऊन प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राज्यातील कमी विकसित भागांमधील उद्योगांना याचा फायदा होणार आहे. राज्यात आर्थिक सल्लागार परिषदेने एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. यानुसार थ्रस्ट सेक्टर (प्राधान्य क्षेत्र) व उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करणे आवश्यक आहे, यासाठी अर्थव्यवस्थेत गुंतवणूकीस वाव असलेल्या आणि उच्च तंत्रज्ञान वापरणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये सेमी कंडक्टर, मोबाइल डिस्प्ले, हायड्रोजन फ्यूएल सेल, लॅपटॉप, संगणक, सर्वर, लिथियम बॅटरी, सोलर पॅनल, औषधी व रासायनिक उद्योग आदी उद्योगांना याचा लाभ मिळेल.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा-२ मध्ये १० हजार किमी लांबीचे रस्त्यांचे उद्दिष्ट आहे. यापैकी ७ हजार किमी लांबीचे रस्ते कोणत्या जिल्ह्यांमध्ये बांधायचे ते ठरले आहे.

३ हजार किमी लांबीच्या रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर या टप्प्यात संशोधन व विकासासाठी आणखी ७ हजार किमी लांबीच्या रस्त्यांचा दर्जा वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात महानगरपालिका, साखर कारखाने, औष्णिक विद्युत केंद्र, वाळू आणि खडीच्या खदानी, मोठ्या नद्या, औद्योगिक परिसरापासून १० किमीच्या




आणि नगरपालिका, नगरपरिषदा, छावणी बोर्ड हद्दीपासून ५ किमीच्या मर्यादेतल्या रस्त्यांचा दर्जा वाढवण्यासाठी निवड करण्यात येईल. रस्त्यांची दर्जोन्नती केलेल्या मात्र पुलांअभावी दळणवळण होत नसलेल्या ठिकाणी पूल उभारण्यात येतील.

## सिंधी निर्वासितांच्या इमारतींचा पुनर्विकास

सायन कोळीवाडातील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून येथील रहिवाशांना स्वत:चे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी गुरु तेग बहादूर नगर सहकारी संस्था स्थापन करण्यात आली असून या ठिकाणी ४१,५०० चौ. मिटर क्षेत्रावर २५ इमारती व त्यात १,२०० सदनिका होत्या. या इमारती पाडून टाकण्यात आल्या आहे. मात्र रहिवाशांच्या व्यतिरिक्त उर्वरित जमिनीवर व्यावसायिक झोपड्यांचे अतिक्रमण आहे. म्हाडामार्फत कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपमेंट एजन्सी नेमून या जमिनीवरील इमारतींचा पुनर्विकास करण्यात येईल. यासाठी म्हाडाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

## सर्वंकष सुधारित रेती धोरण

अनधिकृत उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत ऑनलाइन पद्धतीने ग्राहकांना वाळू व रेती पुरविण्याबाबत सर्वंकष सुधारित रेती धोरणास मान्यता देण्यात आली. ना नफा ना तोटा तत्त्वावर वाळू विक्री दर निश्चित करण्यात येणार आहे.



वाळू गटातून वाळूचे उत्खनन, उत्खननानंतर वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रीया राबवण्यात येईल. नदी/खाडीपात्रातून वाळूचे उत्खनन, वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन याकरिता संबंधित जिल्ह्यातील डेपोनिहाय प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या निविदेमध्ये प्राप्त होणारा निविदेतील अंतिम दर असेल.

**स्वामित्वधनाची रक्कम** : मुंबई महानगर प्रदेशासाठी १२०० रुपये प्रति ब्रास (रुपये २६७/- प्रति मेट्रिक टन) व मुंबई महानगर प्रदेश वगळून इतर क्षेत्राकरिता ६०० रुपये प्रति ब्रास (रुपये १३३/- प्रति टन) इतकी स्वामित्वधनाची रक्कम अनुज्ञेय राहील. यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा जशासतश्या लागू करण्यात येणार आहेत. जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, वाहतूक परवाना सेवा शुल्क व नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल. शासकीय योजनेतील पात्र घरकूल लाभार्थ्यांना ५ ब्रास (२२.५० मेट्रिक टन) पर्यंत विनामूल्य वाळू देण्यात येईल. वाळू डेपोतून वाळू वाहतुकीचा खर्च ग्राहकांना करावा लागणार आहे.

वाळुचे उत्खनन, उत्खननानंतर वाळुची डेपोपर्यंत वाहतूक, डेपोची निर्मिती आणि व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. यातून वाळू किंवा रेती उत्खनन करण्यात येईल. ही रेती शासनाच्या डेपोमध्ये नेली जाईल व तिथून या रेतीची ऑनलाइन प्रणालीद्वारे विक्री करण्यात येईल.

नदी/खाडी पात्रातील वाळू गटाचे निरीक्षण करण्याची कार्यवाही तहसिलदारांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समिती करेल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय वाळू संनियत्रण समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वाळू गट निश्चित करून, त्या गटासाठी ऑनलाइन ई-निविदा पद्धती जाहीर करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीला शिफारस करेल. जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील आणि या समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग; तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी, भू-विज्ञान व खनिकर्म विभाग, भूजल सर्वेक्षण; तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी असतील. ही समिती वाळू डेपोमध्ये वाळूसाठा उपलब्ध करून घेण्यासाठी वाळू गट निश्चित करतील. तसेच राष्ट्रीय हरित न्यायधिकरणाच्या निर्देशांचे पालन होईल, याची दक्षता घेईल.

## मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी सुधारित १ कोटी २१ लाख दरवर्षी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. ही योजना केंद्र आणि राज्य शासन यांच्यामार्फत राबवण्यात येत असून केंद्र शासनाचा वाटा ६०, तर राज्य शासनाचा वाटा ४० टक्के आहे. केंद्राने २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे हा निर्णय घेण्यात आला.

## एकात्मिक औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांना प्रोत्साहन


एकात्मिक औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देण्यासाठी मुद्रांक शुल्क माफीमध्ये लीजचा (भाडेपट्टा) समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रात विकासकाला जमीन खरेदीसाठी ५० टक्के मुद्रांकशुल्क माफीची सवलत देण्यात येते. यासंदर्भातील २००८ च्या शासन निर्णयातील मुद्रांकशुल्क माफी याबाबीमध्ये भाडेपट्टा ही बाबदेखील समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली. मुद्रांकशुल्क माफीची सवलत विकासकास जमीन खरेदी करताना अथवा जमीन भाडेपट्ट्यावर देताना या दोन्हीपैकी केवळ एका वेळेस अनुज्ञेय राहील.

## कायमस्वरूपी विनाअनुदानित महाविद्यालयास स्थापनेस मान्यता

भुदरगड तालुक्यात मौजे पाल येथे युवा ग्रामीण विकास संस्था, गारगोटी या संस्थेस कायमस्वरूपी विना अनुदानित तत्त्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यात भुदरगड, राधानगरी, आजरा, गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, चंदगड, गडहिंग्लज हे १०० टक्के डोंगरी तालुके असून येथील विद्यार्थ्यांना समाजसेवेच्या शिक्षणासाठी परिसरात कोणतीही शैक्षणिक संस्था नसल्यामुळे ८० ते ९० कि.मी. दूरवरील कोल्हापूरसारख्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे विशेष बाब म्हणून या संस्थेस अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली.

**– टीम लोकराज्य**


म
मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विशेष लेख...

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, कला यांना एक दीर्घ परंपरा आणि स्वतंत्र ओळख आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. अभिजात मराठी साहित्याचे श्रवण व्हावे, पारंपरिक कला अभिव्यक्त व्हाव्यात, उद्योग कल्पनांचे आदान प्रदान व्हावे, यासाठी २०२३ पासून भारतातील आणि भारताबाहेरील मराठी भाषकांचे विश्व संमेलन आयोजित करण्यात येत आहे. मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबरच भाषेच्या वापराची व्याप्ती आणि गुणवत्ता वाढावी, याकरिता मराठी भाषेचे धोरण तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून यासाठी तयार करण्यात आलेल्या समितीने धोरणाचा मसुदा शासनास सादर केला आहे.



# मराठी भाषा गौरव दिन

ब्रिजकिशोर झंवर

**मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन व संवर्धन या मराठी भाषा विभागाच्या धोरणानुसार मराठी भाषा विभागामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येतात. याच अनुषंगाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान असणाऱ्या वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात कुसुमाग्रज यांनी मोलाचे योगदान दिले असून माय भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न केले आहेत.**

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून त्याचा मराठी भाषा विभागामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. महाबळेश्वरनजीक भिलार येथे 'पुस्तकांचे गाव' योजना राबवण्यात आली आहे. ही योजना व्यापक स्वरूपात राबवून प्रत्येक जिल्ह्यात एक पुस्तकाचे गाव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बृहन्महाराष्ट्रात संमेलन आयोजित करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळास २५ लाख रुपये इतके अनुदान देण्याचा, तर महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर; परंतु देशांतर्गत मराठी युवक मंडळे स्थापन करून त्यांना विविध उपक्रमांसाठी अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या चार कार्यालयांना समन्वयाच्या दृष्टीने मुंबई शहरात एका छताखाली आणण्याकरिता महाराष्ट्राचे मानबिंदू ठरणारे मराठी भाषा भवन मुंबईत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून लवकरच चर्नी रोड येथे भव्य आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त इमारत उभारली जाणार आहे. यात प्रशस्त प्रेक्षागृह, सुसज्ज ग्रंथालय, बालविज्ञान केंद्र, विविध आसनक्षमतेचे बैठक कक्ष आदी सोयी-सुविधा असणार आहेत. त्याचप्रमाणे राज्यभरातून मुंबईत येणाऱ्या मराठी भाषेतील साहित्यिकांसाठी निवासाची व्यवस्था; तसेच भाषाविषयक उपक्रम राबवण्यासाठी नवी मुंबईतील ऐरोली येथे मराठी भाषा भवन उपकेंद्र उभारण्यात येणार आहे. विश्वकोश निर्मिती मंडळ या मराठी भाषा विभागाच्या अधिनस्थ असलेल्या नामांकित संस्थेच्या कार्यालयासाठी सातारा जिल्ह्यातील वाई येथे स्वतंत्र इमारत; तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्मारक उभारण्यासाठीची कार्यवाहीदेखील सुरू आहे. याशिवाय मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार आणि संवर्धनासाठी दरवर्षी जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. त्याचप्रमाणे २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रज यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

## मराठी भाषेचा गौरव

'मराठी भाषा गौरव दिन' राज्यात आणि जिल्हास्तरावरील कार्यालयांमध्ये साजरा करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार, जतन व संवर्धन या धोरणाशी सुसंगत पारंपरिक पद्धतीने कार्यक्रम करण्याबरोबरच त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध माध्यमांचा वापर करून मराठी भाषा प्रचार-प्रसारविषयक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावर्षीच्या शिवराज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षाचे औचित्य साधून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर मराठी मनात व्हावा, म्हणून '३५० वा शिवराज्याभिषेक छत्रपती शिवाजी महाराजांचा, उत्सव मराठी भाषा गौरव दिनाचा' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित छत्रपती शिवाजी महाराजांवरील पुस्तकांचे/

मराठी ही राजभाषा आहे. या भाषेचा प्रचार, प्रसार, जतन आणि संवर्धन होण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम, योजना राबवण्यात येत आहेत. मराठी भाषा धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना समन्वयाच्या दृष्टीने मुंबई शहरात एका छताखाली आणण्याकरिता महाराष्ट्राचे मानबिंदू ठरणारे मराठी भाषा भवन लवकरच मुंबईत उभारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबईमध्ये मराठी भाषा भवन उपकेंद्र उभारले जाणार असून विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयासाठी सातारा जिल्ह्यातील वाई येथे स्वतंत्र इमारत; तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्मारक उभारण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. जगभरातील मराठीप्रेमींना एका व्यासपीठावर येऊन अभिव्यक्त होता यावे, यासाठी सन २०२३ पासून दरवर्षी विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. साहित्य संमेलनांना दरवर्षी दोन कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. 'पुस्तकांचे गाव' योजना अधिक व्यापक स्वरूपात राबवण्याचे नियोजन आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर मराठी युवक मंडळे स्थापन करून त्यांना विविध उपक्रमांसाठी अनुदान देण्यात येणार आहे. तर, बृहन्महाराष्ट्र मंडळास राज्याबाहेर देशातील इतर राज्यांमध्ये संमेलन आयोजित करण्यासाठी २५ लक्ष रुपये इतके अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी भाषेच्या संवर्धनामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्याच्या उद्देशाने नुकतेच विंदा करंदीकर जीवन गौरव आणि श्री.पु.भागवत पुरस्कार, मराठी भाषा अभ्यासक आणि संवर्धक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी ३५ लेखक/साहित्यिकांची निवड करण्यात आली आहे.



**- दीपक केसरकर, मंत्री, मराठी भाषा विभाग**

साहित्याचे अभिवाचन, व्याख्यान, परिसंवाद, चर्चासत्र अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मराठी भाषा विभागाच्या व क्षेत्रीय कार्यालयांच्या मराठी भाषाविषयक वाटचाल व प्रगतीविषयक बाबींची माहिती क्षेत्रीय कार्यालयांमार्फत एकत्रितपणे विविध माध्यमातून प्रसारित करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील संबंधित जिल्ह्यात मराठी भाषा संवर्धनासाठी सतत कार्यरत राहून बहुमूल्य योगदान देणाऱ्या स्थानिक पातळीवरील मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक, साहित्यिक यांची निवड करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मराठी भाषा गौरव दिनी आयोजित कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. मराठी भाषा विभागाच्या आधिपत्याखालील चारही कार्यालयांकडून संपूर्ण वर्षभरात राबवलेल्या उपक्रम व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसाराकरिता विविध स्पर्धा, प्रसारमाध्यमांतून प्रचार करण्याबरोबरच पुस्तके व कोश यांबाबत चर्चा, परिसंवाद, व्याख्याने इत्यादी उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. काळाची गरज लक्षात घेता, जास्तीत जास्त कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत, मराठी भाषेचा प्रचार-प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन सर्व शासकीय कार्यालयांमधून करण्याची सूचना देण्यात आली आहे.

### व्यापक प्रसिद्धी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, भाषा संचालनालय यांच्या वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या ऑनलाइन कार्यशाळांचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार ऑनलाइन पद्धतीने प्रभावीपणे कसा करता येईल, या विषयावर सर्व शासकीय कार्यालये; तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि भाषा संचालनालय या संस्था तज्ज्ञांच्या मदतीने ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करत आहेत. मराठी भाषेच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांमार्फत संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खासगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, एक्स, व्हॉट्सॲप आदी माध्यमांतून याबाबतचे दृक्‌श्राव्य संदेश प्रसारित केले जात आहेत. मातृभाषेची महती आणि माहिती;





तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित होत आहेत. आकाशवाणी व समाजमाध्यमांद्वारे सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क

महासंचालनालयाच्या प्रायोजित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमांमध्ये मराठी भाषाविषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर मराठी भाषा/ साहित्य/ कोशवाङ्मय या विषयांवर ऑनलाइन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन, तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे; तसेच अभिनव कल्पना सादर करून त्याप्रमाणे ऑनलाइन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

## विविध कार्यशाळांचे आयोजन

प्रसारमाध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेच्या वापराबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरण, समाजमाध्यमांतील मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरण, शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती याबाबतच्या स्पर्धांचे आयोजन, मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन, मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य




करणाऱ्या निःस्पृह व्यक्तींना आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांना किंवा प्रकल्पांना भेट, भाषेच्या संवर्धनासाठी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/सत्कार, महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत वर्षभर विविध कार्यशाळांचे आयोजन आदी उपक्रमही राबवण्यात येत आहेत. शासकीय कामकाज मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे मराठी भाषा विभागाचे संकेतस्थळ, क्षेत्रीय कार्यालयांची संकेतस्थळे, भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाइल ॲप) माहिती सर्वसामान्यांना व्हावी, या दृष्टीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत विविध माध्यमातून याबाबतची माहिती प्रसारित करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद, विदर्भ साहित्य संघ नागपूर, कोकण मराठी साहित्य परिषद रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर, मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची मदत घेण्यात येऊन राज्यात सर्वत्र कार्यक्रम/उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

## साहित्य आणि वाङ्मय क्षेत्रातील पुरस्कार जाहीर

शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत वर्ष २०२३चे विंदा जीवन गौरव आणि श्री.पु. भागवत पुरस्कार तसेच मराठी भाषा संवर्धन पुरस्कार मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी नुकतेच जाहीर केले आहेत. विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार डॉ. रवींद्र शोभणे यांना, तर श्री.पु.भागवत पुरस्कार मनोविकास प्रकाशन, पुणे या संस्थेस जाहीर करण्यात आला आहे. विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र, तर श्री.पु. भागवत पुरस्काराचे स्वरूप तीन लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे. याचबरोबर मराठी भाषा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आले असून डॉ. अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ. प्रकाश परब (व्यक्ती) यांना, तर वाङ्मय चर्चा मंडळ बेळगाव (संस्था) यांना; तसेच कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार कौतिकराव ठाले पाटील (व्यक्ती) यांना, तर कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक (संस्था) यांना देण्यात येणार आहे.

मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२२ सुद्धा जाहीर करण्यात आले असून, यासाठी प्रौढ वाङ्मय प्रकारात २२, बाल वाङ्मय प्रकारात सहा, प्रथम प्रकाशन प्रकारात सहा, तर सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार प्रकारात एक लेखक/ साहित्यिकांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. प्रौढ वाङ्मय आणि सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्र असे असून बाल वाङ्मय आणि प्रथम प्रकाशन प्रकारातील पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्र असे असणार आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**



# मराठी भाषेचे प्राचीनत्व!

**लिखित पुराव्यांनुसार मराठी भाषेचा इतिहास किमान २,२०० वर्ष जुना जातो. प्राचीन माहाराष्ट्री प्राकृताचीच विकसित होत आलेली अवस्था म्हणजे आजची आपण बोलतो-लिहितो ती मराठी. वररुचीने या आद्य माहाराष्ट्री प्राकृताचे व्याकरण इसपू २००च्या आसपासच लिहिले होते, याचा अर्थ त्याआधीही कैक शतके ही भाषा बोलीभाषा म्हणून प्रचलित होती. इसपू पहिल्या शतकातील नाणेघाट, पाले आणि लोहगड येथील शिलालेख या प्राचीन मराठीचे लिखित रूप दर्शवतात. महाराष्ट्रात जैन धर्म किती प्राचीन काळातच पोहोचला होता, याचेही पाले व लोहगड येथील शिलालेख निदर्शक आहेत. यानंतर सातवाहन काळातील बौद्ध विहारांतील असंख्य शिलालेख आज उपलब्ध आहेत.**

**संजय सोनवणी**

मराठी भाषेतील साहित्य, काव्य आणि महाकाव्यांचा इतिहासही इतकाच मागे जातो. हाल सातवाहन राजाने संकलित केलेल्या ७०० गाथांचा समावेश असलेले गाथा सप्तशती तर आज काव्यरसिकांना चांगलेच माहीत आहे; पण आद्य रामकाव्य हेही माहाराष्ट्री प्राकृतातच लिहिले गेले होते, तर वाल्मिकीचे रामायण इसवी सनाच्या तिसऱ्या शतकानंतर लिहिले गेले. आद्य रामकाव्य लिहिण्याचा मान प्राचीन मराठीकडे जातो, याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. हे आद्य रामकाव्य म्हणजे पउमचरीय. हे लिहिले विमल सुरी यांनी इसवी सन ४ मध्ये, म्हणजे जैन तीर्थंकर महावीर यांच्या निर्वाणानंतर ५३० वर्ष पूर्ण झाल्यानंतर. आपल्या काव्यातच विमल सुरी यांनी हे वर्ष दिले आहे. यातील रामकथेचे मूलस्रोत हे पूर्णतया स्वतंत्र असून जैन जीवनदृष्टीचा या काव्यावर फार मोठा प्रभाव आहे. याच काळातील 'अंगाविज्जा' हा तत्कालीन समाजजीवन व संस्कृतीचे दर्शन घडवणारा महाराष्ट्री प्राकृतातील ग्रंथ लिहिला गेला. चवथ्या शतकातील संघदास गणी यांनीही 'वासुदेव हिंडी' हे महाकाव्य लिहिले. महाराष्ट्री प्राकृतावर जैन साहित्यिकांचे मोठे ऋण आहे. त्यांनी माहाराष्ट्री प्राकृतात अपार ग्रंथसंपदा लिहिली; परंतु त्यांचे योगदान आजचे मराठी भाषक विसरल्यासारखे दिसते. याशिवायही माहाराष्ट्री प्राकृतात विपुल म्हणता येईल, अशी रचना झालेली आहे; पण आपला भाषाभिमान बेतास बात असल्याने आपले या साहित्याकडे म्हणावे तसे लक्ष गेलेले नाही, हेही दुर्दैवी आहे.

संस्कृतमधून मराठी भाषेचा उगम झाला हे जुने मत आता मान्य होणार नाही, एवढे सज्जड पुरावे उपलब्ध आहेत. संकरित संस्कृतातील एकमेव मिळणारा प्राचीन पुरावा म्हणजे इसवी सन १६०चा राजा रुद्रदामनचा शिलालेख. त्याआधी संस्कृत भाषेचे अस्तित्व दाखवणारा एकही शिलालेखीय अथवा नाणकीय पुरावा उपलब्ध नाही. माहाराष्ट्री प्राकृताचे शिलालेखीय पुरावे मात्र त्यापेक्षा प्राचीन तर आहेतच; पण विपुल प्रमाणात आहेत. मराठी हीच महाराष्ट्राची आद्य भाषा होती, स्वतंत्र होती व आहे ही मराठी माणसाला अभिमानाची बाब वाटायला हवी आणि त्यासाठी अनेक पुरावे आहेत. वैदिक भाषा आणि संस्कृत भाषा या एकच मानण्याच्या प्रवृत्तीतून हा गैरसमज जोपासला गेला. त्यामुळे आज मराठी ही दुय्यम भाषा आहे, असा समज निर्माण झाला. खरे तर वैदिक भाषेवरही प्राकृत भाषांचा मोठा प्रभाव आहे, हे अनेक विद्वानांनी साधार सिद्ध केले आहे.

जे. ब्लॉख यांनी १९१४ साली लिहिलेल्या 'फॉर्मेशन ऑफ मराठी लँग्वेज' या पुस्तकात फार महत्त्वाची निरीक्षणे नोंदवलेली आहेत. थोडक्यात ती अशी : ऋग्वेदाच्या प्राचीन संपादकांनी अन्य बोलीभाषांना आत्मसात करत अथवा त्यापासून उधारी करत ऋग्वेदाची वैशिष्ट्यपूर्ण भाषा घडवली आहे.

(पृ.२) मराठी ही सरळ महाराष्ट्री प्राकृताशी नाते सांगते. अन्य प्राकृत भाषांचा प्रभाव नगण्य आहे. मराठीचे ध्वनिशास्त्र गुंतागुंतीचे व अन्य आर्यभाषांपेक्षा स्वतंत्र आहे. (पृ ४५), अनेक प्राकृत घाट संस्कृतात घुसले आहेत. संस्कृत ही स्वतंत्र भाषा नसून मिश्र भाषा आहे. (पृ. ४८) हेमचंद्र ज्यांना अपभ्रंश भाषा म्हणतो, त्या भाषांचा मराठीशी काहीही संबंध नाही, तर मराठीचा संबंध थेट प्राचीन प्राकृताशीच आहे. (पृ. ३०-३१) प्राकृत म्हणजेच महाराष्ट्री प्राकृत. शौरसेनी, मागधी, अर्धमागधी वगैरे अन्य प्राकृत भाषा दुय्यम आहेत. मराठीचा पाया स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन बोलींचा आहे, जो अन्य भाषांत समांतरपणे आढळत नाही. (पृ.३२) सातवाहन काळात स्थानिक प्राकृत राजभाषा व साहित्यभाषा बनली व तिला वैभव आले. भारतातील कोणतीही भाषा कोणावर लादली गेल्याचे भाषाशास्त्रीय उदाहरण मिळत नाही. (पृ. ४४). मी येथे ब्लॉख यांनी दिलेली अत्यंत थोडकी उदाहरणे घेतली आहेत; पण ती मराठी भाषेच्या स्वतंत्र वास्तवावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहेत. माहाराष्ट्री प्राकृत भाषा तिसऱ्या शतकात मध्य आशियातील निया शहरापर्यंत पोहोचली होती, तेथील राजादेश लिहिलेल्या लाकडी पाट्या सापडल्या असून त्यात महानुराया लिहतीसारखी आजही मराठी भाषेत प्रचलित असलेली वाक्ये मिळून येतात. यावरून प्राचीन काळी झालेला मराठीचा प्रसार आपल्या लक्षात येतो.



खुद्द ऋग्वेदात अनेक प्राकृत प्रयोग आलेले आहेत. किंबहुना प्राकृत आणि अवेस्तन शब्दांचेच सुलभ ध्वनीबदल करीत वैदिक संस्कृत व नंतरचे संस्कृत बनले आहे. अहुरऐवजी असुर, मिथ्रऐवजी मित्र अशी अवेस्तन शब्दांचे ध्वनीबदल केल्याची असंख्य उदाहरणे देता येतील. इंद्रऐवजी इंद, वृंद ऐवजी वुंद असे मूळचे प्राकृत प्रयोग ऋग्वेदात जसेच्या तसेच राहिलेले आहेत. व्याकरणाचा पायाही प्राकृतच असल्याचे अनेक उदाहरणांवरून आढळून येते. उदा. देवासः, सत्यासः ऐवजी देवाः, सत्याः इ. खरे तर ऋग्वेदाची भाषा अवेस्तन (प्राचीन पर्शियन) आणि भारतातील स्थानिक प्राकृत यांचे मिश्रण आहे. एवढेच नव्हे, तर ऋग्वेदातील ६ टक्के शब्द द्रविड व मुंड भाषेतून वैदिक संस्कृतात उधार घेतलेले आहेत. 'भाषेचा उगम' या माझ्या पुस्तकात मी संस्कृत भाषा इसपू पहिले शतक ते इसवी सनाचे दुसरे शतक या काळात कशी क्रमशः विकसित होत गेली हे ग्रांथिक, शिलालेखीय व नाणकशास्त्रीय पुराव्यांवरून साधार दाखवले आहे. त्या दृष्टीने संस्कृत हीच आधुनिक भाषा ठरत असून प्राचीन प्राकृत भाषांवर संस्कार करत ही नवी भाषा बनवलेली आहे. मूळ प्राकृत शब्दांचेच उच्चारसुलभीकरण करीत संस्कृत विकसित होत गेली हे बुद्धिस्ट हायब्रीड संस्कृत ग्रंथ, शिलालेखीय ते नाण्यांवरील भाषेतून सिद्ध होते; परंतु ती आधुनिक असूनही तिला अभिजात दर्जा आणि ज्यापासून ती बनली त्या महाराष्ट्री प्राकृताला व त्या भाषेची थेट वंशज असलेल्या मराठीला मात्र अभिजात दर्जा नाकारणे हे कर्मदरिद्रीपणाचेच नव्हे, तर भाषाशास्त्रीय दृष्टिकोनही नसल्याचे निदर्शक आहे.

मराठी भाषा ही प्राचीन काळापासून साहित्य व्यवहाराची भाषा राहिलेली आहे. स्त्रियांनीही या भाषेत काव्यलेखन केलेले आहे. एकट्या गाथा सप्तशतीमध्ये २८ कवयित्रींनी आपले काव्य-योगदान दिलेले आहे. ही सातवाहन काळापासून राजभाषाही राहिलेली आहे. संस्कृत अभिमानी मानतात तशी ही ग्राम्य लोकांची भाषा असती तर असे झाले नसते. विमल सुरींच्या आद्य महाकाव्यात येणारी नुसती रामकथाच नव्हे, तर त्यात येणारे समाज जीवनही वास्तवपूर्ण आहे. 'वासुदेव हिंडी' तर जगातील अतिप्राचीन प्रवासवर्णन असल्याचे मत पाश्चात्य अभ्यासकांनीही व्यक्त केले आहे. प्राचीन महाराष्ट्री प्राकृत विकसित होत, कालौघात बदल स्वीकारत मुकुंदराज-ज्ञानेश्वरांच्या मराठीपर्यंत आले.

शिवकालीन पत्रव्यवहारातील मराठी, तुकोबारायांच्या अभंगातील मराठी इंग्रजकाळात आधुनिकतेचा स्पर्श होत अजून बदलत आजच्या जागतिकीकरणाच्या काळातील भाषेपर्यंत आलेली आहे. प्राचीन मराठीतील असंख्य शब्द आजही आपल्या नित्य बोलण्यात असतात आणि हे शब्द संस्कृतात सापडून येत नाहीत हे विशेष. जी भाषा जिवंत असते तीच कालानुसार परिवर्तने स्वीकारत असते. नवीन शब्द शोधणे वा अन्य भाषांतून उधार घेणे, अभिव्यक्तीचे व्याकरण बदलणे आणि नव्या जोमाने व्यक्त होण्यातून भाषेचा आणि त्या सोबतच मानवी संस्कृतीचाही विकास करणे हे जिवंत भाषांचे वैशिष्ट्य असते आणि मराठी या निकषावर पूर्णपणे टिकते. मराठी ही एक जिवंत भाषा आहे. तिला आज पुन्हा एकदा ज्ञानभाषा बनवण्याची तेवढीच आवश्यकता आहे. मराठीचा नव्याने जागर करत तिला पुन्हा प्राचीन वैभव प्राप्त करून देण्याची आपली जबाबदारी आहे.

**(लेखक हे इतिहास संशोधक आहेत.)**

कुसुमाग्रज म्हणजे मराठी साहित्य विश्वाला लाभलेले एक वरदानच म्हणता येईल. प्रतिभावंत कवी, श्रेष्ठ कांदबरीकार, लेखक, नाटककार, ललित साहित्यकार, समीक्षक, अशा साहित्याच्या सर्व अंगाना वि.वा. शिवाडकर यांनी स्पर्श केलेला आहे.

## मराठी साहित्यातील योगदान

**मराठी साहित्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व म्हणजे कुसुमाग्रज होय, महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मराठी भाषेच्या वापराला, विकासाला चालना देण्यासाठी आणि भारतीय समाजात भाषेच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी कुसुमाग्रजांनी खूप प्रयत्न केले. कुसुमाग्रज हे साहित्यिक विचार लौकिकतावादी होते. कुसुमाग्रजांना आत्मनिष्ठ व समाजनिष्ठांची जाणीव असणारे महत्त्वाचे लेखक मानले जाते.**

प्रा. प्रियांका कुंभार

### जीवन परिचय

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पिंपळगाव (नाशिक) येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर. त्यानंतर ते दत्तक गेले व ते विष्णू वामन शिरवाडकर झाले. काव्यलेखन करताना त्यांनी कुसुमाग्रज या नावाने लेखन केले आहे. त्यांना तात्यासाहेब असेही संबोधले जात होते. चौथीपर्यंतचे शिक्षण पिंपळगाव या ठिकाणी झाले त्यांनतर ते माध्यमिक शिक्षणासाठी नाशिक येथे आले. पिंपळगावला मुक्तपणे वावरलेल्या शिरवाडकरांना नाशिकमध्ये खूप जुळवून घ्यावे लागले. शालेय जीवनापासूनच त्यांना साहित्य वाचनाची ओढ निर्माण झाली. शिक्षणाबरोबरच क्रिकेट, कुस्ती या खेळांमध्ये त्यांना रुची निर्माण झाली; पण ती फार काळ टिकली नाही. हस्तलिखित अंक तयार करण्याचा छंदही त्यांनी त्या काळात जोपासला. या हस्तलिखितांमधून ते स्वतः लेखन करत होते. कथा, कादंबरी, नाटक यांच्या वाचनाबरोबरच ‘भारत गौरव ग्रंथमाला’, ‘सुरस ग्रंथमाला’ यांच्या वाचनामधून त्यांना साहित्याची आवड निर्माण झाली. राम गणेश गडकरी यांच्या नाटकाच्या प्रभावातून त्यांनी शालेय जीवनातच नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला होता; पण नाटकापेक्षा ते अधिक रमले ते कवितेमध्ये. कवितेच्या अंतरंगापर्यंत, तिच्या अर्थापर्यंत कसे पोहोचायचे याची जाण शालेय जीवनातच निर्माण झाली. पुढे कवी म्हणून त्यांचा नावलौकिक झाला आणि शालेय जीवनात नाटकात रमलेले शिरवाडकर पुन्हा नाटकाकडे वळले.

### साहित्यसंपदा

इ.स.१९३० च्या दरम्यान त्यांनी लेखनास प्रारंभ केला. कवी म्हणून परिचित असले तरी त्यांनी काव्यलेखनासोबतच नाटक, एकांकिका, कादंबरी, कथा, अनुवाद, रूपांतर, निबंधलेखन, पटकथा, समीक्षा हे सर्व प्रकार हाताळले. वि. वा. शिरवाडकर यांनी जवळपास २२ कवितासंग्रह, ३ कादंबऱ्या, ९ कथासंग्रह, ६ निबंधसंग्रह, २० नाटके आणि ६ एकांकिका, १ आठवणीपर लेखन प्रकाशित केले आहे. अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मडगाव येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद, पहिल्या जागतिक मराठी परिषदेचे ते अध्यक्ष राहिले आहेत. १९६० मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. कुसुमाग्रजांच्या एकूणच साहित्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यामध्ये त्यांच्या ४ पुस्तकांना महाराष्ट्र सरकारचे उत्कृष्ट पुस्तकासाठीचे पुरस्कार मिळाले आहेत. अकादमीचा पुरस्कार, भारत सरकारचा १९९१ साली साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार, भारत सरकारचा ज्ञानपीठ पुरस्कार हे महत्त्वाचे पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या एकूणच साहित्याबद्दल पुणे विद्यापीठाने त्यांना ‘डि.लिट्’ ही सन्माननीय पदवी प्रदान केली आहे. आयुष्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत त्यांनी साहित्याची सेवा केली आहे.

### समाजसुधारणांसाठी पुढाकार

सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यामध्येही कुसुमाग्रज यांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. नाशिकच्या काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देण्याच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. त्यांनतर त्यांनी ‘ध्रुव’ मंडळाची स्थापना केली आणि १९३३ मध्ये ‘नवा मनु’ वृत्तपत्रात लेख प्रकाशित करण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी ‘जीवनलहरी’ हे त्यांचे पहिले कवितांचे पुस्तक प्रकाशित झाले. पुढे १९३६ मध्ये शिरवाडकर यांनी ‘गोदावरी सिनेटोन’ लिमिटेडसाठी काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी सती सुलोचना चित्रपटाची पटकथा लिहिली. ‘नवयुग’, ‘साप्ताहिक प्रभा’, ‘दैनिक प्रभात’, ‘सारथी’ आणि ‘धनुर्धारी’ या मासिकांमध्ये त्यांनी लेख प्रकाशित केले. विष्णू सखाराम खांडेकर यांनी कुसुमाग्रजांचा ‘विशाखा’ हा काव्यसंग्रह स्वखर्चाने प्रकाशित केला आणि प्रस्तावनेत ‘मानवतेचा कवी’ म्हणून त्यांचा गौरव केला. पुढे त्यांनी १९४६ ते १९४८ पर्यंत ‘स्वदेश’ मासिकाचे संपादक म्हणूनही काम केले. १९५० मध्ये नाशिकमध्ये अजूनही सक्रिय असलेल्या ‘लोकहितवादी’ मंडळाची स्थापना केली. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी लेखकांमधील सामाजिक जाणीव प्रगल्भ करत बदलत्या सामाजिक वातावरणाचे प्रतिनिधित्व त्यांची कविता करते आहे. कुसुमाग्रज हे प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचेही पुरस्कर्ते होते. महाराष्ट्रातील आदिवासी जनसमुदायामध्ये सुधारणा करण्यासाठी ‘आदिवासी कार्य समिती’ची स्थापना त्यांनी केली. या कार्याबरोबरच कुसुमाग्रजांनी चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, नाटक, चित्रपट, क्रीडा इ. कलाप्रकारांना महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामधून असंख्य लोकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांनी १९९२ मध्ये ‘गोदावरी गौरव’ नावाची स्थापना करण्यात मदत केली.

## प्रतिभावंत कवी

कुसुमाग्रज यांच्या एकूणच साहित्यामधून या कार्याची छाप उमटलेली दिसून येते. त्यांच्या 'विशाखा' या कवितासंग्रहात संकलित झालेल्या कवितेत गर्जा जयजयकार... क्रांतीचा गर्जा जयजयकार असा उद्‌घोष करणाऱ्या कुसुमाग्रजांना गद्य वाङ्मयातूनही क्रांतीचा विचार मांडायचा होता. ती त्यांची आंतरिक गरज होती. वि.स. खांडेकर यांनी कुसुमाग्रजांच्या काव्याचे महत्त्व ओळखून या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिली आहे ते म्हणतात, 'प्रीतीप्रमाणेच कीर्तीचाही मार्ग सरळ नसतो. हे कटुसत्य कुसुमाग्रजांच्या अनुभवाला थोडेफार आले असेल, तरी आजच्या साहित्य क्षितिजावरील एक तेजस्वी तारा या दृष्टीने त्यांच्याकडे अनेक रसिक पाहत आले आहेत. यात मात्र शंका नाही. टिळक जसे फुला फुलांचे कवी होते आणि गोविंदाग्रज जसे कल्पनारम्य प्रणयाचे कवी होते तसे कुसुमाग्रज मानवतेचे कवी आहेत.' (कुसुमाग्रजः १९४२: पृ. १० ) हे वि. स. खांडकरांचे मत अत्यंत रास्त ठरते. एकूणच त्यांच्या कवितेमधून अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांच्या 'अहिनकुल', 'हिमलाट', 'आगगाडी आणि 'जमीन' इत्यादी अनेक कवितांमधून समकालीन स्वातंत्र्य चळवळीचे प्रतिबिंब दाहक स्वरूपात उमटलेले आहे. 'जाईचा कुंज', 'विशाखा', 'समिधा', 'किनारा', 'मराठी माती', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'छंदोमयी' यांसारखे एकाहून एक सरस असे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले आहेत. कवी कालिदास यांची संस्कृत रचना असलेले 'मेघदूता'चा अनुवाद कुसुमाग्रजांनी केला आहे तो अत्यंत सुरस ठरला आहे. या काव्याचे अनुवाद अनेक साहित्यिकांनी मराठी भाषेत केले आहेत; परंतु कुसुमाग्रजांनी केलेला हा अनुवाद मूळ संस्कृत काव्याइतकाच रसपूर्ण आणि सुमधुर झाला आहे. मूळ संस्कृत श्लोक आणि त्याचा मराठी अनुवाद असे या पुस्तकाचे स्वरूप असल्यामुळे अभ्यासकांचीही सोय झाली आहे.



## नटसम्राट (नाटककार)

कुसुमाग्रजांनी नाटककार म्हणूनही प्रचंड यश मिळवले आहे. 'दूरचे दिवे', 'वैजयंती', 'दुसरा पेशवा', 'कौंतेय', 'आमचं नाव बाबुराव', 'ययाती आणि देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदूषक', 'बेकेट', 'नटसम्राट' ही त्यांची गाजलेली नाटके होत. 'नटसम्राट' हे शिरवाडकरांचे अत्यंत गाजलेले व सर्वांत यशस्वी नाटक होय. या नाटकात त्यांनी काव्यात्मकतेची आणि नाट्यात्मकतेची अत्युच्च पातळी गाठली आहे. हे नाटक नेहमीच रसिकमनावर अधिराज्य गाजवताना दिसून येते. एकूण भारतीय साहित्यामध्ये श्रेष्ठ असलेली अजरामर कलाकृती म्हणून या नाटकाकडे पाहता येईल. या नाटकाने इतिहास घडवला. हे नाटक जसे वाड्मयीन दर्जाने श्रेष्ठ आहे तसेच ते सादरीकरणाच्या दृष्टीनेही मैलाचा दगड म्हणून आपली भूमिका बजावते आहे. इंग्रजी नाटककार 'विल्यम शेक्सपियर' यांच्या कलाकृतींवर बेतलेले आहे ही वाड्मयीन प्रामाणिक कबुली असली, तरी भारतीय साहित्याच्या नाट्यविश्वात त्याने आपली वेगळी ओळख सिद्ध केली आहे हे नाकारता येणार नाही.

## श्रेष्ठ कथा/कांदबरीकार

वि. वा. शिरवाडकर यांना आज आपण प्राधान्याने कवी आणि नाटककार म्हणून ओळखत असलो, तरी त्यांनी कथा, कादंबरी आणि ललितगद्य या क्षेत्रातही यशस्वी मुशाफिरी केलेली आहे हे आवर्जून सांगितले पाहिजे. वस्तुतः अनेक साहित्यप्रकारात सारख्याच ताकदीने लेखन करणारे लेखक अत्यंत दुर्मीळ असतात. त्या दुर्मीळ लेखकांमध्ये वि. वा. शिरवाडकर यांचा समावेश करावा लागतो. कविता लिहून समाधान न झाल्यामुळेच कदाचित शिरवाडकरांमधील लेखकाने तो दिव्यदाहक अनुभव व्यक्त करण्यासाठी कादंबरीचा फॉर्म स्वीकारला आहे. वि. वा. शिरवाडकरांनी 'वैष्णव', 'जान्हवी' व 'कल्पनेच्या तीरावर' या तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्या, त्यांतील विषय व मांडणी यांच्या वेगळेपणामुळे उल्लेखनीय ठरल्या आहेत. त्याच्या 'वैष्णव' या कादंबरीतूनही राजकीय भावना व्यक्त झाल्या आहेत. कविता हे कवीचे भावचरित्र असते असे म्हटले जाते, तर कथा-कादंबरी आदी कथनपर साहित्य हे त्याचे आत्मचरित्र असते असे मानले जाते; परंतु येथे तोही भेद उरत नाही. शिरवाडकरांच्या कवितेप्रमाणेच येथे त्यांची कादंबरीही भावचरित्राचे स्वरूप धारण करते. 'वैष्णव'च्या यशापयशाची चर्चा केल्यानंतर 'जान्हवी' या कादंबरीकडे वळताना 'वैष्णव' च्या तुलनेत 'जान्हवी'मध्ये शिरवाडकरांनी लक्षणीय उंची गाठली आहे, हे सकृत्‌दर्शनीच लक्षात येते. सामाजिकतेचे भान आणि तत्काळातील चिरंतनाचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या साहित्याचे खास विशेष म्हणता येईल.

शिरवाडकरांच्या ललित लेखनात गतकाळातील अठवणी, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रे, मृत्यूलेख, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक यांच्याविषयी लेख यांचा समावेश प्रामुख्याने झाला आहे. माणुसकीवर श्रद्धा ठेवणारे कुसुमाग्रज यांनी स्वातंत्र्य, समता ही मूल्ये साहित्यामधून जोपासली आहेत. त्यांच्या लेखनाबद्दल द.दि. पुंडे म्हणतात, ते आपले स्वतःचे जग खुले न करता केवळ स्वतःभोवतीचे जग खुले करतात किंवा त्यांनी पाहिलेल्या जगाचीच माहिती सांगत राहतात. त्यामुळे वाचक आणि त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व यामध्ये एक पडदा उभा राहतो. (पुंडे, द.दि.: १९९१ : पृ १५४) काव्यलेखन आणि नाट्यलेखन याकडे अधिक लक्ष केंद्रित केल्याने इतर साहित्याप्रकारांबरोबरच कादंबरी लेखनाकडील त्यांचा ओढा कमी झाला असावा किंवा ज्यावेळी एखाद्या लेखकाला त्याच्या आत्माविष्कारासाठी त्याच्या प्रकृतीधर्माला अनुकूल असा सुयोग्य वाङ्मयप्रकार सापडतो, त्यावेळी स्वाभाविकच तो इतर वाङ्मय प्रकारांपासून दुरावत जातो. शिरवाडकरांच्या बाबतीत हेच घडले असावे असे म्हणता येते. त्या त्या जीवनानुभवाची मागणी आणि स्वरूप लक्षात घेऊन त्यांनी कथा-कादंबरी-ललितगद्य हे वाङ्मय प्रकार हाताळले; परंतु त्यांच्यातील लेखक पिंड अधिक रमला तो कविता आणि नाटक या वाङ्मय प्रकारांमध्येच!

**संदर्भ : १. कुसुमाग्रजः १९४२: विशाखा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे**
**२. पुंडे, द.दि.: १९९१: कुसुमाग्रज/ शिरवाडकरः एक शोध, मेहता पब्लिकेशन पुणे**
**३. कुलकर्णी अनुरूद्ध (संपा): १९८० : प्रदक्षिणा खंड १ , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ४. कुलकर्णी अनिरूद्ध (संपा): १९९१ : प्रदक्षिणा खंड २ , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.**

**(लेखिका या श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे मराठी विषयाच्या प्राध्यापक आहेत. )**

# मराठी साहित्यातील स्त्रीवाद

**मराठी साहित्यातील स्त्रीवाद असा विचार करताना स्त्रीवाद ही एक राजकीय संकल्पना आहे. स्त्रियांचे संरचनात्मक दुय्यमत्व नष्ट करणे आणि स्त्रियांना समतेच्या सूत्राशी जोडणे, असे स्त्रीवाद या संकल्पनेत अभिप्रेत आहे. मराठी साहित्याचा स्वतःचा इतिहास आहे. मराठी साहित्य या कोटीक्रमामध्ये काय घटक येतील याचीही विस्ताराने चर्चा करता येईल.**

**प्रवीण चव्हाण**

युनोने स्त्री दशक (१९७५-१९८५) जाहीर केलेल्या बाबीला आता ५० वर्षे होत आहेत. भारतात १९७४ मध्येच टूवर्डस् इक्वलिटी रिपोर्ट प्रकाशित झाला. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री आणि पुरुष समतेविषयी असणारी अनेक मिथके त्यातून उघडकीसाठी आणि स्त्रियांची विषमता नष्ट करण्यासाठी विविध स्तरांवर काम करण्याची गरज निर्माण झाली. स्त्रियांची चळवळ, स्त्रियांचे प्रश्न ते स्त्रीवादी चळवळ अशा प्रकारे स्त्रियांचे दुय्यमत्व लक्षात घेण्याचे प्रयत्न झाले. मधुरा खटला (१९७२) पासून भवरी देवी खटला (१९९७) वा विशाखा गाईडलाईन्सपर्यंत अनेक पातळ्यांवर स्त्रीवादी विचार भारतात, भारतातील विविध राज्यांमध्ये पसरला. जगभर आणि भारतासारख्या विकसनशील देशामध्ये स्त्रीवादी चळवळीने एका महाजागृतीचे काम केले. स्त्रीवादी चर्चाविश्वाची ही ५० वर्षे विविध स्तरांवर तपासता येतात.

## स्त्रीवाद

स्त्रीवादी चळवळ, स्त्री-अभ्यास आणि राज्यसंस्थेने साकारलेले आणि स्वीकारलेले स्त्रियांच्या समतेचे सूत्र, स्त्रियांना समान वागणूक देण्याची भांडवलशाहीची गरज, भांडवलशाहीचे बदलते स्वरूप, भांडवलाने निर्माण केलेली विषमता आणि त्याला स्त्रीवादाने दिलेला प्रतिसाद आदी मुद्द्यांचा प्रभाव पडला; परंतु त्याचबरोबर भारतातील वास्तव हे बहुप्रवाही असल्याने अनेक पातळ्यांवर स्त्रीवादाचा विचार करावा लागणार हेही लक्षात आले; त्यातूनच भारतातील जात वास्तवाशी असणारे स्त्रीप्रश्नाचे नाते तपासण्याची गरज निर्माण झाली. स्त्रीवादाचे एकसाची आकलन येथील वास्तव समजावून घेण्यास उपयुक्त नाही. त्याचबरोबर जात वास्तव आणि वर्गीय संरचना समजावून घेतल्या पाहिजेत हेही ध्यानात आले. त्यातूनच 'स्त्रीवाद' या कोटीक्रमाच्या पलीकडे जाऊन 'दलित स्त्रीवाद' या कोटीक्रमाचा विस्तार झाला. दलित स्त्रीवाद (किंवा स्त्रीवादी दलितत्व) आणि त्यातून झालेल्या विश्लेषणाचा वास्तवाच्या आकलनासाठी उपयोग झाला. आदिवासींच्या जीवनासाठी वेगळ्या स्त्रीवादाची गरज आहे का अशीही चर्चा झाली. सत्यशोधक स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद अशाही स्वरूपात स्त्रीवादाचा विचार झाला. पितृसत्तेने निर्माण केलेल्या आव्हानांना कसे समजावून घ्यावयाचे याचीही चर्चा झाली. पितृसत्तेची अनेकस्तरता, बहुलता समजावून घेणे आवश्यक वाटले, त्यातून ब्राह्मणी पितृसत्तेसारख्या संकल्पनेची चर्चा झाली. 'पितृसत्ता' या कोटीक्रमाबरोबर जेंडर या कोटीक्रमानेही नवे आकलन सादर केले. एलजीबीटीक्यू चळवळीपासून जेंडर परफॉरमेटिव्हिटी अशी अनेक प्रकारे जेंडर लिंगभाव या कोटीक्रमाचा वापर झाला. काळ्या स्त्रीवादाने पुढे आणलेल्या मुद्द्यांचाही विचार झाला. दक्षिण आशियाचा विचार करताना आशीयाई स्त्रीवाद आणि त्याची गरज याविषयी विस्ताराने चर्चा झाली.

राज्यसंस्था, न्यायसंस्था, विद्यापीठे, युजीसी यांसारख्या अनेक घटकांमधूनही स्त्रीवादी चळवळीने आणलेल्या मुद्द्यांची चर्चा झाली; परंतु या चर्चेचे जे स्वरूप राष्ट्रीय पातळीवर राहिले तशीच चर्चा राज्यपातळीवर वा पंचायत पातळीवर आली का, याचा विचार केला पाहिजे. स्त्रीवाद हा केवळ झिरण्याने इथे खालवर पसरला का याची चर्चा केली पाहिजे. स्त्रीवादाचे आकलन हे तुटक-तुटक का राहिले, यामागे पितृसत्तेचे कोणते डावपेच राहिले, भारतासारख्या देशात सरंजामी, निम-भांडवली घटकांनी त्यांना कशी मदत केली याचीही चर्चा करता येते. ज्याला जसे जाणवेल तसेच स्त्रीवादाचे आकलन मांडण्याचा प्रयत्न हा हत्ती आणि सात आंधळे या गोष्टीसारखा आहे, की कोणतीही ज्ञानव्यवस्था सम्यकपणे उभी राहू नये, अशी काळजी घेणाऱ्या पारंपरिक घटकामुळे स्त्रीवाद हा सर्वांपर्यंत पोहोचला नाही, ज्ञानावर सर्वंकष मक्तेदारी ठेवणाऱ्या घटकांनी तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू दिला नाही. सामान्यांपर्यंत पोहोचला तरी त्याची खिल्ली उडवली गेली, उपहास केला गेला वा अनुल्लेखाने मारले गेले. पाश्चिमात्य म्हणून हिणवले गेले. खरे तर स्त्रीवाद हे मानव जातीच्या समतेच्या संघर्षाच्या घुसळणीतून, मंथनातून हाती आलेलं रत्न आहे. त्याचा तसाच विनियोग झाला पाहिजे वा त्याचा तसाच विचार झाला पाहिजे. आजची परिस्थिती बघितली तर एवढ्या विविध चर्चा आणि प्रबोधन होऊनही स्त्रीवादाबद्दल कुत्सित भाव आहे वा उत्सुकता आहे. त्या पलीकडे चर्चाविश्व सरकत नाही.

## स्त्रीवादी साहित्य समीक्षा

मराठी साहित्यातील स्त्रीवाद असा विचार करताना स्त्रीवाद ही एक राजकीय संकल्पना आहे. स्त्रियांचे संरचनात्मक दुय्यमत्व नष्ट करणे आणि स्त्रियांना समतेच्या सूत्राशी जोडणे असे स्त्रीवाद या संकल्पनेत अभिप्रेत आहे. मराठी साहित्याचा स्वतःचा इतिहास आहे. 'मराठी साहित्य' या कोटीक्रमामध्ये काय घटक येतील याचीही विस्ताराने चर्चा करता येईल. मराठी साहित्य विशेषतः आधुनिक मराठी साहित्य समजून घेताना त्याचे वर्गीकरण दलित, ग्रामीण, प्रादेशिक, ऐतिहासिक, सामाजिक अशा विविध प्रकारे केलेले दिसते. आधुनिक मराठी

साहित्यात दलित साहित्याने, स्वतः दलित लेखकांनी ज्या प्रकारे स्वतः ला दलित लेखक घोषित करून लेखन केले. त्याप्रमाणे स्त्रीवादी लेखक असे स्वतःला घोषित करून कोणीही लेखन केल्याचे आढळत नाही. मराठीमध्ये वा एकूण भारतातील साहित्यामध्ये स्त्रीवाद हा मुख्यतः विश्लेषणाचा कोटीक्रम राहील. त्यामुळे मराठीत 'स्त्रीवादी साहित्य समीक्षा' ही संकल्पना अधिक विस्तृतपणे चर्चेला आली. मराठी स्त्रीवादी साहित्य अशी चर्चा करता येत नाही. कोणत्याही लेखकाने लिहिलेल्या लेखनाला स्त्रीवादी साहित्य समीक्षेचा निकष लावून चर्चा करता येईल.

मराठीतील स्त्रीवादी साहित्य असा विचार करताना स्त्रीवाद हे एकासाची आकलन नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. अलीकडे दलित स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारून काही लेखक जाणीवपूर्वक लेखन करताना दिसतात; परंतु ही प्रक्रियासुद्धा अपवादात्मक म्हणता येईल. स्त्रियांनी केलेल्या लेखनाची यादी करणे, त्यांच्या लेखनकार्याचा आढावा घेणे म्हणजे स्त्रीवादी साहित्य नव्हे किंवा पुरुषांनी स्त्रियांच्या जीवनाबद्दल केलेले लेखन म्हणजे स्त्रीवादी साहित्य नव्हे. लेखक नव्हे, दलित लेखक अशी बांधिलकी घेऊन जसे लेखन झाले तसे लेखन झाले नाही. त्यामुळे 'स्त्रीवादी साहित्य समीक्षा' अशा कोटीक्रमाच्या आधारे मराठी वाङ्मयाचा इतिहास वाचावा लागतो. या अर्थाने कोणत्याही संहितेचे स्त्रीवादी वाचन करता येते वा एकाच संहितेच्या, अनेक स्त्रीवादी दृष्टिकोनाच्या आधारे वाचन करता येते. मराठी साहित्याचा इतिहास लिहिताना, प्राचीन मराठी साहित्य असेल वा अर्वाचीन साहित्य असेल, त्याचा स्त्रीवादी अभ्यास कसा करावयाचा याचे काही नमुने शोधले तर सापडू शकतील; परंतु स्त्रीवादी दृष्टिकोनाने दिलेल्या अंतःदृष्टीचा वापर करून एखाद्या संहितेचे वाचन करता येईल वा एखाद्या कालखंडाचे वाचन करता येईल वा सैद्धांतिक पातळीवर-साहित्य शास्त्राच्या पातळीवर अनेक प्रश्न उभे करता येतील; परंतु तसे प्रयत्न झाले नाहीत. कवी शब्द वापरायचा की कवयित्री असा शब्द वापरायचा, याविषयी कोणतीच ठोस निकषांची चर्चा विस्ताराने झाली नाही. केवळ संज्ञा, जाणिवा, शब्द यांचेच आकलन नव्हे, तर साहित्यशास्त्र आणि समीक्षा यांना स्त्रीवादाने कसे समजावून घ्यावे याची सैद्धांतिक चर्चा नाही.

## मराठी स्त्रीवादी साहित्य

भारतीय साहित्यशास्त्रामध्ये रस, ध्वनी, अलंकार, रीती, औचित्य आदी घटकांची चर्चा करणारे साहित्यशास्त्रकार भामहपासून जगन्नाथापर्यंत पुरुष साहित्यशास्त्रकार का आहेत, त्याचीही प्राथमिक पातळीवरची चर्चाही मराठीमध्ये झाली नाही. संहिता, संहितेचा प्रकारासह इतिहास वा समीक्षा (साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र) अशा तीनही पातळ्यांवर स्त्रीवादाने उभी केलेली आव्हाने मराठी साहित्य, मराठी साहित्य समीक्षा कसे पेलणार हा प्रश्न आहेच. स्त्रीवादाचा ज्ञानशाखेत होणारा वावर, स्त्री अभ्यासातून प्रकट झालेले त्याचे स्वरूप या सर्वांचा मराठी साहित्य व्यवहार करणाऱ्यांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. ज्ञान व्यवहाराच्या पातळीवर वा ज्ञानाच्या राजकारणाच्या पातळीवरही स्त्रीवादाने निर्माण केलेले प्रश्न मराठी साहित्य व्यवहाराने मनापासून अभ्यासले पाहिजेत. एकेकाळी आदर्श समीक्षांचे गुणविशेष कोणते अशा प्रकारची झालेली चर्चा वा समीक्षकाने काय केले पाहिजे, याचा विधिनिषेध मराठीत नोंदवला गेला. त्याच प्रकारे अगदी प्राथमिक वाटली, तरी स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय स्त्रीवादी साहित्य समीक्षा म्हणजे काय याची पुन्हा नव्या संदर्भासहित चर्चा केली पाहिजे. काळाने निर्माण केलेली आव्हाने साहित्य आणि समीक्षा व्यवहार कसे पेलतात, या प्रश्नाचा मराठी स्त्रीवादी साहित्य असा विचार करताना विचार केला पाहिजे.

ग्रामीण जीवनात होणारे बदल अतिशय गतिमान आहेत. अतिशय वेगाने गावगाडा बदलत आहे, त्या बदलणाऱ्या गावगाड्यांचे गुंतागुंतीचे स्वरूप ग्रामीण लेखक कसे रंगवतात व प्रकट करतात आणि स्त्रीवादी साहित्य समीक्षा वापरून त्याची चिकित्सा केली, तर काय हाती लागेल याची काही प्रारूपे उभी करता येतील किंवा त्याही पुढे जाऊन गाव गाड्याचे आकलन स्त्रीवादी लेखकांनी उभे केले, तर ते कसे असेल याचेही प्रारूप मांडता येईल वा तसा विचार करता येईल. 'ग्रामीण' हा कोटीक्रम वापरला जात असेल, तर 'ग्रामीण स्त्रीवाद' असा कोटीक्रम का वापरला जात नाही. त्याची विस्ताराने चर्चा करता येईल.

ग्रामीण लेखक म्हणून किती स्त्रिया लेखन करतात इथपासून फ्युडल बिनोव्हलंसी (सरंजामी दयाळूपणा)ची वैशिष्ट्ये कोणती आहेत अशा अनेक प्रकारे ही चर्चा शक्य आहे. अशी प्रारूपे मिळणारच नाहीत वा असे लेखन झालेच नाही असे नाही. ('रिवणावायली मुंगी' या राजन गवसांच्या कथेसारखे संदर्भ शोधता येतील) गावगाड्यातील सरंजामी मूल्ये, पितृसत्ता, जातीव्यवस्था या सर्वांमुळे स्त्रियांचे अनेक स्तरीय शोषण कसे होते हे दाखवणे, ग्रामीण स्त्रीवादाला शक्य होईल याची खुलेपणाने चर्चा करता येणे शक्य आहे. केवळ ग्रामीण साहित्य नव्हे, तर देशीवादी दृष्टिकोन स्वीकारलेल्या लेखनामध्ये स्त्रियांविषयीचा गौरव व अनुदार दिसून येतो. त्या पलीकडे जाऊन वास्तवाची गुंतागुंतीची धारणा मातृसत्ता ते पितृसत्ता संक्रमण आणि त्यात झालेली पडझड अशा अनेक पातळ्यांवर चर्चा करता येईल. हा प्रश्न केवळ ग्रामीण व देशीवादी वा दलित या कोटीक्रमाचा नाही, तर स्त्रीवाद आणि मराठी साहित्य यांचा अनुबंध पुन्हा नव्याने झोखण्याचा, तपासण्याचा हा मुद्दा आहे. कोणत्याही अन्य ज्ञानशाखेला आत्मसात करीत असताना मूळ ज्ञानशाखेने निर्माण होणारे पेच व त्यावरील संभाव्य उत्तरे अशी चर्चा सामाजिक शास्त्रांमधील विविध ज्ञानशाखांनी केली आहे. मराठी साहित्य ही ज्ञानशाखा म्हणून अधिक व्यापक, सखोल होण्याची गरज वाटत असेल, तर इतर ज्ञानशाखांशी होणारे आदान-प्रदान वाढवले पाहिजे. आंतरशाखीयतेचा स्वीकार केला पाहिजे. साहित्याच्या अभ्यासात सौंदर्यशास्त्र वा वाङ्मयाचा इतिहास, लोकसाहित्याचा वा व्याकरणाचा अभ्यास करताना इतर सामाजिक शास्त्रातील ज्ञानशाखांमधून होणाऱ्या बदलांची वा आव्हानांची नोंद गांभीर्याने मराठीचा साहित्य व्यवहार करणाऱ्यांनी घेतली पाहिजे. तर स्त्रीवादाशी होणारी क्रिया-प्रतिक्रिया अधिक सहज-सुलभ आणि परिणामकारक होईल. हा केवळ स्त्रीवादाचा प्रश्न आणि एकूणच मराठी साहित्याला ज्ञानशाखा म्हणून कसे समृद्ध करता येईल, त्याच्याशी हा मूलभूतरीत्या जोडलेला प्रश्न आहे. स्त्रीवादाचे संरचनात्मक आकलन करून घेणे, स्त्री अभ्यासाच्या ज्ञानशाखेमध्ये होणारे मंथन आणि स्वतःच्या मराठी साहित्य या ज्ञानशाखेचे बदलणारे स्वरूप ध्यानात घेतले, तर मराठी साहित्यातील स्त्रीवाद अधिक खुलेपणाने समजून घेता येईल.

**(लेखक इतिहास आणि मराठी साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

# मराठी भाषा : संधी आहे सर्वत्र!

**सुरेश वांदिले**

**आपल्या भाषेवर प्रभुत्व असण्याचा सर्वात मोठा फायदा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यामध्ये होतो. परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरता अभ्यास किंवा फार तर गुणवत्ता यादीत येण्यापुरता अभ्यास केलेल्या कुणासही हा आत्मविश्वास प्राप्त होईल, असे खात्रीने सांगता येत नाही. आपल्या भाषेवर प्रभुत्व येते तेव्हा, त्याचे प्रतिबिंब संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर पडते.**

भाषेच्या प्रभुत्वाचे शस्त्र/अस्त्र ज्यांच्याकडे असते, त्यांना मुंबईसारख्या महानगरामध्ये विविधांगी संधी मिळवणे सुलभ जाऊ शकते. भाषेवर आपली मांड पक्की ठोकता येत असेल, तर आणखी दुसरी भाषा समजून घेणे आणि त्याचा व्यवहारात उपयोग करणे तुलनेने कठीण जात नाही.

आपल्या सामाजिक आणि शैक्षणिक अवकाशात विद्यार्थ्यांना प्रारंभापासूनच भाषेची गोडी लागावी, असे फारसे प्रयत्न होत नाहीत. गणित आणि विज्ञान हेच विषय भविष्यकाळातील यशाच्या सीमारेषा आहेत, असे माध्यमिक स्तरांपासून घरी आणि शाळेतही कळत-नकळत बिंबवले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेला तडे जात असल्याचे त्याला कळत असून, शिक्षकाला दिसत असून आणि पालकांना समजत असूनही विज्ञान आणि गणिताचा अभ्यास रेटला आणि रटला जातो.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक पातळीवरच्या कालावधीत भाषेच्या अभ्यासाला किती वेळ दिला जातो आणि विज्ञान आणि गणिताच्या अभ्यासाला किती वेळ दिला जातो, या बाबतीत समाजशास्त्रीय संशोधनाची गरज आहे. फारतर इंग्रजीच्या अभ्यासाला थोडा अधिक वेळ दिला जात असेल. मात्र मराठी आणि हिंदी, घर की मुर्गी दाल बराबर! त्यातही सातवी-आठवीनंतर हिंदीची अवस्था मुडदूस झालेल्या मुलासारखीच होते. उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुण मिळाले की भरून पावले, अशी मनोवृत्ती गेली कित्येक दशके तशीच राहिली आहे.

मराठी आणि हिंदी भाषा कामचलाऊ स्वरूपात शिकली तरी चालू शकते अशी पालकांची सर्वसाधारण धारणा असल्याने व शाळांचीही तशीच वर्तणूक असल्याने या दोन्ही भाषांचा पाया मजबूत होणे दूरच राहिले, मुळात पायाच रचला जात नाही. इंग्रजी समजायला कठीण म्हणून किंवा त्या भाषेचे अनाकलनीय श्रेष्ठत्व मनात ठसले असल्याने काही पालक इंग्रजीची शिकवणी मुलांना लावतात. त्यातही विज्ञान आणि गणिताची शिकवणी शंभरातील ९० मुले लावत असतील, तर इंग्रजीची शिकवणी ४० ते ४५ किंवा त्यापेक्षा कमीच मुले लावतात. वर्षानुवर्षे यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. मराठी आणि हिंदीची शिकवणी लावून देणारे पालक शोधून त्यांचा सत्कार करावा लागेल. या दोन्ही भाषांची शिकवणी लावून अभ्यास करायचा म्हणजे, वेळ आणि पैशाचा अपव्यय असे समजले जाते. शिवाय, काय तुमच्या मुलाला मराठी आणि हिंदीची शिकवणी! असे दुष्ट बुद्धीचे आणि तुमचा मुलगा इतका निकृष्ट बुद्धिमत्तेचा कसा? अशा आशयाचे (अडाणी आणि निर्बुद्ध) सवाल इकडून-तिकडून येण्याची शक्यता बहुतेक सर्वच पालकांनी गृहीत धरली असते. त्यामुळे मराठी आणि हिंदी शिकवणी वर्गाच्या रस्त्यावर शुकशुकाट असतो.

शिकवणी लावल्यानेच परिपूर्ण अभ्यास होतो, असे इथे अभिप्रेत नाही. मात्र घरीसुद्धा वेळापत्रकात भाषेच्या अभ्यासासाठी अगदीच केविलवाणे (गावकुसाबाहेरचे) स्थान असते. अशा स्थितीत माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण संपल्यावर मग पुढील पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेच्या प्रवासात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेच्या अभ्यासाला शून्य अथवा अल्प स्थान दिले जाते.

गणित आणि विज्ञानात हुशार असणारी मुले पुढे अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, चार्टर्ड अकाऊंटंट अशा शाखांकडे निघून जातात. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या त्यांच्या कामापुरते भाषांचे ज्ञान पुरसे ठरते. त्यातही इंग्रजी भाषेतून अध्ययन होत असल्याने, त्यात या मुलांनी थोडीफार गती प्राप्त केली असते. मात्र तीसुद्धा उत्तम गुण मिळवण्यापुरती मर्यादित असते. त्याला भाषाशास्त्राचा किंवा सौंदर्याचा काहीही संबंध नसतो. त्याने या विद्यार्थ्यांचे अडत नाही, असा एक समज असतो. इंग्रजी भाषेची अशी अवस्था असेल तर मराठी आणि हिंदीची अवस्था स्वाभाविकरीत्या केविलवाणी आणि दयनीय अशीच होणार! त्यामुळेच विज्ञान, तंत्रज्ञान शाखा, वाणिज्य शाखा, विधि शाखांकडे वळलेल्या विद्यार्थ्यांना वगळून इतरांचा आत्मविश्वास हा ढासळलेलाच असतो.

## आकलनावर मर्यादा

माध्यमिक आणि उच्च-माध्यमिक पातळीवर मराठी / हिंदी / इंग्रजीकडे कामचलाऊ पद्धतीने बघितल्याने, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांच्या आकलनावर अनंत मर्यादा येतात. मराठी विषयात पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना सूर्यातील, सू हा ऱ्हस्व की दीर्घ, तीर्थरूपातील, ती ऱ्हस्व की दीर्घ अशासारखे प्रश्न विचारले असता, त्यांची फे फे उडते. ही कटू असणारी वा अनेकांना अजिबातच पचनी न पडणारी वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. अशा उमेदवारांचे ओशाळलेपण लगेच जाणवते.

त्यांनाही याची जाणीव असते. त्यामुळे त्यांच्या अंतर्मनातच आत्मविश्वासाला तडे गेलेले असतात.

भाषेवर प्रभुत्व मिळवल्यास त्याचा उपयोग आत्मविश्वास वाढण्यासाठी होतो. आपली भाषा पक्की समजत असेल, तर दुसरी भाषा समजून घेणे किंवा शिकणे आणि त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करणे हे कठीण जात नाही. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. यामध्ये डॉ.रघुनाथ माशेलकर, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. विजय गोवारीकर, मधु मंगेश कर्णिक इत्यादी. ही नावे फारच थोर आणि मोठी आहेत हे मान्य केले तरी, यांच्या आयुष्याचा प्रारंभ मराठी भाषेच्या पक्क्या वाटेनेच झाला, हे विसरता येत नाही.



भाषेवर चौफेर प्रभुत्व मिळवण्यासाठी विज्ञान किंवा गणित या विषयांना जितका वेळ दिला जातो, तितका भाषेच्या अभ्यासाला देणे गरजेचे आहे. तरच भाषेचे तंत्र आत्मसात करण्यासाठीच्या संकल्पना स्वयंस्पष्ट होऊ शकतात. विज्ञान आणि गणिताचा अभ्यास करताना अशा संकल्पना कळल्या नाही, त्यात स्वयंस्पष्टता आली नाही, तर पुढे काहीही न कळण्याची शक्यता अधिक असते. परिणामी फक्त पाठांतर उरते. पाठांतराने बोर्डाच्या किंवा विद्यापीठाच्या परीक्षेत चांगले गुण मिळतील किंवा मिळू शकतात; पण नंतर जेव्हा विविध स्पर्धा परीक्षा किंवा उच्च अभ्यासक्रमांसाठीच्या परीक्षा दिल्या जातात, तेव्हा संकल्पना स्पष्ट नसल्यानेच विद्यार्थ्यांच्या विकेट सटासट उडत असतात.

राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील इंग्रजी आणि मराठी भाषेच्या ज्ञानाची तपासणी करण्यासाठीचे पेपर असतात. या पेपरची संरचना ही उमेदवारांच्या संकल्पनात्मक बाबी कितपत स्पष्ट आहेत, त्याचा ते प्रशासकीय कामकाजात कितपत उपयोग करू शकतात, हे जाणून घेण्यासाठी केला जातो. भाषेचे पेपर हे तज्ज्ञांकडून तयार करताना, त्यांना तसे स्पष्ट निर्देश दिले जातात. स्पर्धा परीक्षा शिकवणी वर्गांमध्ये भाषाविषयक अभ्यासासाठी जी गुरुकिल्ली किंवा चोपडी दिली जाते, त्याच्या पाठांतरावरच विद्यार्थी अधिक भर देतात. अशा शिकवणीवर्गाचे संचालकही तशीच अपेक्षा ठेवतात. मरमरून अभ्यास केला, असे कितीही रडगाणे गायले तरी, भाषाविषयक पेपरमध्ये किमान गुणही न मिळवणे अथवा जेमतेम गुण मिळवणे या बाबी अपयशाच्या दारात नव्हे, दरीत ढकलत असतात. इतर विषयघटकांबाबत जशी चर्चा होते, तशी नंतर भाषाविषयक प्रश्नांची चर्चा अभावानेच केली जाते. स्पर्धा परीक्षांमध्ये अपयशासाठी भाषेवर प्रभुत्व नसणे हे एक कारण ठरते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

स्पर्धा परीक्षा शिकवणी वर्गातही इतर विषयघटकांना शिकवण्यासाठी जितका वेळ दिला जातो, तितका भाषेच्या अध्यापनासाठी दिला जात नसावा, अशी शंका व्यक्त करण्यास निश्चितच जागा आहे. भाषेचा अभ्यास ठरावीक पद्धतीने व पठडीने करण्याकडे कल असतो. संकल्पना समजून देण्यासाठी कष्ट घेतले जात नाही व त्याची गरजही समजली जात नाही.

## वेळेचा अपव्यय समजण्याची चूक

सर्वसामान्य विद्यार्थ्यांना भाषेचा अभ्यास हा वेळेचा अपव्यय वाटणे ही बाब चिंताजनक आहे. त्याकडे शिक्षक आणि पालक दोघेही लक्ष देत नाहीत. महाविद्यालयात प्राध्यापक लक्ष देत नाहीत. नंतर तो विद्यार्थी बेफिकीर बनतो. भाषेवर प्रभुत्व नसले तरी फारसे बिघडत नाही, असे त्याला ठामपणे वाटत राहते. तो या प्रवाहात वाहत जाऊन अपयशाला जवळ करतो आणि हळूहळू आत्मविश्वासही गमावून बसतो.

आपल्या मातृभाषेवरचे प्रभुत्व इतर भाषांमध्ये सुलभ संचार करण्यासाठीची गुरुकिल्ली ठरते. ही गुरुकिल्ली आपल्या हाती असूनही त्याचा आपण उपयोग करत नाही. ही परिस्थिती बदलणे फार अवघड आहे असेही नाही. मराठी भाषेचा अभ्यास पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावर करतानासुद्धा भाषेचे तंत्र समजून घेणे, संकल्पना समजून घेण्यासाठी पुन्हा एकदा, बालभारती ते कुमारभारतीचा प्रवास करण्यास कुणास कमीपणा वाटू नये. हा प्रवास मूलभूत संकल्पनांवर भर देणारा आणि भाषेच्या अभ्यासाची पायाभरणी करणारा आहे.

## गर्जा जयजयकार कशासाठी?

२७ फेब्रुवारी आली की महाराष्ट्रात मराठीचा गर्जा जयजकार सुरू होतो. मराठीचे श्रेष्ठत्व सांगण्याची चढाओढ सुरू होते. त्याचबरोबर मराठीच्या भविष्याविषयी चिंता व्यक्त केली जाते. मराठी शिकून करायचं काय? हा मराठीजनांचा गेल्या अनेक वर्षांपासूनचा फारच आवडता सवाल, हमखास विचारला जातो. मराठी विषय हा करिअर करण्यासाठी अजिबात उपयुक्त ठरू शकत नाही असे लिहिले आणि बोलले जाते.

*ज्या मराठीचा अभिमान बाळगण्यासाठी,*
*पक्षिआंमध्ये मयोरु/वृक्षिआंमध्ये कल्पतरु//*
*भाषांमध्ये मानु थोरु/मराठियेसी,*
या गुणवर्णनाची हमखास आठवण करुन दिली जाते किंवा
*जैसे दीपांमाझी दिवटी/*
*का तिर्थीमाझी पूर्णिमा गोमटी/*
*तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी सर्वोत्तम//*

असं ज्ञानेश्वर माऊलींची साक्ष ठेवून सांगितले जाते, ती मराठी करिअर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकत नाही असे का समजले जाते? एकिकडे मराठीला, अमृताची उपमा द्यायची आणि दुसरीकडे मराठी में कुछ जान नहीं, असे करिअरच्या अनुषंगाने म्हणायचे, ही मोठीच विसंगती आणि मराठीजनांचे दुर्दैव्य!

## लिहिणे कठीण का जाते?

वेगवेगळ्या मुद्रित माध्यमांमधून मराठीत लिहिणारे मान्यवर, प्राध्यापक, हौशी लेखक यांच्याकडून एखाद्या लेखाची सर्वसाधारण मांडणीसुद्धा नीट केली जात नसल्याचे दिसून येते. लेखाची सुरुवात वर्तमानकाळात केली असेल तर लगेच दुसऱ्या वाक्यात भूतकाळ डोकावतो. तिसऱ्या वाक्यात आणखी तिसराच काळ येतो. साधे, सोपे, सरळ लिहिणे कठीण का जात असावे?

खूप मोठी वाक्ये लिहिताना व्याकरणाच्या साध्या-साध्या नियमांकडेही दुर्लक्ष होत असते. मोठी वाक्ये, छोटी आणि सुटसुटीत करता येतात. तशी ती करायची नसेल तर स्वल्पविराम किंवा इतर विरामचिन्हे कुठे द्यायची याचे भान ठेवायला हवे, तेही दिसत नाही. त्यामुळे वाक्ये क्लिष्ट आणि किचकट बनतात.

हे सांगण्याचा हेतू हाच की, आपल्याला ज्या भाषेतून करिअर करायचे आहे, तीच व्यवस्थित लिहिता येत नसेल वा बोलता येत नसेल तर या भाषेत रोजगार किंवा करिअरच्या संधी कशा मिळू शकतील?

## मर्यादित संधी आणि संधींचा शोध

मराठी भाषेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेतल्यावर लगेच रोजगाराच्या संधी मिळतील असे शक्य नाही. सध्यातरी आपल्याकडे फक्त अभियंत्यांना पदवी अभ्यासक्रम केल्याबरोबर अशा संधी मिळू शकतात; पण त्यासुद्धा माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अथवा संगणक विज्ञान क्षेत्रातच मिळतात. इतर अभियांत्रिकी ज्ञानशाखांच्या विद्यार्थ्यांना करिअर संधी लगेच मिळत नाही. त्यांनासुद्धा माहिती तंत्रज्ञान क्षेत्र किंवा संगणक विज्ञान क्षेत्रातच सुरुवातीची उमेदवारी करावी लागते. ही परिस्थिती किंवा वस्तुस्थिती मराठी भाषेचा पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी लक्षात ठेवायला हवी.



मराठी भाषेत पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या बहुतेक सर्वच विद्यार्थ्यांना कनिष्ठ किंवा वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी हवी असते. ते तर शक्य नाही. शाळांमध्ये मराठी विषयाच्या शिक्षकांची पदे मोठ्या संख्येने निघतील असेही नाही. त्यामुळे अध्यापनाच्या क्षेत्रात करिअरच्या संधी मर्यादितच राहतील, हे स्पष्ट आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभ्यास करताना इतर क्षेत्रांचा विचार प्रारंभापासूनच करायला हवा.

## विविध क्षेत्रे

सध्या वेगवेगळ्या माध्यमांमध्ये म्हणजेच मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, डिजिटल माध्यमे, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट, मालिका, ओव्हर द टॉप म्हणजे ओटीटी माध्यमे किंवा प्लॅटफॉर्म, आशय लेखन म्हणजेच कंटेट रायटिंग, संशोधन, अनुवाद किंवा भाषांतर अशा क्षेत्रांत सातत्याने मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. पण या क्षेत्राच्या गरजा पूर्ण करू शकतील, इतपत ज्ञान प्राप्त केलेले व त्याचा प्रत्यक्ष प्रभावी वापर करू शकणारे उमेदवार मिळत नाहीत, असे दिसून येते.

इंग्रजीतून मराठीमध्ये भाषांतर करणारे थोडेफार समाधानकारक उमेदवार मिळतात तरी, मात्र मराठीतून इंग्रजीमध्ये भाषांतर किंवा अनुवाद करणाऱ्यांची प्रचंड वानवा आहे. मागणी अधिक आणि पुरवठा अतिशय कमी अशी स्थिती आहे. मराठीतून इंग्रजीत अनुवादाच्या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी आहेत. साहित्य संस्कृती मंडळामार्फत अनुवादाची योजना राबवली जाते; पण अनुवादकांच्या कमतरतेमुळे ही योजना फारशी पुढे जाऊ शकली नाही. राज्याच्या सांस्कृतिक धोरणात, मराठीतील साहित्य इतर भाषेत आणि इतर भाषेतील साहित्य मराठीत आणण्यावर भर देण्यात आला होता; पण अनुवादकांच्या कमतरतेमुळे हा प्रकल्प फार पुढे सरकू शकला नाही. महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाला भाषांतर आणि अनुवादासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज भासते; पण त्यांनासुद्धा योग्य त्या दर्जाचे मनुष्यबळ मिळणे कठीण जात आहे.


न्यायालयाचे कामकाज मराठीतून व्हावे असा निर्णय झालेला आहे. पण तो तितका फलद्रूप झाला नाही, कारण कायद्याची पुस्तके मराठीत येऊ शकली नाहीत. म्हणजेच या क्षेत्रातील पुस्तके किंवा ग्रंथ भाषांतर करू शकतील असे मनुष्यबळ अल्प प्रमाणातच उपलब्ध झाले.

मराठी भाषेत मुद्रितशोधकांची अतिशय कमतरता निर्माण झाली आहे. याकडे लक्ष पुरवले गेले नाही तर पुढील काही काळात मुद्रितशोधक हा घटकच नाहीसा झालेला दिसू शकतो. अशीच स्थिती मराठी स्टेनोग्रॉफर म्हणजेच लघुलेखक या क्षेत्रातही दिसून येते.

## मातृभाषेला प्राधान्य

नवीन शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. आपल्याकडे १२वीपर्यंत मराठीतून बहुतेक सर्व ज्ञानशाखांची पुस्तके आहेत. मात्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरची अशी पुस्तके किंवा अध्ययन साहित्य उपलब्ध नाही. मराठी भाषेतून विविध ज्ञानशाखा त्यातही विज्ञान-तंत्रज्ञान-अभियांत्रिकी-वैद्यकीय शाखांमध्ये मराठीतून शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्याने अथवा अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असल्याने मराठी

मुले, मातृभाषेतून उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. देशातील काही महाविद्यालयात हिंदीमध्ये व महाराष्ट्रात एक-दोन महाविद्यालयात अभियांत्रिकीचे संपूर्ण शिक्षण मराठीतून देण्यास प्रारंभ झाला आहे. एकूणच भविष्यात स्थानिक भाषांमधून शिकवण्यावर भर दिला जाईल असे सध्याचे चित्र आहे. त्यासाठी उच्च शिक्षणासाठीचे अध्ययन साहित्य हे स्थानिक भाषेत तयार करावे लागेल. त्या विषयाचे तज्ज्ञ प्रारंभिक तयारी करून देतील. मात्र त्यांना या कामात सफाईदारपणा आणण्यासाठी मराठी जाणकारांची गरज मोठ्या प्रमाणावर भासू शकते, हे लक्षात घ्यायला हवे.



आपल्याकडे नागरी सेवा म्हणजेच सिव्हिल सर्व्हिस परीक्षा मराठीतून देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या ६० वर्षांत अल्पच राहिली आहे. तीच ती उदाहरणे पुन्हा-पुन्हा द्यावी लागतात. मराठीतून परीक्षा देणाऱ्यांची संख्या न वाढण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, नागरी सेवा परीक्षेसाठी मराठी भाषेत दर्जेदार साहित्यच उपलब्ध नसणे. सामान्य अध्ययन किंवा जनरल स्टडीज या पेपरचा नागरी सेवा परीक्षेत महत्त्वाचा वाटा असतो; पण त्याचीही पुस्तके मराठीत नसल्यासारखीच आहेत. त्यामुळे मुलांना इंग्रजीकडे वळण्यावाचून पर्याय उरत नाही. मराठीतून परीक्षा द्यायची असे एखाद्याने ठरवले, तर त्याला आधी इंग्रजीतून अभ्यास करावा लागेल आणि मराठीत नोंदी कराव्या लागतात. हा असा वेळखाऊ प्रकार करण्याऐवजी मुले इंग्रजीतूनच अभ्यास करण्याला प्राधान्य देणार, हे स्पष्ट आहे.

मराठी भाषेमधील जाणकारांसाठी या क्षेत्राचे महत्त्व यावरून लक्षात यावे. हे मोठे कष्टाचे काम आहे; पण नागरी सेवा परीक्षांसाठी इंग्रजीच्या तोडीस तोड ग्रंथसंपदेच्या निर्मितीप्रक्रियेत करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

सध्या एकूणच देशामध्ये बहुतेक सर्व स्पर्धा परीक्षा या स्थानिक भाषांतून व्हाव्यात, असा विचारप्रवाह आहे. दक्षिणेतील राज्ये यासाठी आग्रही आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशासाठी असलेली नॅशनल एलिजीबिटी कम एन्ट्रन्स टेस्ट (नीट) आता १३ भाषांमधून देता येते. सर्व केंद्रीय विद्यापीठांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सेंट्रल युनिव्हर्सिटी-कॉमन एन्ट्रन्स टेस्ट, घेण्याचा निर्णय झाला आहे. ही परीक्षासुद्धा १३ भाषांमधून देण्याची सुविधा आहे. मराठी भाषा घेऊन ही परीक्षा देणाऱ्या उमदेवारांना चांगले यश मिळवण्यासाठी दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण साहित्य उपलब्ध झाले तरच ते शक्य होईल. याचाच अर्थ याही क्षेत्रात मराठी भाषातज्ज्ञांना भविष्यात मोठी संधी मिळू शकते.

स्थानिक भाषांचा आग्रह लक्षात घेता, भविष्यात बँका, रेल्वे, संरक्षण दल याही क्षेत्रांच्या चाळणीपरीक्षा मराठीतून घेण्याचा निर्णय होऊ शकतो.

भाषा सल्लागार समितीने महाराष्ट्रात असणाऱ्या केंद्रीय आस्थापनांमध्ये मराठी अधिकारी नेमावा अशी मागणी केली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची आता दाट शक्यता आहे. त्यानंतर केंद्र शासनाकडून बराच मोठा निधी म्हणजेच साधारणतः शंभर ते दीडशे कोटी किंवा त्याहीपेक्षा अधिक निधी मिळू शकतो. तेव्हा राज्याच्या मराठी भाषा विभागाकडून अनेकविध उपक्रम राबवले जाऊ शकतात.

प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा आग्रह लक्षात घेता, पुढील काळात शासनाची सर्व संकेतस्थळे म्हणजेच वेबसाईट्स या संपूर्णपणे मराठी होऊ शकतात. सध्या अशा संकेतस्थळावरील मर्यादित पृष्ठे मराठीत असतात आणि उर्वरित पृष्ठे इंग्रजीत असतात. या इंग्रजी मजकुराला भाषांतर करण्यासाठी तज्ज्ञ मनुष्यबळ लागेल.

केंद्र शासन आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांच्या जाहिराती, या आता स्थानिक भाषेतूनच देण्यावर भर देण्यात येत आहे. मात्र त्यासाठी उत्तम अनुवादक उपलब्ध होत नाहीत. या जाहिरातींचा मजकूर अनुवादासाठी ज्या मराठी जाणकाराकडे दिला जात असावा, त्याचे तोडके ज्ञान प्रत्येक जाहिरातीतून उघडे पडलेले आपणास सातत्याने दिसत असते. त्यामुळे या क्षेत्रातही चांगल्या संधी मिळू शकतात.

मराठीतला पहिला उपलब्ध ग्रंथ-गाथा सप्तशती हा २००० वर्षांपूर्वीचा आहे. मराठीतील पहिला शिलालेख २,२२० वर्षांपूर्वीचा असून तो नाणेघाटात सापडला. त्याआधी किमान २०० ते ३०० वर्षांपासून मराठी अस्तित्वात असावी, याचे बरेच ठोस पुरावे, मराठीचे अभिजातत्व सिद्ध करण्यासाठी नेमलेल्या सत्यशोधन समितीने शोधले आहेत. या सर्व बाबींवरून मराठी ही सक्षम आणि समर्थ भाषा असल्याचे सिद्ध होते. त्यामुळेच या भाषेचे परिपूर्ण ज्ञान मिळवले तर करिअरच्या विविध संधी मिळू शकतात.(काही संधी निर्माणही करता येऊ शकतात.)

**(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सेवानिवृत्त संचालक आहेत.)**

'परागंदा झालेला माणूस मातृभूमीसाठी खऱ्या अर्थाने अधिक जगत असतो.' असे जी.ए. कुलकर्णी यांचे एक विधान आहे. मातृभूमीच्या विरहामुळे 'ने मजसि ने परत मातृभूमीला' ... हे वि.दा. सावरकरांनी लिहिलेलं काव्यही आपणास माहीत आहे. आपण आपल्या भाषा आणि संस्कृतीपासून अलिप्त राहिल्याने भाषेची ओढ अधिक लागते. त्यासाठी तो धडपडून आपली भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो. त्यामुळे परदेशस्थ मराठी माणसांनी संघटना स्थापन केल्या. अभिव्यक्तीची ओढ असणारी मराठी माणसं भाषा, साहित्य आणि संस्कृतीसाठी एक झाली. त्यांनी आपल्या पुढच्या पिढीसाठी शाळा सुरू केल्या. सण-उत्सव साजरे केले. मंडळे स्थापन केली. विश्वसंमेलने भरवली.

आता पाचवी पिढी तेथे वास्तव्य करते; पण त्यांनी आपली मराठी संस्कृती आणि आपली भाषा टिकवून ठेवली आहे.

## महाराष्ट्र मंडळाची स्थापना

परदेशातील मराठी भाषिकांनी साहित्य मंडळे स्थापन करून मराठी अस्मिता जागृत ठेवली आहे. पश्चिमी ऑस्ट्रेलियाची राजधानी असलेल्या पर्थमध्येही अनेक महाराष्ट्रीयन लोक नोकरीनिमित्त स्थायिक झाले आहेत. मराठी भाषिकांनी एकत्र येऊन तेथे २०१२ साली पर्थ महाराष्ट्र मंडळाची स्थापना केली आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया या राज्यातील सर्वात मोठे आणि अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकावरील मोठे शहर म्हणजे लॉस एंजेलिस. तेथील महाराष्ट्र मंडळ मागील ४० वर्षांपासून दक्षिण कॅलिफोर्नियातल्या मराठी माणसांना एकत्र आणण्याचे काम करत आहे.

# परदेशातील मराठी अस्मिता

डॉ. प्रकाश दुकळे

**कोणत्याही माणसाला आपल्या मातृभूमीविषयी आणि मातृभाषेविषयी अभिमान वाटत असतोच. यालाच अस्मिता असे म्हणतात. अस्मिता या शब्दात अभिमान आणि 'मी आहे' अशी भावना व्यक्त होते. मराठी माणसाच्या अंगी स्वाभिमान आणि बाणेदारपणा तुडुंब भरलेला आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेला आपण 'मराठीपण' म्हणतो. ही अस्मिता केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही, तर ती परदेशस्थ मराठी माणसामध्येही आहे.**

अवघ्या काही कुटुंबांनी एकत्र येऊन सुरू केलेले महाराष्ट्र मंडळ आज हजारो मराठी लोकांना एकत्र आणणारे त्यांचे माहेरघर झाले आहे. इस्रायलमध्ये ज्यूधर्मियांवर ग्रीकांनी हल्ला केला. त्यावेळी ज्यू लोक आपला देश सोडून वाट सापडेल तिकडे धावले. त्यातील काही लोक कोकणातील अलिबागच्या किनाऱ्याजवळील गावामध्ये राहिले. तिथे ते मराठी शिकले. त्यांची मुले मराठी शाळेत घातली. परिस्थिती निवळल्यावर हे लोक पुन्हा इस्रायला परतले. तिथे त्यांनी मराठी भाषा जतन केली आहे. मराठीतून त्यांनी साहित्य लेखन केले आहे.

## या देशात बोलली जाते मराठी

भारतातील ९ राज्ये, ४ केंद्रशासित प्रदेश आणि ११३ देशांमध्ये मराठी भाषिकांची वस्ती आहे. इतरही अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलण्याचे प्रमाण वाढत आहे. मराठी भाषा भारतासह, फिजी, मॉरिशस व इस्रायल या देशांतही बोलली जाते. त्याचबरोबर जगभरात विखुरलेल्या मराठी भाषिकांमुळे मराठी भाषा अमेरिकेची संयुक्त संस्थाने, संयुक्त अरब अमिरात, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, सिंगापूर, जर्मनी, युनायटेड किंग्डम, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथेही बोलली जाते.

परदेशस्थ मराठी लेखक भारतात जन्मलेले व इथेच मराठी शिकून परदेशात गेलेले आहेत. नोकरी, व्यवसाय, उद्योगधंदे आणि विविध कारणांनी झालेल्या स्थलांतरामुळे मराठी भाषिकांचे वास्तव्य विविध देशांमध्ये घडत आहे. अमेरिकेत ४० लाखांपेक्षा अधिक भारतीय लोक आहेत. त्यातील एक ते दोन लाख रहिवासी मराठी लोक असावेत, असा अंदाज डॉ. अनंत लाभसेटवार यांनी व्यक्त केला आहे. आज अमेरिकेत जवळपास चाळीस मराठी शाळा आहेत. तेथे मराठी नाट्य महोत्सव, विश्व मराठी साहित्य संमेलनही भरवले जाते. मॉरिशससारख्या देशात भारतातून एकेकाळी मजूर म्हणून नेलेल्या लोकांना इंग्रजांनी गुलाम बनवले होते. त्यांची

## महाराष्ट्र मंडळ, डेन्मार्क

डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन येथे वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रीयन लोकांनी एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली होती. या सण उत्सवांच्या निमित्ताने कोपनहेगनस्थित मराठी कुटुंबे एकत्र येऊ लागली आणि त्यातूनच मंडळाच्या स्थापनेची संकल्पना २०१२ साली आकाराला आली.

## महाराष्ट्र मंडळ, फ्रान्स

फ्रान्समध्ये राहणारे महाराष्ट्रीयन आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या फ्रेंच नागरिक यांच्या सांस्कृतिक, सामाजिक पैलूंचे संवर्धन तसेच विकास करण्याच्या हेतूने महाराष्ट्र मंडळ फ्रान्सची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र मंडळ (मलेशिया), मराठी मंडळ दक्षिण आफ्रिका, मराठी भाषक संघ (मॉरिशस), बृहन्महाराष्ट्र मंडळ (कॅनडा), मराठी मंडळ (टोरांटो ) अशी कित्येक मंडळे विविध देशात कार्यरत आहेत. सण-उत्सवानिमित्त एकत्र आलेल्या लोकांना मंडळ काढण्याची प्रेरणा महत्त्वाची ठरली आहे. या मंडळांच्या माध्यमातून त्यांनी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतिविषयक उपक्रम राबवले आहेत.

## परदेशातील मराठी मासिके

परदेशस्थ मराठी भाषिकांना खुराक मिळते ती नियतकालिके आणि साहित्यातूनच. उत्तर अमेरिकेत 'एकता' हे एकमेव त्रैमासिक कॅनडातून प्रकाशित होई. बृहन्महाराष्ट्र मंडळ दर महिन्याला एक वार्तापत्र प्रकाशित करते. अमेरिकेतूनच 'अंतराळ' हे ई-मासिक प्रकाशित होते. 'ज्ञानोदय' हे अमेरिकन मराठी मिशन, प्रोटेस्टंट मिशनरी गटाने प्रकाशित केलेले मराठी नियतकालिक आहे. १९७५ च्या दरम्यान अखिल भारतीय इस्रायल ज्यू संघटना स्थापन झाली. या संघटनेच्यावतीने १९७७ साली 'सत्यप्रकाश' मासिक सुरू झाले. पुढे रेचल गडकरी यांनी 'सायली' नावाचे त्रैमासिक सुरू केले. इस्रायलमध्ये 'मायबोली' हा अंक सुरुवातीला हस्तलिखित स्वरूपात प्रकाशित केला गेला. मराठी फॉन्टची समस्या दूर होताच १९८७ पासून हा अंक छापील स्वरूपात उपलब्ध झाला.



## काही गाजलेली पुस्तके, काव्यसंग्रहे

परदेशात मराठी साहित्यिक विपुल लेखन करत आहेत. दिलीप विष्णू चित्रे यांचे अमेरिकेतील भारतीयांच्या अनुभवावर आधारलेलं 'अलिबाबाची हीच गुहा' हे नाटक खूप गाजले होते. इ.स. १९७० च्या दशकात जगभरातील वेगवेगळ्या देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या लेखकांकडून लिहून घेतलेल्या कथांचा 'कुंपणाबाहेरचे शेत' नावाचा कथासंग्रह त्यांनी प्रसिद्ध केला होता. दिलीप आणि मीना चित्रे हे दाम्पत्य मूळचे बडोद्याचे; पण ४५ हून अधिक वर्षे त्यांचे वास्तव्य अमेरिकेत होते. 'गोठलेल्या वाटा', 'गौरी गौरी कुठे आलीस', 'पानगळीच्या आठवणी' ही मीनाताईंची काही गाजलेली पुस्तके असून, दिलीप वि. चित्रे यांचा १९८८ साली प्रकाशित झालेला 'हिमगंध' हा कवितासंग्रह आणि त्यांचे अमेरिकेत मराठी साहित्य, नाटक, चित्रपट, काव्यवाचन अशा मराठी मनाशी संबंधित अनेक गोष्टींचे संयोजन त्यांनी केले. 'महाराष्ट्र फाऊंडेशन' या संस्थेमध्ये तिच्या स्थापनेपासूनच शोभा आणि दिलीप विष्णू चित्रे यांनी कार्य केले.

डॉ. अनंत लाभसेटवार यांची २५ हून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. अमेरिका : दशा व दिशा (वैचारिक), अमेरिकेच्या दुर्बिणीतून भारत (लेखसंग्रह), अमेरिकेतील वाटचाल (आत्मकथन), अमेरिकेतील वाटचाल (माहितीपर), घरट्यापलीकडे (कथासंग्रह), अशी त्यांची समृद्ध ग्रंथसंपदा आहे. अमेरिकेत मराठी लेखकांच्या वाङ्मयनिर्मितीत कथासाहित्य विपुल आहे. अजिता काळे व अशोक काळे या दाम्पत्याने 'दूर देशीच्या गोष्टी' (१९८६), 'घडलेली कथा' (१९८६) कथासंग्रह प्रकाशित केले. याच दरम्यान, डॉ. ललिता गंडभीर लिखित 'तारेवरची कसरत' (१९८७), 'पश्चिमगंध' (१९८९), डॉ. प्रकाश लोथे लिखित 'हास्यरेखा' (२००१), 'ऊनपाऊस' (२००२) लेखिका संध्या कर्णिक यांचा 'कुणास्तव कुणीतरी' (२००१) डॉ. उषादेवी कोल्हटकर लिखित 'फुलांना घर नसतं' (२००१), विद्या हर्डीकर सप्रे कर्णिक संपादित 'निरंतर' (२००१) 'घरट्यापलीकडे' (२००३) इ.

या बरोबरच कादंबरी या दीर्घ वाङ्मय प्रकारातही लेखन झालेले आहे. यामध्ये डॉ. उषादेवी कोल्हटकर लिखित 'किमया' (१९९७), 'हरवलेला किनारा' (२००९) डॉ. ललिता गंडभीर यांची 'दहशतवादाची कथा' ही कादंबरी २००३ साली प्रकाशित झाली. डॉ. प्रकाश लोथे लिखित 'धर्मधुरीण' (२०१७), डॉ. नीलिमा कुलकर्णी लिखित 'स्त्री जीवनाचे कवडसे' (२०१७) इ. कादंबऱ्या प्रकाशित आहेत.

कविता व नाटक वाङ्मय प्रकारात ना.मा. दातार लिखित 'काव्यशास्त्र विनोदेन' आणि कवयित्री सुषमा येरवडेकर यांचे 'बोबडकांदा बोबडकांदा', कवयित्री अनुराधा गानू यांचे 'मोरपिस', 'हरवले ते गवसले का' तसेच शशिकांत पानट लिखित 'अमेरिका तरंग' हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्याचबरोबर अमेरिकन मराठी कवी-कवयित्री हे अमेरिका व कॅनडा या देशातील नियतकालिकांतूनदेखील आपल्या कविता प्रकाशित करतात.

वैज्ञानिक, संशोधक, व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींनी चरित्र व आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार हाताळला आहे. यामध्ये डॉ. गंगाधर मधिवार यांचे 'कशासाठी कुणासाठी', डॉ. लाभसेटवारलिखित 'अमेरिकेतील धावपळ', डॉ. श्रीनिवास ठाणेदार 'ही श्रीं ची इच्छा', डॉ. मीना नेरूरकर 'धन्य ती गायनॅक कला' इ. आत्मकथने प्रकाशित आहेत.

कॅनडा देशातील मराठी साहित्याचे स्वरूप मर्यादित आहे. लेखिका - जयश्री थत्ते - भट यांचा 'मावळतीची झाडे' (जुलै १९८८), 'मानवाचे वरदान' (जानेवारी १९९२), स्मिता भागवत यांची 'व्यथा व्यक्त होताना', 'तिची कथाच वेगळी', 'परक्या भूमीवर घर' इ. कथासंग्रह प्रकाशित आहेत. विद्युल्लेखा अकलूजकर यांचा 'दर्पणी पाहता रूप' (फेब्रुवारी २०११) हा कथासंग्रह प्रकाशित आहे.

कादंबरीकार स्मिता भागवत यांच्या 'शून्याचं मोल अमोल' (फेब्रुवारी २००७), 'काचेपाठचा समुद्र', तेजस्विनी (जुलै २०११), 'अचानक' (मे २०१६), 'पुत्र मानवाचा' (२०१६), 'सावन घन बरसे' (जुलै २०१४), 'पावन प्रीतीच्या रक्तिम सावल्या' (डिसेंबर २०१७) इ. कादंबऱ्या प्रकाशित आहेत. जयश्री थत्ते - भट यांची 'मातृत्वाची साय' (डिसेंबर २०१७) ही एकमेव कादंबरी प्रकाशित आहे. चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारामध्ये डॉ. विजय ढवळे यांनी लेखन केले आहे. 'मातोश्री विमलताई ढवळे' (सप्टेंबर २००९), कॅनडातील कर्मयोगी (जुलै २०१०) आधुनिक अश्विनकुमार (जुलै २०११), 'दक्षिण आफ्रिका ते कॅनडा व्हाया मुंबई' (जानेवारी २०१२), 'इमानदारी' (२०१५) इ. चरित्रे प्रकाशित आहेत.

परदेशस्थ मराठी साहित्यिकांच्या मनात मराठी भाषेविषयी अतीव प्रेम आहे. आपल्या पुढच्या पिढीला मराठी भाषा, साहित्य, संस्कृती ज्ञात असावी यासाठी ते प्रयत्नशील आहेत. मातृभूमीपासून झालेली ताटातूट आणि आपले जीवनानुभव त्यांनी आपल्या साहित्यात अभिव्यक्त केले आहेत. मराठी साहित्यकृतींचा आकृतिबंध व रचनातंत्रावर पाश्चात्त्य साहित्यकृतींचा प्रभाव पडलेला आहे. प्रारंभी स्फूट स्वरूपात असलेली साहित्याची वाटचाल आज गुणात्मकदृष्ट्या सकस होत चालली आहे. त्यांच्या साहित्यकृतीला महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळत आहेत. प्रस्थापित मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणारा परदेशस्थ मराठी साहित्य हा नववाङ्मयीन प्रवाह महत्त्वाचा ठरत आहे. दोन भिन्न देशांच्या सांस्कृतिक पर्यावरणातून निर्माण झालेल्या अनुभवविश्वाची खोली समृद्ध आहे. अशा सकस, समृद्ध वाङ्मयातून मराठी अस्मितेची ध्वजा सातासमुद्रापार फडकत आहे.

**(लेखक हे देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली येथे मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत.)**

# रिंगाण

**कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी हे कृष्णात खोत यांचं मुळ गाव. जन्म दिनांक १ जानेवारी १९७२. सद्या ते कळे येथील जुनिअर कॉलेजवर शिक्षक म्हणून नोकरी करतात. त्यांनी आत्तापर्यंत पाच कादंबऱ्या व एक ललित गद्य लिहिले आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांना विविध संस्थांकडून देश व राज्यस्तरावरील पुरस्कार मिळालेत. त्यांच्या रिंगाण या कांदबरीस साहित्य अकादमीचा २०२३ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्यांची मुलाखत...**


**साहित्य अकादमीचा मिळालेला पुरस्कार, ग्रामीण भाषेतील लेखन आणि जागतिक स्तरावरील नेहमीच चर्चेत असणाऱ्या विस्थापितांच्या विषयाला सहजच केलेला स्पर्श. रिंगाण बद्दल सुरुवातीलाच काय सांगाल?**

रिंगाण ही विस्थापितांची असणारी कहाणी आहे. अभयारण्यग्रस्त जे लोक आहेत त्या लोकांचं विस्थापन केल्यानंतर त्यांच्या जगण्याचे प्रश्न निर्माण होतात, त्या प्रश्नांना वाचा फोडणारी, त्यांना आवाज देणारी कादंबरी आहे. ती त्यांच्या प्रतिकाच्या स्वरूपात उभी राहणारी कादंबरी आहे. पारंपरिक अर्थाने किंवा विस्थापितांच्या बाबतच्या इतर ज्या कादंबऱ्या आहेत त्यापेक्षा ही वेगळी असून एका वेगळ्या ठिकाणी उभं राहून लिहिलेली कादंबरी आहे.

**रिंगाण' ला पुरस्कार मिळाल्यानंतर आजूबाजूला किंवा तुम्ही तुमच्यात झालेले बदल पाहिले का? आता लेखक म्हणून जबाबदाऱ्या वाढल्या आहेत का?**

नाही, तसं काही नाही. मुळातच साहित्यिकाच्या बाबतीत तसं होऊ नये. मी ही कादंबरी २०१७ ला लिहिली आहे. पुरस्कार मिळणं हा बोनस आहे. आनंद कोणालाही होतो. तसा लेखक म्हणून मलाही झाला. पुरस्कार मिळाल्या दिवशी मी शाळेत होतो. आताही आहे. लेखकाच्या वागण्यात आणि राहण्यात बदल झाला तर तो लेखणापासून दूर जाईल. सातत्याने मी सामान्य माणसांचे प्रश्न कथेतून मांडतोय. त्यामुळे मला त्यांच्यातच राहून काम करावं लागेल. त्यांना समजून घ्यावे लागेल. मी पूर्वीपासूनच जबाबदारीने लिहितोय. गावठाण या पहिल्या कांदबरीपासून सातत्याने जबाबदारी लक्षात घेऊन मी माझे काम केले आहे. या पुरस्कारामुळेच जबाबदारी वाढली असे नाही. साहित्य हा गांभीर्याने घ्यायचा व्यवहार आहे. साहित्य सामाजिक प्रश्न उभं करतं, सामाजिक प्रश्नाला वाचा फोडतं आणि सामाजिक भान त्या साहित्यिकाला, त्या साहित्याला असलं पाहिजे. तरच कसदार लेखन समोर येईल. म्हणून सर्वसामान्यांच्या बरोबर असणं गरजेचं आहे. मी माझ्यात बदल केले तर त्यांचे प्रश्न त्यांच्या अडचणी कळणार नाहीत. त्यांचा आवाज माझ्यापर्यंत पोहोचायचा बंद होईल. म्हणून आपण उंच उंच जाता कामा नये, उंच गेलो तर तिथली हवा विरळ होईल, आपण एकटे पडू. खाली जमिनीवर राहूनच आपणाला ती हवा मिळेल. म्हणून मी अजूनही जमिनीवर राहूनच काम करतोय, करणार.






**आज मोठ्या प्रमाणात ग्रामीण घटक शहराकडे गेल्यावर ग्रामीण राहणीमान, ग्रामीण संस्कृती लपवताना दिसतोय. तुम्ही ग्रामीण संस्कृती चांगल्या पद्धतीने साहित्यातून मांडली आहे आणि तिला सन्मानही मिळाला आहे. काय संदेश द्याल ग्रामीण संस्कृतीसाठी?**

ग्रामीण भागातून शिकून आलेला मोठा वर्ग शहरात आहे. मग आपसूकच गावाकडील खेड्याकडील नातं तुटतं. आपले जगण्याचे संदर्भ बदलतात. त्यांना जाणूनबुजून ते तोडायचं नसतं. मुळातच ग्रामीण आणि शहरी असं साहित्य नसतं. साहित्य माणसांचं असतं. ते माणसांबद्दल बोलतं. फक्त मराठी भाषेतच अभ्यासाच्या दृष्टीने केलेली ती वेगवेगळी रचना आहे. मी येथील माणसांबद्दल लिहितो. इथल्या परिसराबद्दल, इथल्या पर्यावरणाबद्दल मी भाष्य करतो. हे पर्यावरण शहराबरोबरच खेड्यातही आहे. पर्यावरणाबद्दल मी माझ्या बोली भाषेत भाष्य करतोय. माझ्या आसपास असणाऱ्या बोली भाषेचं मी प्रतिनिधित्व करतोय. मी ग्रामीण-शहरी असं काही मानत नाही. अभ्यासकांनी ते सोयीसाठी केलेली रचना आहे. त्यामुळे मी ती विभागणी मान्य करत नाही. मी सातत्याने सांगत आलोय की साहित्य हे साहित्य असतं, ते समाजाबद्दल, पर्यावरणाबद्दल, आपल्या भोवतालाबद्दल ते भाष्य करतं. ते शहरी असेल किंवा ग्रामीण असेल ते तसंच भाष्य करणार. दळणवळणामुळे शहरं गावाला मोठ्या प्रमाणात जोडली गेली, त्याबरोबर शहरी बाबी गावाकडे सहज आल्या आणि त्या छायेत आपण आपलं खेडं पाहतो. शहराच्या असणाऱ्या प्रतिबिंबात आपण आपलं खेडं पाहतोय. शहरातील लोकांना आता टेलिव्हिजनचा कंटळा आला. गावाकडं अजून तसं झालं नाही. शहराकडील माणसं परत गावाकडे येत आहेत हे आपण कोरोनापासून पाहतोय. समाज गतिशील आहे. माणूस मूळ राहणीमानंकडं पुन्हा वळतोय. सातत्याने समाजात बदल होत असतो. तो बदलण्याचा वेग, बदलण्याची रूपं अनेक आहेत. खेडं हे शहराकडे बघून जगतं आहे; पण आता बऱ्यापैकी खेड्याकडं बघून जगणारा वर्ग आपण कोरोनापासून पाहतोय. महात्मा गांधीजींना अपेक्षित खेडं असं नव्हतं. माझ्या रौंदाळा या कांदबरीत खेड्याकडं चला म्हणणाऱ्या महामानवास अशी अर्पण पत्रिका आहे. हा महामानव

म्हणजे महात्मा गांधी. ते सांगतात खेड्याकडं चला. ते स्वयंपूर्ण आहे, त्याला शहराकडे जाण्याची गरज नाही. आपण खेड्याकडच्या सर्व गोष्टी ओरबडून शहराकडं नेतो. उदाहरण पाणी, भाजीपाला. हे सर्व जगातच घडतंय. त्यामुळे जागतिक स्तरावर सर्व शहरं मोठ्या प्रमाणात फुगू लागलीत आणि ते लोण खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलंय. हे सर्व दळणवळणाच्या साधनांमुळे व समाजमाध्यमांमुळे झालंय. सोयीसुविधा होणे गरजेचं आहे; पण हे होत असताना आपण मूळ विकास कशाचा करतोय याचे भान आपल्याला हवंय.

**आजची तरुण पिढी आणि साहित्य यात काही प्रमाणात मोठी दरी निर्माण होतेय. युवा पिढीला काय संदेश द्याल?**

तरुण पिढीकडं नावीन्यता आज खूप आहे; परंतु एकाग्रता मोठ्या प्रमाणात कमी झालीय. माझ्या वाचनात एक विषय आला की, आज माणसाची एकाग्रता आठ सेकंदावर आली आहे. आठ सेकंदात काय वाचणार आणि काय पाहणार? एकाग्रता व चिंतन संपत चाललं आहे. लेखनासाठी मेहनत व वाचनासाठी मोठी मानसिक ताकद लागते. आजचा तरुण वाचनाकडे वळला पाहिजे ही एक गोष्ट आहे. तो कोणत्या माध्यमातून वाचनाकडे वळेल हे सांगू शकत नाही; पण काही मुलं फोनवरदेखील वाचत असतील, चित्रपट पाहत असतील. काहीजण चित्रपट निर्मितीही फोनवर करत आहेत. ती नावीन्यता बदलत जाईल, परंतु यातल्या वाचणाऱ्या आणि लिहिणाऱ्या तरुण पिढीनं हे लक्षात ठेवायला हवं की, पुर्वीची पिढी शिकलेली नव्हती. आता शिकलेल्या पिढीची जबाबदारी आहे की, मी माझा इतिहास जबाबदारीने चिकित्सक पद्धतीने घेतला पाहिजे. त्यासाठी तरी वाचन पाहिजे. कोण सांगतंय याच्यापेक्षा काय बरोबर आहे याचं चिंतन मनन करण्यासाठी वाचन सातत्याने हवे. वाचनाची शक्ती सातत्याने वाढवली पाहिजे. हे शाळा, महाविद्यालये करत आहेत. आमच्याकडे येथील शाळेत ५वी ते १२वीपर्यंतची रजिस्टर पाहिली, तर १० ते १२ हजार पुस्तके मोफत मुलांना वाचायला दिली जातात आणि आठवड्याला एक व्याख्यान देतो हा पथदर्शी प्रकल्प आहे. या वयोगटासाठी वाचन हे सातत्याने करण्याची गोष्ट आहे. दीर्घकाळानंतर याचे परिणाम दिसणार आहेत. एखादं झाड वाढवण्यासाठी अनेक वर्ष लागतात; परंतु काही दिवसात आपण माणूस घडवू शकतो. साहित्य हे माणूस घडवणारं आहे. साहित्य माणसाच्या जगण्याच्या बाजूनंच असतं. आपणाला गोंगाटात एकांतप्रिय व्हायचं असेल, तर साहित्याशिवाय पर्याय नाही. पुस्तक हे आजच्या काळात लढाईला जाण्यासाठी आवश्यक असलेलं गलबत आहे आणि या गलबतावर आपण बसायचं की नाही हे आजच्या युवकाने ठरवायला हवं.

**'रिंगाण' हे नाव कसं सुचलं?**

आपण युद्धभूमीवर गेलो की आपण रिंगणावर जातो, त्या रिंगणात आपण आव्हान देतो. या कथेत आपण निसर्गाला आव्हान दिल्यानंतर देवाप्पाची आवस्था काय होती हे पाहतो. यात म्हैस म्हणजे एक निसर्ग आहे. तिथला जंगल म्हणजे एक निसर्ग आपल्या समोर उभा आहे. आपण एक रिंगाण म्हणजे एक वर्तुळ पूर्ण करतो. म्हणजे म्हैस रानटी आहे, तिला आपण पाळीव केले आहे. आता ती पुन्हा रानटी होते. तसेच मानवही पुन्हा पूर्वीच्या स्थितीत जाईल व आपण ते रिंगाण पूर्ण करू, अशा अर्थाने मला रिंगाणचा अर्थ अभिप्रेत आहे आणि रिंगाण म्हणजे युद्ध, युद्धाला तयार व्हावं. निसर्ग आपल्याशी युद्ध करायला लागल्यावर आपला पराभव अटळ आहे. आपण निसर्गाशी युद्ध मांडलंय आणि मानवाचा पराभव हा अंतिमतः अटळ आहे. त्याला कुठल्याही इतर भविष्यवाणीची गरज नाही. अनेकवेळा भूकंप, महापूर आणि कोरोनासारख्या घटनांनी दाखवून दिले आहे. अदृश्य तुरुंग निर्माण होतो हे आपण पाहिलेलं आहे, मानवाला घरात बसवून ते आपण भोगलेलं आहे. हा एक निसर्गाचा इशारा आहे. अवेळी पाऊस पडतो हा पण एक इशारा आहे आणि याकडे मानवाने दुर्लक्ष केलं आहे. ही जगातली मोठी समस्या आहे. याबाबत आपल्या जागेवर उभे राहून भाष्य करावं असं प्रत्येक लेखकाला, कलावंताला वाटतं आणि तो आवाज मी माझ्या लेखनातून मांडला. हा आवाज इथल्या जीवजंतूंचा आहे, इथल्या पशुपक्ष्यांचा तो आवाज आहे. इथल्या झाडांचा तो आवाज आहे. तो फक्त देवाप्पा व त्या म्हशीचा आवाज नाही, इथल्या सर्व निसर्गाचा आवाज आहे. तो आवाज शांत असतो. जर निसर्गाने उलट आवाज दिला तर तो आपल्याला सहन होणार नाही. मानव हा मानव असल्याचे विसरून चालला आहे. मानव हा सुद्धा एक निसर्गातीलच प्राणी आहे. मानव निसर्गात खूप ढवळाढवळ करत आहे आणि निसर्गाने जर आपल्या आयुष्यात ढवळाढवळ करायला सुरुवात केली तर संपूर्ण मानव जातीला ती परवडणारी नाही.

*....गाव सोडताना देवाप्पा परत कधीतरी येऊन ती परत न्यायाच्या आशेवर भाकड म्हैस गावातच सोडून देण्याचा निर्णय घेतो. सर्व सामान गाडीत भरून गाडी निघालेली असते. म्हैस मात्र काहीशी विचारत पडलेली तिच्या खोलवर डोळ्यांमधून दिसते. देवाप्पाची गाडी सुरू होते. भाकड म्हैस जणू काही मला इथं का सोडून जात आहे हा प्रश्न विचारत हळूहळू गाडीमागे चालत असते. आणि याचवेळी देवाप्पा, त्याची आई व ती म्हैस यांच्या मनात प्रश्नांचं वादळ वाहायला सुरू होतं. ट्रक वेग धरतो, ती म्हैस अजूनच वेगाने मागे मागे धावते... ती म्हैस धुरळ्यात दिसेनाशी होते. यावेळी धुरळ्यामागे तिचे सर्व प्रश्न अनुत्तरित राहतात... (ती म्हैस काही काळाने परत रानटी कशी होते आणि देवप्पाच्या आयुष्यात विस्थापित झाल्यावर आलेल्या अडचणी रिंगाण कादंबरी वाचल्यावर लक्षात येतील)*

**जगातील महत्त्वाच्या विषयावर लेखन आहे. याबाबत अजून आंतरराष्ट्रीय स्तरावर या विषयाला घेऊन चर्चा होईल का?**

यावर सातत्याने चर्चा होत आहे. पर्यावरणवादी या विषयावर नेहमी चर्चा करत असून आताही या कादंबरीवर पर्यावरणवाद्यांनी चर्चा घडवून आणलेली आहे. या विषयांचा संदर्भ घेऊन अनेक ठिकाणी लोक बोलत आहेत. इंग्रजी अनुवाद झाल्यानंतर हा विषय जास्त चर्चेत आला. पुरस्कार मिळाल्यानंतर मराठी लेखनाच्या अवकाशामध्ये ही गोष्ट घडते हे चांगले आहे. आपल्याकडे सैद्धांतिक आणि वैचारिक मांडणी खूप होते. आपल्याकडे वैचारिक मांडणी सामान्य लोकांना समजायला खूप जड जाते, ती त्यांना पटत नाही. म्हणून ललित कला,

ललित साहित्यामधून किंवा कादंबरी, काव्य, कविता, नाटक यांमधून ही कथा आली तर ती लोकांना लवकर कळते. त्यासाठी अशा प्रकारच्या साहित्यकृती निर्माण करण गरजेचं आहे. कारण साहित्यकृती मधून एखादी समस्या सामान्य माणसांपर्यंत जेवढ्या गतीने पोहोचते तेवढी ती सैद्धांतिक किंवा वैचारिक मांडणीतून पोहोचत नाही. म्हणून बऱ्याच जागतिक स्तरावरील लेखकांनी हा विषय आपल्या साहित्यातून लिहिला आहे. फक्त मीच लिहिला असे नाही. त्यातील विषय आणि माझे विषय तुम्हाला कमी अधिक प्रमाणात सारखेच दिसतील. फक्त तेथील स्थानिक संदर्भ प्रातनिधिक स्वरूपात दिसतील. तो त्या परिसराला उजागर करत जगातील विविध प्रश्न आपल्या कवेत घेत असतो. सर्वच साहित्यकृतीतून असं घडत नसतं; परंतु एखाद्या साहित्यकृतीतून जगाला काहीतरी विचार करायला लावणारं साहित्य समोर येतं आणि तसं ललित हे रिंगाण आहे असं मला वाटतं.

**'गावठाण' ही पहिली कादंबरी, रौंदाळा, झड-झिंबड, धूळमाती आणि नांगरल्याविन भुई या तुमच्या इतर लेखनाबद्दल सांगा.**

गावठाण ही माझी पहिली कादंबरी, ती एका स्त्रीची कहाणी आहे. निरागस अशा मुलीचे लग्न होते, संसारानंतर तिला शेतकरी कुटुंबात कसं गृहीत धरलं जातं. शेतकरी आत्महत्या करतात. त्या शेतकऱ्याच्या सातबाऱ्यात महिलेचं नाव नसतं. ती मेल्यानंतर स्त्रीची कुठेच गणना नसते. आपल्याच समाजव्यवस्थेत एकमेव अपराधी भाव असणारा घटक म्हणजे आजचा शेतकरी आहे. न केलेल्या घटनेचा अपराधी भाव घेऊन तो जगत असतो. आपण आपले कुटुंब जगवू शकत नाही, आपली मुलं बाळं जगवू शकत नाही या अपराधभावातून तो टोकाचं पाऊल उचलतो आणि अशा हतबल शेतकऱ्याची, एका स्त्रीची, एका निरागस निसर्गाशी जोडलेल्या मुलीची कथा आहे. रौंदाळा ही कथा राजकारण आहे. गावचं राजकारण कसं आहे. अन्न, वस्त्र, निवारा आणि चौथी गरज राजकारण लागते. गावचं राजकारण कसं बदलतं यावर आधारित ती कादंबरी आहे. धुळमातीमध्ये जमिनीचे व्यवहार कसे बदलतात. पूर्वी व्यवहार कसे चालत आणि आता कसे आहेत. हल्ली उपजाऊ जमिनी बिगर उपजाऊ माणसं घेत आहेत. जमिनीची किंमत नसलेली ती माणसं आहेत. ज्या देशात मातीची किंमत केली जात नाही, त्या देशाची हळूहळू माती होते असं मला वाटतं. झड-झुंबड या कादंबरीत पाऊस नायक असलेली कथा आहे. एखादं गाव जास्त पाऊस पडल्यावर त्याचा जगाशी संपर्क तुटतो यावर आधारित कथा आहे. सातत्याने माझ्या जगण्याचा भाग असलेला, शेतकरी कुटुंबातील, माझ्या अवतीभोवतालचा परिसर यावर आधारित मी स्थानिक विषय घेऊन लेखन केलेले आढळेल.

**वसतिगृहाचा रेक्टर म्हणून केलेली नोकरी, आताचे शिक्षक म्हणून सुरू असलेलं काम आणि तुमचे गाव हे कादंबरीच्या लेखनासाठीचे महत्वाचे संदर्भ आहेत का?**

होय, मला वाटतं कोणत्याही लेखकाने निर्माण केलंलं कथानक देण्यापेक्षा आपल्या सभोवतालचं टिपावं. कुणीही वेगळं लिहिण्यापेक्षा आपल्या जगण्याचा भाव मांडवा. आणि सर्वच लेखक तसं करतात. त्यासाठी कुठंतरी जाऊन लिहीत बसण्याची गरज नसते. आपल्या जगण्यात खूप मोठे संदर्भ दडलेले आहेत. रेक्टर म्हणून काम करताना मला विस्थापितांची मुलं भेटली, गावात अनेक विस्थापित शेतकरी यांच्याबरोबर बोलण्याचा प्रसंग आला. गावात मी त्यांचे प्रश्न पाहिलेले आहेत. शाळेत शिकवत असताना अनेक संदर्भ मिळत असतात. आता पुढील लेखन शिक्षण या विषयावरच आहे. त्यामुळे आपलं रोजचं जगणंच आपल्या साहित्याचा भाग असतो. ते असं वेगळं काही नसतं. साहित्य समाजाचा आरसा आहे. समाजात मी आहे, माझ्यात समाज आहे. या समाजातील कोणत्या बाबी घ्यायच्या हे स्वातंत्र्य लेखकाला असतं. मात्र मी कोणत्या ठिकाणाहून त्या समस्या मांडतोय हे महत्त्वाचे. अगदी उंच राहून खालच्या लोकांच्या समस्या मांडणे चुकीचे आहे. त्यांच्यात राहून त्यांच्या सारखं जगून त्या मांडता आल्या पाहिजेत.

**रिंगाण कादंबरी लिहीत असताना अजूनही न विसरलेली एखादी गोष्ट, स्मरणात राहील अशी घटना सांगाल का?**

रिंगाणमध्ये गाव सोडताना देवाप्पा भाकड म्हैस गावातच सोडून देण्याचा निर्णय घेतो. सर्व सामान गाडीत भरून गाडी निघालेली असते. म्हैस मात्र काहीशी विचारत पडलेली तिच्या खोलवर डोळ्यांमधून दिसते. देवाप्पाची गाडी सुरू होते. भाकड म्हैस जणू काही मला इथं का सोडून जात आहे हा प्रश्न विचारत हळूहळू गाडीमागे चालत असते. हा प्रसंग मला अजूनही अंगावर शहारे आणणारा आहे असे वाटते आणि याचवेळी देवाप्पा, त्याची आई व ती म्हैस यांच्या मनात उभे राहिलेलं प्रश्नांचं वादळ वाहायला सुरू होतं. ट्रक वेग धरतो आणि ती म्हैस अजून वेगाने मागे मागे धावत असते, यावेळी तिची अवस्था काय झाली असेल या क्षणाचं चित्र माझ्या मनात अजून तसंच आहे. लहानपनापासून वाढवलेली ती म्हैस आज भाकड धसमुसळी आहे. तिला त्याच जंगलात सोडून जाताना काय वाटत असेल हे भाव मी टिपण्याचा प्रयत्न केलाय. शेवटी गाडीच्या धुरळ्यात ती म्हैस दिसेनाशी होते. त्यावेळी तिच्या डोळ्यातील तुटलेपणाचे भाव अजूनही माझ्या डोक्यात येतात. हा प्रसंग मला खरंच चांगल्या पद्धतीने मांडता आला का, हे वाचक ठरवतील; पण मला स्मरणात असलेला हा महत्त्वाचा भाग आहे. आणि कादंबरीच्या मुखपृष्ठावर त्या म्हैसीच्या डोळ्यातील भाव देण्याचा प्रयत्न केला. काल्पनिक लिहीत असताना लोकांसाठी विश्वासार्हता निर्माण करतो का हे महत्त्वाचे.

**येत्या काळात तुम्ही कोणते विषय घेऊन येणार आहात किंवा सध्या काय लेखन सुरू आहे?**

मला दोन गोष्टी ग्रामीण भागात महत्त्वाच्या वाटतात, यात एक शिक्षण व दुसरे आरोग्य. मी सध्या शिक्षण या विषयावर लिहीत आहे. कारण शिक्षण हा देशाचा मुख्य पाया आहे. शिक्षण व्यवस्था संपवली, तर देशही संपायला वेळ लागत नाही. मग आपण त्या दिशेने निघालो आहोत की काय हा प्रश्न आज निर्माण होतोय का? आताचे शिक्षण किती उपयोगी आहे किंवा त्यात बदल हवेत का हा सर्वसाधारण प्रश्न पडतोय. त्या अनुषंगाने माझी पुढील कादंबरी लवकरच येत आहे.

**(सचिन अडसूळ, जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांनी 'रिंगाण' कादंबरीचे लेखक कृष्णात खोत यांची मुलाखत घेऊन ती शब्दबद्ध केली आहे.)**

'मराठी भाषेची वैश्विक व्याप्ती' या मध्यवर्ती संकल्पनेस अनुसरून विश्व संमेलनात जगभरातील वेगवेगळ्या देशातून आलेल्या मराठी भाषकांकडून आधुनिक तंत्रज्ञानात व डिजिटल क्षेत्रात मराठी भाषेची व्याप्ती कशाप्रकारे वाढवता येईल, वैश्विक स्तरावर ज्ञानभाषा व तंत्रभाषा म्हणून मराठी भाषेचा विकास कसा करता येईल, यावर निमंत्रितांनी आपले विचार मांडले.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर,



# विश्व मराठी संमेलन २०२४

**मराठी भाषेचा प्रचार-प्रसार केवळ राज्यापुरता सीमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर आणि परदेशात रुंदावण्यासाठी सन २०२३ मध्ये विश्व मराठी संमेलनाचे राज्यात पहिल्यांदा आयोजन करण्यात आले होते. परदेशातील, परराज्यातील आणि राज्यातील मराठी भाषकांचा त्यास भरभरून प्रतिसाद मिळाला. त्यामुळे दुप्पट उत्साहाने मराठी भाषा विभागाकडून राज्य मराठी विकास संस्थेच्या सहकार्याने यावर्षीदेखील २७ ते २९ जानेवारी २०२४ या कालावधील सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे विश्व मराठी संमेलन २०२४चे आयोजन करण्यात आले होते.**




मुख्यमंत्री सचिवालय अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ अध्यक्षा उषा तांबे इत्यादी मान्यवर विश्व मराठी संमेलनास उपस्थित होते. तसेच विश्व मराठी संमेलन २०२४ साठी जगभरातून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, जर्मनी, सिंगापूर, कॅनडा अशा अनेक देशांतील मराठी भाषक उपस्थित होते. भारतातील विविध राज्यांतून आणि महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून असे एकूण साधारणत: २००० मराठीप्रेमी विश्व मराठी संमेलनाच्या तीनही दिवशी उपस्थित होते.

## मातृभाषेवर प्रेम असणे आवश्यक

राज्यपाल रमेश बैस यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करतानाच त्यांना ओघवते मराठी बोलता येत नसल्याबाबत दिलगिरी व्यक्त केली. प्रत्येक व्यक्तीचे त्याच्या मातृभाषेवर प्रेम असणे आवश्यक असल्याचे नमूद केले. त्यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची आवर्जून आठवण काढली. तसेच महाराष्ट्रातील संतांप्रति केवळ महाराष्ट्रातील जनतेनेच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीने कृतज्ञ असायला हवे, असे मत नोंदवले. तसेच संतांचा आणि समाजसुधारकांचा मोठा वारसा असलेले महाराष्ट्रातील लोक खरेच भाग्यवान असल्याचेही नमूद केले.

मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव

मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी विश्व मराठी संमेलनाचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी जगभरातील मराठी भाषकांना एकत्र आणण्याची कल्पना मांडली आणि नेटाने त्याचा पाठपुरावा करून ती प्रत्यक्षात आणल्याचे नमूद केले. तसेच मराठी भाषेवरील प्रेम आणि अस्मितेपोटी विश्वभरातून मराठी भाषक या संमेलनास जमले असल्याचे नमूद केले.

मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी महाराष्ट्रातील जे नागरिक परदेशात स्थायिक झाले आहेत, त्यांनी परदेशात राहूनही मराठी भाषा जपली आहे ही अत्यंत कौतुकाची बाब असल्याचे मत व्यक्त केले. तसेच मराठी भाषेचा विकास, प्रचार-प्रसार व संवर्धनासाठी मराठी भाषा विभागातर्फे राबवण्यात येत असलेल्या विविध योजना व प्रकल्पांची माहिती दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषणात विश्व मराठी संमेलनाच्या आयोजनासाठी मराठी भाषा आणि मराठी भाषा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करताना या विश्व संमेलनाने जगभरातून मराठी माणसाला एकत्र आणण्याचे काम केल्याचे म्हणजेच मराठी भाषा सर्वांना जोडणारा धागा असल्याचे प्रतिपादन केले. मराठी भाषेच्या लेखकांनी आजच्या पिढीची भाषा व आवड ओळखून साहित्यनिर्मिती करायला हवी, असे मत नोंदवले. तसेच विश्व संमेलनास उपस्थित असणाऱ्या मराठी उद्योजकांनी राज्यात औद्योगिक प्रकल्पाद्वारे गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

### वैश्विक मराठीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध असल्याची पुनरुक्ती करतानाच वैश्विक मराठीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याची बाब नमूद केली. रशिया, मॉरिशस, जपान या देशांमध्ये गेल्यानंतर मराठमोळ्या पद्धतीने झालेल्या स्वागताची आठवण त्यांनी यावेळी सांगितली. प्रमाणभाषा महत्त्वाची तर आहेच; परंतु बोलीभाषांचा गोडवा देखील जपायला हवा, असा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी विविध क्षेत्रातील मराठी भाषकांच्या अत्युच्च कामगिरीचा वेध घेताना मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व विषद केले. मराठी भाषकांनी प्रत्येक क्षेत्रात गरुडझेप घेण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी मांडले, तर निर्माते जयू भाटकर यांनी डॉ. माशेलकरांच्या आयुष्यावर तयार केलेल्या चित्रफितीमुळे विश्व संमेलनाला वेगळ्याच उंचीवर नेले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी भाषेबद्दल असेलेले प्रेम लपवता येत नसून मराठी भाषेबद्दल त्यांना वाटत असलेली तळमळ व्यक्त केली. तसेच राज्यातील सर्वच शाळांमध्ये मराठी सक्तीची करण्याबाबत त्यांची भूमिका मांडली. तसेच, सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगत परस्परांशी मराठी भाषेतून संवाद साधण्याचे आवाहन केले.

### सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत

मान्यवरांची उपस्थिती व त्यांचे मार्गदर्शन, उद्‌बोधक चर्चासत्रे याबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी विश्व संमेलनाची रंगत अधिक वाढवली. मराठीच्या प्रचार प्रसारात माध्यमांचे योगदान परदेशी निमंत्रितांचे कविता वाचन, अनुभव कथन, महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा सादर करणारे नृत्यमय कार्यक्रम, गीत रामायणातील निवडक प्रसंगांचे नृत्यमय सादरीकरण, मराठी मनाचा मानबिंदू असणाऱ्या नियोजित मराठी भाषा भवनाचे सादरीकरण, मराठी भाषेचा प्रवास आणि नवी क्षितिजे, तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमात मराठीचा वापर अशा विविधांगी कार्यक्रम/ चर्चासत्रांबरोबर उपस्थित निमंत्रितांनी राज्याबाहेर आणि परदेशात मराठी भाषेच्या जतन संवर्धनासाठी त्यांच्याकडून होत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

संमेलनातील अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांमुळे मराठी भाषेतील विविध नवीन क्षितिजे, आव्हाने आणि भाषेच्या संवर्धनासाठी राज्याबाहेर आणि परदेशात होत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना मिळाली.

मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांनी विश्व मराठी संमेलन २०२४ साठी सर्व उपस्थितांचे आभार मानले. अशा या तिन्ही दिवशी उत्तरोत्तर रंगलेल्या दिमाखदार विश्व संमेलनाची सांगता महाराष्ट्र राज्याचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित नृत्य व गीतांच्या कार्यक्रमाने झाली.

(मराठी भाषा विभाग)

# श्रीमंतयोगी (१९ फेब्रुवारी १६३० – ०३ एप्रिल १६८०)

**महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती. त्यांचा जन्म मराठवाड्यातील भोसले या वतनदार घराण्यातील मालोजींचे पुत्र शहाजी आणि सिंदखेडकर जाधवराव यांच्या कन्या जिजाबाई या दांपत्यापोटी शिवनेरी किल्ल्यावर (जुन्नर तालुका पुणे जिल्हा) झाला. जेधे शकावली, कवींद्र परमानंद याचे शिवभारत आणि राजस्थानात उपलब्ध झालेल्या जन्मपत्रिका, या विश्वसनीय साधनांवरून फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ म्हणजे १९ फेब्रुवारी १६३० ही तारीख बहुतेक इतिहास संशोधकांनी आणि आता महाराष्ट्र शासनानेही निश्चित केली आहे.**



शिवाजी महाराजांचे पूर्वज चितोडच्या सिसोदिया घराण्यातील होते, अशी लौकिक समजूत आहे. हे घराणे दक्षिणेतील होयसळ वंशातील आहे, असेही संशोधन पुढे आले आहे. मालोजी हे या घराण्यातील पहिले कर्तबगार पुरुष. त्यांना शहाजी व शरीफजी असे दोन मुलगे होते. मालोजी हे निजामशाहीतील एक कर्तबगार सरदार होते. मालोजी व त्यांचे बंधू विठोजी यांच्याकडे छत्रपती संभाजीनगरजवळचे वेरुळ, कन्नड व देऱ्हाडी (देरडा) हे परगणे मुकासा (जहागीर) म्हणून होते. शहाजी पाच वर्षांचे असताना मालोजी मरण पावले. त्यांच्या नावाची जहागीर शहाजींच्या नावाने राहिली. निजामशाहीच्या दरबारातील खंडागळेच्या हत्तीच्या प्रकरणावरून शहाजी व लखुजी जाधव यांच्यात वितुष्ट आले, ते पुढे कायम राहिले. शहाजींनी १६२० पासून निजामशाहीच्या बाजूने आदिलशाहीविरुद्ध लढण्यास सुरुवात केली होती; पण १६२४ मध्ये भातवडीच्या लढाईत पराक्रम करूनही त्यांचा सन्मान झाला नाही, म्हणून ते आदिलशाहीस मिळाले पण इब्राहिम आदिलशहाच्या मृत्युनंतर ते पुन्हा निजामशाहीत आले.

निजामशाहीतील दरबारी कारस्थानात शहाजींचे सासरे लखूजी जाधव मारले गेले (१६२९). त्यामुळे नाराज होऊन त्यांनी निजामशाहीची नोकरी सोडली. त्या सुमारास त्यांचा मोठा मुलगा संभाजी यांचा विवाह शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव यांच्या मुलीशी झाला होता. त्या निमित्ताने शहाजींनी जिजाबाईस शिवनेरीवर ठेवले होते. विजापूर सोडून गेल्यामुळे मुहंमद आदिलशहा (कार. १६२७-५६) हा शहाजींवर रुष्ट झाला होता. आदिलशाही विरुद्ध गेलेली आणि लखुजींच्या मृत्युमुळे निजामशाही सुटलेली अशा अवस्थेत शहाजींना परागंदा होण्याची वेळ आली. अखेर आदिलशहाच्या बोलावण्यावरून ते १६३६ मध्ये त्याच्या नोकरीत शिरले. आदिलशहाने त्यांच्याकडे पुण्याची जहागीर बहाल केली व मोठा हुद्दा देऊन कर्नाटकाच्या मोहिमेवर पाठवले. विजापूरच्या सैन्याने १६३८च्या अखेरीस बंगलोर काबीज केले. तेव्हा बंगलोर, कोलार इ. प्रदेशांची जहागीर शहाजींना मिळाली आणि ते बंगलोर येथे कायमचे राहू लागले.

## बालपण–शिक्षण–स्वराज्याचा श्रीगणेशा

शिवाजी महाराजांचे बालपण शिवनेरी, माहुली (ठाणे जिल्हा) व पुणे येथे गेलेले दिसते. बंगलोरलाही ते काही काळ राहिले. शिवाजी आणि जिजाबाई यांच्याकडे महाराष्ट्रातील जहागिरीची व्यवस्था सोपवून शहाजीराजांनी त्यांची पुण्याला रवानगी केली. जहागिरीची प्रत्यक्ष व्यवस्था पाहण्यासाठी शहाजींनी दादोजी तथा दादाजी कोंडदेव आणि आपले काही विश्वासू सरदार यांची नेमणूक केली. जिजाबाईंचा देशाभिमान, करारीपणा आणि कठीण प्रसंगांतून निभाऊन जाण्यासाठी लागणारे धैर्य, या त्यांच्या गुणांच्या तालमीत शिवाजीराजे तयार झाले. त्यांच्या या शिकवणीतून शिवाजीराजांना स्वराज्यस्थापनेची स्फूर्ती मिळाली. आपल्या जहागिरीच्या संरक्षणासाठी गडकिल्ले आपल्या ताब्यात असले पाहिजेत, ही जाणीव त्यांना बालवयापासून झाली. दादोजी कोंडदेव यांच्या मृत्युनंतर (१६४६-४७) शिवाजी महाराजांनी प्रत्यक्ष कारभार हाती घेतला. त्यांनी गड आणि किल्ले आपल्या ताब्यात घेण्यासाठी अनेक मोहिमा आखून यशस्वीरीत्या पार पाडल्या. या कामात त्यांना आपल्या मातोश्रींचे आशीर्वाद होतेच.

महाराजांनी पुण्याच्या परिसरातील मोकळ्या टेकड्या, पडके किल्ले, दुर्गम स्थळे हळूहळू आपल्या ताब्यात आणली. राजगड आणि तोरणा किल्ला (प्रचंडगड) महाराजांनी हस्तगत केला. महाराजांना येऊन मिळालेल्या अनुयायांत पुढे प्रसिद्धीस आलेली कान्होजी जेधे, नेताजी पालकर (समकालीन कागदपत्रांनुसार नेतोजी पालकर), तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, बाजी पासलकर इ. नावे आढळून येतात. भोरजवळ रायरेश्वरासमोर स्वराज्यनिष्ठेची शपथ घेतल्याची कथा ही याच सुमारास असावी. जी स्थळे आपण घेतली, ती विजापूर राज्यातील सुरक्षितता कायम राहावी, या हेतूनेच अशी भूमिका महाराजांनी घेतली. विजापूर दरबारनेही सुरुवातीस महाराजांच्या या चळवळीकडे फारसे लक्ष दिले नाही; पण महाराजांनी कोंडाण्याच्या (सिंहगडच्या) किल्लेदाराला आपलेसे करून तो आपल्या ताब्यात घेतला. त्यावेळी मुहंमद आदिलशहाचे डोळे उघडले. महाराजांच्या विरुद्ध विजापूरचे सैन्य चालून गेले. दक्षिणेत विजापूरच्या सैन्यात शहाजीराजे हे अधिकारी म्हणून जिंजीच्या किल्ल्यासमोर तळ देऊन होते. त्यांच्यावर फितुरीचा आरोप ठेवण्यात येऊन त्यांना कैद करण्यात आले (१६४८) आणि त्यांना विजापूरला आणण्यात आले. या काळात पुरंदरच्या पायथ्याशी शिवाजी महाराजांनी निकराचा लढा देऊन विजापूरचे सैन्य उधळून लावले (१६४८ अखेर). सैन्याची इतर भागांतील आक्रमणेही परतवण्यात आली. शहाजी राजांना

काय शिक्षा होईल, याची काळजी महाराज आणि जिजाबाई यांना पडली. त्यावेळी दक्षिणेचा मोगल सुभेदार म्हणून शाहजहानचा मुलगा मुरादबख्श हा औरंगाबाद येथे कारभार पाहत होता. त्याच्याशी संपर्क साधण्याचा आणि त्याच्या मार्फत विजापूरवर दडपण आणण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. कोंडाण्याचा किल्ला परत द्यावा, ही अट आदिलशहाने घातली. किल्ला परत देण्यास महाराज नाखूश होते, तथापि सोनोपंत डबीर याने शिवाजी महाराजांची समजूत घातली. सिंहगडचा किल्ला आदिलशहाकडे परत करण्यात आला. त्यानंतर शहाजींची सुटका होऊन (१६४९) त्यांची बंगलोरला सन्मानाने रवानगी करण्यात आली.

## राज्यविस्तार

पुढील सहा वर्षांत शिवाजी महाराजांनी जहागिरीचा सगळा बंदोबस्त आपल्याकडे घेतला. पुणे, सुपे, इंदापूर, चाकण ही या जहागिरीतील प्रमुख स्थळे. १६५४ च्या सुमारास महाराजांनी पुरंदरचा किल्ला महादजी नीळकंठराव किल्लेदार याच्या मुलांकडून हस्तगत केला आणि पुणे प्रांताची सुरक्षितता मजबूत केली. पुढे महाराजांनी जावळीवर स्वारी केली. सहा महिन्यांच्या या मोहिमेत चंद्रराव मोरे आणि त्यांचे भाऊबंद मारले गेले आणि जावळीचा मुलूख त्यातील रायरीच्या किल्ल्यासकट महाराजांच्या ताब्यात आला (१६५६). विजापूरहून कोकणपट्टीकडे जाणाऱ्या मार्गावरील ही महत्त्वाची ठिकाणे. जावळी खोरे ताब्यात आल्याबरोबर महाराजांनी मोरो त्रिंबक पिंगळे यास प्रतापगड किल्ला बांधून घेण्यास आज्ञा दिली (१६५६). राष्ट्राचे संरक्षण दुर्गाकडून, राज्य गेले तरी दुर्ग आपल्याकडे असल्यास राज्य परत मिळविता येते, दुर्ग नसल्यास हातचे राज्य जाते, हे महाराजांचे धोरण. त्यांनी अनेक किल्ले बांधले, अनेकांची डागडुजी केली. प्रतापगडचा किल्ला म्हणजे कोकणच्या वाटेवरचा पहारेकरी. त्यामुळे आदिलशहाचे कोकणातील अधिकारी आणि लहानमोठे जमीनदार या सर्वांनाच मोठा शह बसला. तसेच विजापूरशी संपर्कही कमी होऊ लागला. पोर्तुगीज अंमलाखाली असलेला ठाणे, वसई हा भाग वगळता जव्हारपासून गोव्यापर्यंतचा बहुतेक कोकण प्रदेश विजापूरच्या आदिलशाहीकडे होता.

मुहंमद आदिलशहाच्या मृत्युनंतर (४ नोव्हेंबर १६५६) त्याचा मुलगा दुसरा अली आदिलशहा गादीवर आला. तो औरस पुत्र नाही किंवा त्याचे कुल अज्ञात आहे, अशी सबब पुढे करून मोगलांच्या सैन्याने विजापूरच्या ईशान्येकडील कल्याणी आणि बीदर ही स्थळे काबीज केली (१६५७). शिवाजी महाराजांनीही मोगलांचे जुन्नर शहर लुटले आणि अहमदनगरच्या पेठेवर हल्ला केला. ही धावपळीची लढाई चालू असतानाच महाराजांनी औरंगजेबाशी संपर्क ठेवला होता. विजापुरातील बदलती परिस्थिती लक्षात घेऊन कोकणात आपल्या पदरात काय पडेल, ते मोगलांकडून मिळवावे, असा विचार महाराजांनी केला होता. विजापूरशी लवकर तह करावा, अशी मोगल बादशहा शाहजहानने आज्ञा केली. १६५७ मध्ये मोगलांनी घेतलेले बीदर, कल्याणी हे प्रदेश आपल्याकडे ठेवून घ्यावेत, मागच्या तहात मोगलांनी दिलेले कल्याण, भिवंडी आणि पुणे प्रांत हे विजापूरने परत करावेत, शिवाय खंडणी देत जावी, या अटींवर हे युद्ध संपले. या सुमारास शाहजहान हा अतिशय आजारी पडला (१६५७). हे वृत्त विजापूरलाही कळले होते. त्यामुळे विजापूरने हा तह संपूर्णपणे पाळण्यास टाळाटाळ केली. शाहजहानचा आजार आणि औरंगजेबाचे उत्तरेकडे लागलेले लक्ष, हे पाहून महाराजांनी सरळ कल्याण व भिवंडी ही स्थळे हस्तगत केली (२४ ऑक्टोबर १६५७). पुढे १६५८ मध्ये माहुलीचा किल्लाही काबीज केला. नंतर औरंगजेबाकडे आपला दूत पाठवून त्याच्याशी सलोख्याचे बोलणे सुरू केले. मोगल मुलुखावर आपण हल्ला करत नाही; पण कोकणातील आपले हक्क सुरक्षित ठेवावेत, म्हणून मी हे करीत आहे, असे त्यास कळवले.

अफझलखान-शिवाजी भेट व प्रतापगडचे युद्ध, पन्हाळ्याचा वेढा व शायिस्तेखानाशी संग्राम, सुरतेची लूट, मिर्झा राजा जयसिंह आणि पुरंदरचा तह, आग्राची भेट व सुटका आणि दक्षिण मोहीम अशा अनेक मोहिमा छत्रपती शिवाजी महाराज यांनी पूर्ण केल्या.

## राज्याभिषेक

मोगलांचे प्रभावी सैन्य उत्तरेत गुंतले आहे आणि दक्षिणेत त्यांचा कोणीच मातब्बर सेनापती नाही, शिवाय विजापूरही हतबल अवस्थेत आहे, ही संधी साधून शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाचा घाट घातला आणि लवकरच राज्याभिषेकाचा अपूर्व सोहळा रायगडावर संपन्न झाला. राज्याभिषेकानंतर जिजाबाईंचा मृत्यु झाला (१७ जून १६७४). राज्याभिषेक समारंभानंतर शिवाजी महाराजांनी पुन्हा वऱ्हाड, खानदेश या मोगल इलाख्यात चढाया केल्या (१६७४-७५). महाराजांनी जंजिऱ्याचे सिद्दी आणि मुंबईकर इंग्रज यांवर दडपण आणले आणि कारवारकडचा विजापूरच्या आधिपत्याखालील प्रदेश घेण्याची योजना आखली.


## शासनव्यवस्था

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक शक सुरू केला आणि त्याबरोबरच राज्यकारभाराविषयक एक सुसूत्र नियमावली - कानुजाबता तयार केली. राज्याभिषेकाच्या समयी मुख्य-प्रधान (पेशवा), अमात्य, सेनापती, पंडितराव, न्यायाधीश, सचिव, मंत्री व सुमंत अशी अष्टप्रधानांची नियुक्ती केली. त्यांपैकी सहा प्रधानांनी सैन्य घेऊन युद्धादी प्रसंग करावे, अशी आज्ञा होती. तत्कालीन राजकीय परिभाषा फार्सी होती व अधिकाऱ्यांची नावे फार्सीवरूनच घेतलेली असत. त्यासाठी रघुनाथपंत हणमंते यांच्याकरवी राजव्यवहारकोश तयार करवून घेतला. अष्टप्रधानांची कर्तव्ये आणि कार्यभार यांचे तपशील कानुजाबतात देण्यात आले आहेत. राज्याभिषेकानिमित्त होन आणि शिवराई ही दोन नवी नाणी पाडण्यात आली. त्या नाण्यांवर 'राजा शिवछत्रपती' अशी अक्षरे घातली. शिवाजी महाराजांची शासकीय मुद्रा संस्कृत श्लोकबद्ध असून ती बहुधा शहाजींनी घडवली असावी, कारण ही मुद्रा शिवाजी महाराजांच्या १५व्या वर्षांपासून वापरात दिसते. राज्याभिषेकानंतरही हीच मुद्रा कायम राहिली. ती अशी : ***प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता शाहसूनोःशिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते.*** स्वराज्याचा ध्वज भगवा ठेवला. संस्कृत भाषेचा आणि भाषापंडितांचा मानसन्मान व आदर केला. म्हणूनच समर्थ रामदास म्हणतात -

*निश्चयाचा महामेरु, बहुत जनांसी आधारु*
*अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी.*

संदर्भ : https://vishwakosh.marathi.gov.in

## संत सेवालाल महाराज



संत सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यातील सुरगोंडनकोप्पा येथे झाला. ते बंजारा समाजातील आद्य समाजसुधारक आणि आध्यात्मिक गुरू मानले जातात. देशभरात बंजारा समाजाची लोकसंख्या सुमारे १० ते १२ कोटी असल्याचे मानले जाते. विशेषत: वनवासी आणि भटक्या जमातींची सेवा करण्यासाठी त्यांनी आपल्या लादेनिया समूहासह सेवालाल महाराजांनी देशभर प्रवास केला.

आयुर्वेद आणि निसर्गोपचार मधील त्यांचे विलक्षण ज्ञान, उत्कृष्ट कौशल्ये आणि आध्यात्मिक पार्श्वभूमीमुळे त्यांनी आदिवासी समुदायांमध्ये प्रचलित असलेल्या दंतकथा आणि अंधश्रद्धा दूर करून त्यांचे निर्मूलन करण्यात ते यशस्वी झाले आणि समाजाच्या जीवनपद्धतीत त्यांनी सुधारणा घडवून आणल्या. देशभरात वेगवेगळ्या नावांनी स्थायिक झालेला बंजारा समाज आपली भटकी जीवनशैली आणि तांडा नामक वस्ती कायमची सोडून एकाजागी स्थायिक झाला आहे. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये संत सेवालाल महाराज हे प्रत्येक बंजारा कुटुंबात पूजनीय प्रतीक आहेत आणि या सर्व राज्यांमध्ये संत सेवालाल महाराजांची जयंती फेब्रुवारी महिन्यामध्ये मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. संत सेवालाल महाराज यांचे समाधी स्थळ महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यात पोहरादेवी येथे आहे, ज्याला बंजारा काशी असेही म्हणतात.

संदर्भ : **https://pib.gov.in**

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

**(१८१२ - १७ मे १८४६)**



मराठी वृत्तपत्र व्यवसायाचे जनक आणि पहिल्या आंग्लशिक्षित पिढीतील अग्रगण्य विद्वान. जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पोंभुर्ले या गावी. गंगाधरशास्त्री या व्युत्पन्न पित्याच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर मुंबईस येऊन सदाशिव काशीनाथ ऊर्फ 'बापू छत्रे' आणि बापूशास्त्री शुक्ल यांजकडे अनुक्रमे इंग्रजी व संस्कृत शिकू लागले. या दोन विषयांबरोबरच गणित आणि शास्त्र या विषयांत त्यांनी प्रावीण्य मिळवले. अनेक भारतीय व परदेशी भाषांचा त्यांनी परिचय करून घेतला होता. 'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'चे 'नेटिव्ह सेक्रेटरी', अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक, एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये पहिले असिस्टंट प्रोफसर, शाळा तपासनीस, अध्यापनशाळेचे (नॉर्मल स्कूल) संचालक अशा अनेक मानाच्या जागांवर त्यांनी काम केले. त्यांना 'जस्टिस ऑफ द पीस' ही करण्यात आले होते (१८४०).

'दर्पण' हे वृत्तपत्र १८३२ मध्ये काढून मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा त्यांनी पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिक त्यांनीच १८४० मध्ये काढले. लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हेच हेतू या उपक्रमांमागे होते. भूगोल, व्याकरण, गणित, इतिहासादी विषयांवर त्यांनी ग्रंथरचना केली. काही पाठांतरे नोंदवून त्यांनी ज्ञानेश्वरीचे संपादन केले.

'रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या कार्यात भाग घेणारे ते पहिले एतद्देशीय विद्वान होत. या संस्थेच्या त्रैमासिकात भारतीय शिलालेख व ताम्रपट यांसंबंधी त्यांचे संशोधनात्मक निबंध येत असत. त्यांचे विचार प्रगमनशील होते. ख्रिस्त्याच्या घरात राहिल्यामुळे वाळीत टाकल्या गेलेल्या एका हिंदू मुलास त्यांनी तत्कालीन सनातन्यांच्या विरोधास न जुमानता शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेण्याची व्यवस्था केली. अल्पावधीच्या आजारानंतर मुंबईत त्यांचे निधन झाले.

## संत रविदास



उत्तर भारतातील एक मध्ययुगीन संत. रविदास असेही त्यांचे एक नामांतर आढळते. महाराष्ट्रात रोहिदास चांभार म्हणून ओळखले जाणारे संत हेच असावेत, असे दिसते. ते काशीचे राहणारे होते. त्यांच्या वडिलांचे नाव राहू, आईचे नाव करमा व पत्नीचे नाव लोना होते. त्यांना विजयदास नावाचा पुत्र असल्याचा उल्लेख परमानंदस्वामिरचित रविदास पुराण या ग्रंथात आढळतो.

सत्संगतीचा परिणाम होऊन ते १२व्या वर्षांपासूनच राम व सीता यांच्या मूर्तींची पूजा करू लागले. त्यांच्याकडून संसार नीट होणार नाही, असे पाहून वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. ते निःस्पृह व समाधानी होते. त्यांच्या जीवनाशी अनेक दंतकथा निगडित आहेत. ते मोबदला न घेताच साधुसंतांना चपलांचे जोड देत असत, अशा कथाही सांगतात. ते रामानंदांचे शिष्य असल्याचे म्हटले जाते; परंतु त्यांच्या कोणत्याही पदात तसा उल्लेख नाही. ते कबीर (सु. १३९८-सु. १५१८) यांचे समकालीन असल्याचा उल्लेख आढळतो. मीराबाईंनी आपल्या अनेक पदांतून रैदास हे आपले गुरू असल्याचे म्हटले आहे. स्वतः रैदास मीराबाईंचे गुरू होते, की रैदासी संप्रदायातील रैदासांच्या अनुयायांपैकी कोणी त्यांचे गुरू होते, हे संदिग्ध आहे. चितोडची झालारानी वा झालीरानी त्यांची शिष्या असल्याचे सांगितले जाते आणि ती राणासंगाची वा राणा कुंभाची पत्नी असल्याची मतेही आढळतात. तिच्या निमंत्रणावरून ते चितोडला गेले होते. त्यांची काही पदे ग्रंथसाहिबमध्ये आढळतात. त्यांच्या रचनांचा एक संग्रह प्रयागहून 'रैदासजी की बानी' या नावाने प्रकाशित झाला आहे. राजस्थानमध्ये त्यांच्या काही रचना हस्तलिखित स्वरूपात आहेत, असे म्हणतात. त्यांच्या नावावर सांगितली जाणारी आणखी एक रचना प्रहलाद लीला असून ती अप्रकाशित आहे. त्यांच्या भाषेवर फार्सीचा प्रभाव दिसतो. त्यांनी प्रवर्तित केलेला पंथ 'रैदासी पंथ' म्हणून प्रसिद्ध होता. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, राजस्थान या प्रदेशांत या पंथाचे अनुयायी आढळतात.

संदर्भ : **https://vishwakosh.marathi.gov.in**

संत गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे झाला. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर. आपल्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता. गुरांची आवड होती. गुरांची निगराणी राखण्याची त्यांना आवड होती. डेबूजीला लहान असल्यापासून स्वच्छतेची आवड होती. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या; पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले.

# दोन बाबांचे ऋणानुबंध

डॉ. विजय चोरमारे

**गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश होता, जो आजही सगळ्यांसाठी मार्गदर्शक ठरतो.**

**भुकेलेल्यांना = अन्न**
**तहानलेल्यांना = पाणी**
**उघड्या नागड्यांना = वस्त्र**
**गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत**
**बेघरांना = आसरा**
**अंध, अपंग, रोग्यांना = औषधोपचार**
**बेकारांना = रोजगार**
**पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय**
**गरीब तरुण-तरुणींचे = लग्न**
**दु:खी व निराश यांना = हिंमत**
**गोरगरिबांना = शिक्षण**

**हाच आजचा रोकडा धर्म आहे ! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे, असे ते म्हणत.**

गाडगेबाबांनी ३० वर्षे पंढरपूरची आषाढी आणि कार्तिकी वारी नेमाने केली, पण ते देवळात गेले नाहीत. चंद्रभागेच्या किनाऱ्याची स्वच्छता हा त्यांचा प्राधान्यक्रम असायचा. रात्री कीर्तन करायचे. चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनासाठी हजारो लोक जमायचे. बाबा वारकऱ्यांना प्रश्न विचारून त्यांच्याकडूनच देवाचा फोलपणा लक्षात आणून द्यायचे. गाडगेबाबा लोकांना विचारायचे, 'देव पाहिला का?', लोक म्हणायचे, 'पाहिला'

कुठं पाहिला? - देवळात

बाबा म्हणायचे, माझा देव माझ्या मनात राहतो.

बाबा विचारायचे, तुमच्या देवाला स्वतःची आंघोळ करता येत नाही, स्वतः धोतर नेसता येत नाही, स्वतःच्या पुढ्यातल्या नैवेद्याचे रक्षण करता येत नाही तो देव तुमचे काय रक्षण करणार?

बाबा विचारायचे, तुम्ही जिताजागता देव पाहिला का?

त्यावर लोक गप्प राहायचे. त्यावर बाबा कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नावे घेऊन गोरगरिबांसाठी काम करणारी ही माणसं जितीजागती देवमाणसं आहेत, असं सांगायचे.

## संत चोखामेळा धर्मशाळा

संत गाडगेबाबा आणि डॉ.आंबेडकर हे समकालीन असले; तरी गाडगेबाबा हे वयाने बाबासाहेबांपेक्षा १५ वर्षांनी ज्येष्ठ होते. तरीसुद्धा



बाबासाहेबांच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन गाडगेबाबा त्यांचा आदर करत होते. समाजातील भेदाभेद, अनिष्ट प्रथा, जुन्या रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धा नष्ट करणे हे दोघांच्याही कार्यातील समान सूत्र होते. त्यांच्यात परस्परांबद्दल प्रचंड आदर, प्रेम, जिव्हाळा आणि समन्वय होता. उच्चशिक्षित असलेले बाबासाहेब सामाजिक सुधारणा व अन्य महत्त्वपूर्ण कार्याच्या बाबतीत अनुभवाने ज्येष्ठ असलेल्या गाडगेबाबांशी सल्लामसलत करत. गाडगेबाबा कीर्तनातून बाबासाहेबांच्या कार्याचा आवर्जून उल्लेख करीत असत. गाडगेबाबांनी १९२० साली पंढरपूर येथे संत चोखामेळा धर्मशाळा बांधली होती. १४ जुलै १९४९ रोजी गाडगेबाबांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या उपस्थितीत चोखामेळा धर्मशाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी सुपूर्द केली.

कीर्तन हे गाडगेबाबांच्या प्रबोधनाचे प्रमुख माध्यम होते. बाबांचे मुंबईत कीर्तन असेल, त्यावेळी बाबासाहेब आवर्जून कीर्तन ऐकायला जात असत. एकदा मुंबईच्या भायखळा मार्केटमध्ये गाडगेबाबांचे कीर्तन होते. त्यांच्यासोबत एक मान्यवर मित्र कीर्तनाला गेले होते. बाबांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य म्हणजे कीर्तनाच्या आधी बाबा स्वतः सगळे पटांगण साफ करत असत. त्यामुळे कीर्तनाच्यावेळी बाबासाहेब खाली जमिनीवर बसूनच कीर्तन ऐकत, तर बाबासाहेबांसोबत असलेले गृहस्थ रुमाल अंथरून त्यावर बसू लागले, त्यावेळी बाबासाहेबांनी तो रुमाल ओढून घेतला आणि त्यांना सांगितले की, 'ही जागा गाडगेबाबांनी स्वतःच्या हातांनी झाडून, धुवून स्वच्छ केली आहे. नीट आरामात बसा. जिथे गाडगेबाबा असतील तिथे घाण असूच शकत नाही.'

कीर्तन सुरू होताच एका श्रोत्याने गाडगेबाबांना विचारले, 'महाराज एक ईचारू का?', त्यावर गाडगेबाबा म्हणाले 'ईचारा मायबाप, पण मले महाराज म्हणू नका, मी आपले लेकरू हाय. बोलविते धनीच बसले तुमच्या पलीकडे. तेच आहे खरे महाराज. गरीब लोकांसाठी, आपल्या समाजासाठी लढणारे महाराज तुमच्यासाठी आधीच जमिनीवर बसून माझं कीर्तन आईकून राहिले' असे म्हणून त्यांनी जमिनीवर बसून कीर्तन ऐकणाऱ्या बाबासाहेबांकडे बोट दाखवले.

१९४२ चा एक प्रसंग आहे. मनमाड येथे कीर्तनाच्यावेळी अन्य महापुरुषांच्या कार्याबरोबरच गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची महती सांगितली. कीर्तन संपताना त्यांनी 'बोलो डॉ. बाबासाहेब आंबेडकर की' अशी घोषणा दिली. श्रोत्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. बाबा अस्वस्थ झाले. बाबांनी पुन्हा बाबासाहेबांचे कार्य, संघर्ष आणि त्यांच्या कार्याची महती अत्यंत पोटतिडिकीने सांगितली. त्यानंतर बाबांनी पुन्हा घोषणा दिली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर की त्यानंतर मात्र जनसमुदायातून जय जय असा प्रचंड जयघोष झाला. गाडगेबाबांना बाबासाहेबांबद्दल किती प्रेम, जिव्हाळा होता याची कल्पना यातून येते.

## शैक्षणिक कार्याचे दाखले

गाडगेबाबांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही. डॉ. आंबेडकर उच्चविद्याविभूषित होते. असे असले तरी शिक्षणाची दरी त्यांच्या संबंधात कधी आड आली नाही. त्यामुळेच गाडगेबाबा कीर्तनातून शिक्षणावर, शिक्षण प्रसारावर भर देत असत. बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याचे दाखले देत असत. अखेरीस ते म्हणत, 'शिक्षण ही मोठी गोष्ट आहे. बाबासाहेबांच्या समाजातील अनेक पिढ्यांनी झाडू मारण्याचं काम केलं. त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेत घातलं. शिक्षणाचा फायदा घेऊन बाबासाहेबांनी मोठी कमाई केली. त्यांनी देशाची घटना लिहिली. ते जर शाळेत गेले नसते, त्यांनी शिक्षण घेतले नसते, तर झाडू मारणेच त्यांच्या नशिबी आले असते. म्हणून म्हणतो लोकहो, विद्या हे मोठे धन आहे. जेवणाचे ताट मोडा. बायकोला लुगडं कमी भावाचा घ्या. मोडक्या घरात राहा. पण मुलांना चांगलं शिक्षण द्या.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एक सभा सुरू होती. तिथे गाडगे महाराज पोहोचले. अचानक गाडगेबाबांना पाहून बाबासाहेब अचंबित झाले. वर केलेल्या दोन्ही हातात हार घेऊन स्टेजसमोर उभ्या असलेल्या गाडगे महाराजांना बाबासाहेब स्टेजवर येण्यास सांगत होते, 'परंतु नाही बाबासाहेब तुम्हीच खाली या आणि या अडाण्याचा हार घ्या.' असे गाडगेबाबा म्हणत होते. असे बराच वेळ दोघे महापुरुष एकमेकांना विनंती करत होते. बाबासाहेब लटक्या रागातच म्हणाले. 'बाबा तुम्ही, स्टेजवर का येत नाही?' त्यावर गाडगेबाबा शांतपणे बोलले. 'बाबासाहेब तुम्ही ज्या स्टेजवर उभे आहात, त्या स्टेजला पाय लावायची माझी तरी लायकी नाही.' गाडगेबाबांच्या तोंडून असे बोल बाहेर पडताक्षणीच बाबासाहेब मंचावरून खाली उतरले. त्यांचा हार स्वीकारला आणि दोघांनी एकमेकांना प्रेमाने कडकडून मिठी मारली. 'आता तुमचे चालू द्या.' असे बोलून गाडगेबाबा तिथून निघून गेले.

१९४१ च्या जुलैमधील प्रसंग आहे. गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या बाबासाहेबांना गाडगेबाबांच्या आजारपणाची खबर दिली. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदामंत्री होते. त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. बाबांच्या आजारपणाचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली. दोन घोंगडी विकत घेऊन ते रुग्णालयात गेले. कोणाकडून काही न घेणाऱ्या गाडगेबाबांनी बाबासाहेबांकडून दोन घोंगडी स्वीकारली. पण म्हणाले 'डॉक्टरसाहेब तुम्ही कशाला आले? मी एक फकीर. तुमचे एक मिनीट महत्त्वाचे आहे. तुमचा किती मोठा अधिकार आहे.' तेव्हा बाबासाहेब म्हणाले, 'बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा. उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे.' यावेळी बाबासाहेबांच्या डोळ्यात अश्रू होते.

गाडगेबाबांचा एकुलता एक मुलगा वारला तरी गाडगेबाबांच्या डोळ्यातून अश्रूंचा एक थेंबसुद्धा आला नाही. बातमी कळली तेव्हा बाबांचे कीर्तन सुरू होते आणि त्यांनी ते तसेच पुढे सुरू ठेवले. त्यावर बाबांचे म्हणणे होते, 'ऐसे किती गेले कोट्याने, का रडु एकासाठी....?'

परंतु ०६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले तेव्हा गाडगेबाबांना तो धक्का सहन झाला नाही. असे सांगतात की, सतत १४ दिवस ते रडत राहिले. त्यांनी अन्न पाण्याचा त्याग केला आणि बाबासाहेबांच्यानंतर १५व्या दिवशी म्हणजेच २० डिसेंबर १९५६ रोजी गाडगेबाबांचेही महानिर्वाण झाले.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# विश्वास हवा मायभाषेच्या क्षमतेवर

**श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. वि. स. खांडेकरांनंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे ते दुसरे महान साहित्यिक. त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शासनातर्फे साजरा करण्यात येतो.**

भाषा बंदीखान्यात वाढत नाही. आजही जी मराठी प्रचलित आहे, तीही अनेक भाषांतील शब्दांचे आणि व्यावहारिक संज्ञांचे नजराणे घेऊनच संपन्न झाली आहे. कोणत्याही जिवंत समाजाची भाषा तळ्यासारखी साचीव नसते, तर कालमानानं निर्माण होणाऱ्या नव्या ज्ञानाचे, विचारांचे, जाणिवांचे पाझर आत्मसात करत पुढे जाणाऱ्या नदीसारखी प्रवाही असते. इतर प्रगत भाषांशी संपर्क ठेवूनच ती प्रगती करू शकते. शुद्धतेच्या कर्मकांडात रुतलेल्या आणि त्यामुळेच प्रगतीला पराङ्मुख झालेल्या भाषा मृत या सदरात कशा जमा होतात, हे इतिहासानं दाखवलेलं आहे; हे भान मराठीनं आपल्या १५ शतकांच्या प्रवासात राखलेलं आहे आणि म्हणूनच नव्या युगाची आव्हानं पेलण्याचं सामर्थ्य तिच्या ठिकाणी आलं आहे. भाषा समर्थ आहे; पण तिच्या सामर्थ्यासंबंधी साशंक असलेली आम्ही तिची अपत्ये मात्र दुबळी आहोत. तेव्हा आमचं वैर कोणत्याही भाषेशी नाही आणि मावशीच्या मायेनं आमचं पालन करणाऱ्या इंग्रजीशी तर नाहीच नाही. मावशीबाईनं आता आमच्या आईच्या घराचा कब्जा पुन्हा आईकडे द्यावा, एवढीच आमची मागणी आहे. म्हणून आपल्यासमोर प्रश्न आहे तो इंग्रजीच्या बहिष्काराचा नाही, तर मराठीच्या संरक्षणाचा आणि संवर्धनाचा. भाषा म्हणजे शब्दाचं संकलन नव्हे. समाजाचं वैचारिक आणि जाणिवात्मक संचित काळातून पुढे नेणारी आणि परिणामतः समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता, आकार आणि आशय देणारी भाषा ही एक महाशक्ती असते. सूत्रात ओवलेल्या मण्यांप्रमाणे समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा तिच्यात ओवलेल्या असतात. म्हणून मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोशावरील वा साहित्यावरील संकट नाही, ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीपणावरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरीलही संकट आहे.



समाजाची प्रगती वा क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते असे क्रांतिकारकांच्या प्रणेत्यानं म्हटलेलं आहे. संस्कृत भाषा देवे केली! प्राकृत काय चोरापासून झाली? असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता. आज तोच प्रश्न इंग्रजीच्या संबंधात विचारता येईल. संस्कृतचं स्तोम माजवून तेव्हाचा पुरोहितवर्ग आपली सत्ता समाजावर गाजवीत होता. आज त्या पुरोहितवर्गाची जागा इंग्रजीत पारंगत असलेल्या चार पाच टक्के लोकांनी घेतली आहे. या पाच टक्केवाल्यांच्या प्रस्थापित हितसंबंधांसाठी आठ कोटी लोकांचं भवितव्य धोक्यात लोटायचं का, याचा विचार गंभीरपणानं व्हायला हवा. अनेक विख्यात शास्त्रज्ञांनी आणि डॉक्टरांनी जरूर तेथे इंग्रजी परिभाषिक संज्ञांचा स्वीकार करून, सर्व विषय, सर्व स्तरावर, मातृभाषेत शिकवणंच श्रेयस्कर असतं असं वारंवार सांगितलं आहे. म्हणून स्वभाषारक्षणाचा प्रश्न मंत्रालयाचा वा एखाद्या शासकीय विभागाचा नाही; तो सर्व समाजाचा प्रश्न आहे हे ध्यानात घेऊन शासनानं सर्वांचं सहकार्य घेतलं, तर या संकटावर मात करणं कठीण आहे, असं मला वाटत नाही. जगातील सर्व प्रगल्भ भाषांना जे साधलं ते मराठीलाही साधता येईल. फक्त आपला विश्वास हवा, अमृताशीही पैजा जिंकणाऱ्या आपल्या मायभाषेच्या क्षमतेवर!

***(१२, १३ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबई येथे भरलेल्या जागतिक मराठी परिषदेतील कवी कुसुमाग्रज ऊर्फ श्री. वि.वा. शिरवाडकर यांच्या अध्यक्षीय भाषणातून)***

(लोकराज्य फेब्रुवारी २०१४ मधून पुनर्मुद्रित)


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह